Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

✲ वर्ष ५४ ✲ अंक २०९ ✲ ✲ नागपूर ✲ बुधवार, दि०६ नोव्हेंबर २०२४ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## सर्व खासगी मालमत्ता भौतिक संसाधने नाहीत

### सर्वोच्च न्यायालयाचा बहुमताने निर्वाळा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
सरकार सर्वसामान्यांच्या फायद्यासाठी खासगी मालमत्ता घेऊ शकते का? सर्वोच्च न्यायालयाच्या ९ न्यायाधीशांच्या खंडपीठाने मंगळवारी या प्रकरणावर बहुमताने निकाल दिला. प्रत्येक खासगी मालमत्तेला सामुदायिक मालमत्ता म्हणता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.
सरकार केवळ काही संसाधनांना सामुदायिक संसाधने मानू शकते आणि त्यांचा सार्वजनिक हितासाठी वापर करू शकते. सरन्यायाधिश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील ९ न्यायाधीशांच्या घटनापीठापैकी ७ न्यायाधीशांनी या निर्णयाला पाठिंबा दिला. खाजगी मालकीची सर्व संसाधने राज्याला मिळू शकतात, हा यापूर्वीचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नाकारला.

अग्राग्रलेख **खरीखरी...**

## गुंग मती, अशी ही बारामती !

बारामती हे महाराष्ट्राचे सत्ता केंद्र होते. आजही आहे आणि पुढेही राहील. काही वर्षांपूर्वी शरदचंद्र पवार हे या बारामतीचे राजकारणातील सर्वेसर्वा होते. आपल्या खांद्यावरचे ओझे काही प्रमाणात कमी करण्याकरता त्यांनी काही भार आपले पुतणे अजित पवार यांच्या खांद्यावर टाकला. त्यानंतर पुन्हा काही भार त्यांनी आपलीच प्रिय कन्या, सुप्रिया यांच्यावर टाकला. हे दोन बहिण-भाऊ राज्यात आणि केंद्रात आपल्या बारामतीची विजयपताका अशीच फडकवत राहतील. हा माननीय पवार साहेबांचा आडाखा होता. पण गेल्या काही वर्षांपासून अजित पवार यांनी राष्ट्रवादीमध्ये आपला वेगळा गट बनवला आणि सव्वा वर्षापूर्वी शरद पवार यांच्या मनात असलेल्या आडाख्याला असा काही तडाखा दिला की, त्यामुळे आपल्या राज्याचे सगळे राजकारण बदलले. मोठ्या पवार साहेबांच्या मनात काय आहे. त्यांच्या डोळ्यात काय आहे, त्यांच्या तोंडात काय आहे. याची कल्पना भल्याभल्या राजकारणातील खेळाडूंना सुद्धा करता येत नाही. ही अशी मतीगुंग करणाऱ्या बारामतीची किमया, बारामतीच्याच पवार साहेबांनी अशी पेरून टाकली आहे की, त्यामुळे भले भले राजकारणातले बहाद्दर त्या झटापटीत सहजपणे चीत झालेले आम्ही पाहिलेले आहेत. आता आज पवार साहेबांनी यापुढे आपण कोणतीही निवडणूक लढणार नाही. असे जाहीर करून टाकलेले आहे. यासोबतच राज्यसभेत जाणार किंवा नाही. याचाही विचार केला नाही अशीही त्यांची घोषणा आहे. हेच जर त्यांनी दोन वर्षांपूर्वी केले असते. तर अजित पवार कशाला बाहेर पडले असते. आपल्या हाती कारभार सोपवा. हीच तर अजितदादांची मागणी होती. फक्त ते बोलले नाहीत, इतकेच सत्य आहे. अजित दादांना भाजपसोबत जाण्यापेक्षा सत्तेसोबत राहणे आवडते. त्यामुळे त्यांनी जे जे पत्ते टाकले होते. ते ते हुकमाचे पत्ते मोठ्या पवार साहेबांना यश देणारे ठरले नाहीत. उद्धवरावांच्या शिवसेनेमध्ये शिवसेनेला जसा झटका बसला. अगदी तसाच झटका पवार साहेबांच्या राष्ट्रवादीलाही बसला. काल भाषण करताना राज साहेब ठाकरे यांनी शिवसेनेचे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह केवळ बाळासाहेबांचेच होते आणि आहे. असे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि त्यांचे घड्याळ हे चिन्ह सुद्धा फक्त आणि फक्त शरद पवार यांचेच होते आणि आहे. अशी निसंदिग्ध ग्वाही दिली किंवा सोप्या भाषेत त्यांनी भूमिका मांडली. असे आपण म्हणू शकतो. पण प्रत्यक्षात काय झाले. धनुष्यबाणही गेला आणि घड्याळही गेले. ज्यांनी धनुष्यबाण घेतला त्यांना त्या चिन्हाचा फायदा झाला. मशालीखाली नऊ खासदार आले तर धनुष्य बाणाचेही सात खासदार आले. पण इकडे राष्ट्रवादीचे ओरिजिनल घड्याळ होते. त्यांच्या राष्ट्रवादीचा फक्त एकच खासदार आला. म्हणजेच जसे 2019 च्या निवडणुकीत काँग्रेसला जसा एक खासदार मिळाला होता. तसाच हा प्रकार झाला. मात्र शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या समस्या जाणणाऱ्या आणि त्यांना जाणणाऱ्या, त्यांच्या निष्ठावंत पुत्रांना बरोबर निवडून आणले. आताच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या भोंगळ जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. तसेच उबाठा सेनेच्या जागा वाटपातील गफलतीची चर्चाही जोरात होत आहे. पण शरदचंद्र गोविंद पवार यांच्या गोविंद बागेतील दिवाळीच्या महामिलनाला अशी काही गर्दी लोटली की, त्यामुळे आताच्या विधानसभेतही अगदी नाकावर टिच्चून उमेदवार विजयी होतील असे म्हणायला काय हरकत आहे? भारतीय जनता पक्षाची मोठी प्रचार यंत्रणा, भरपूर सोयी-सवलती, दाराशी जाऊन प्रचार करणारे प्रचारक यांच्या तुलनेत काँग्रेस आणि शिवसेना कुठेही सरस वाटत नाही. पण शरदचंद्रजी पवार यांनी एकेक असे काही तारे निवडले आहेत की त्यांना फारच वेगळे वेगळे स्थान आहे. शरद पवार यांनी निवडलेल्या अशा ताऱ्यांना पराभूत करणे सोपे नाही. पवार साहेब असे वेगळे रसायन आहे की, हे रसायन कोणाला पावेल. याची कल्पना भल्याभल्यांना येऊ शकत नाही. पवार साहेबांनी म्हटल्याप्रमाणे त्यांना 14 निवडणुकांच्या प्रसादानंतर, म्हणजेच जसे श्रीरामाने 14 वर्षाच्या वनवासानंतर अयोध्येवर राज्य केले. त्याचप्रमाणे शरद पवार हे सिंहासनावर न बसताही महाराष्ट्रावर राज्य करतील. किंबहुना देशावरही अधिराज्य गाजवतील, यात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023



# संसदीय राजकारण सोडण्याचे शरद पवारांचे संकेत

### किती निवडणुका लढवायच्या? कुठे तरी थांबले पाहिजे...

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिलेत.
आतापर्यंत मी १४ निवडणुका लढल्या. आणखी किती लढवायच्या? कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन मी आता कामाला लागलो आहे, असे ते बारामती येथे आयोजित एका प्रचारसभेत बोलताना म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे ते सक्रिय राजकारणातून संन्यास घेणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे.
शरद पवार सध्या आपले नातू तथा बारामती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार युगेंद्र पवार यांच्यासाठी प्रचारसभा घेत आहेत. त्यांनी मंगळवारी एका प्रचारसभेला संबोधित करताना संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिले.
ते म्हणाले, मी सध्या सरकारमध्ये नाही. माझ्या राज्यसभेचे अजून दीड वर्षे शिल्लक आहेत. त्यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचे की नाही याचा मला विचार करावा लागेल. मी आता लोकसभाच नाही तर कोणतीही निवडणूक लढवणार नाही.
मी ३० वर्षांपूर्वी लोकसभा न लढवण्याचा निर्णय घेतला. कारण, ३०-३५ वर्षे सतत निवडून गेल्यानंतर नवी पिढी तयार करण्याची गरज असते. त्यानुसार मी इथली सर्व जबाबदारी अजित पवारांकडे सोपवली. मागील २५-३० वर्षांपासून ही जबाबदारी त्यांच्यावर आहे. पहिली ३० वर्षे माझ्यावर आणि त्यानंतरची ३० वर्षे अजित पवारांवर. आता पुढल्या ३० वर्षांची व्यवस्था करण्याची गरज आहे. लोकांमध्ये जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यात लक्ष घालण्याची दृष्टी हवी, असे म्हणत शरद पवार यांनी यावेळी बारामतीची सर्व सूत्रे युगेंद्र पवार यांच्या हातात सोपवल्याचे सष्ट केले.

**नवी पिढी तयार करण्याची गरज**
दरवेळी तुम्ही मला निवडून दिले. पण आता कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन आता मी कामाला लागलो आहे. मी समाजकारण सोडले असा नाही. सत्ता नको, पण लोकांची सेवा, लोकांचे काम करतच राहायचे. ज्या भागात दलित, भटके विमुक्त, उपेक्षित या वर्गासाठी काही करता येईल ते करायचे हा माझा स्वतःचा निर्णय आहे. आता आपल्याला निवडणूक नको हे मी ठरवले आहे. राज्य व्यवस्थित चालावे यासाठी नवी पिढी तयार करायला पाहिजे.

## आज राहुल गांधींच्या उपस्थितीत संविधान सन्मान संमेलन

### नागपुरातून फुटणार आघाडीच्या प्रचाराचा नारळ



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
काँग्रेस नेते राहुल गांधी यांची आज उपराजधानी नागपूर येथे प्रचारसभा होत आहे. विधानसभा निवडणुकीत मुसंडी मारण्यासाठी काँग्रेसने नागपूर येथे दुपारी १ वाजता संविधान सन्मान संमेलनाचे आयोजन केले आहे.
राष्ट्रीय सवयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या रेशीम बाग परिसरातील कविवर्य सुरेश भट सभागृहात हे संमेलन पार पडणार आहे. या संमेलनाला मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित राहतील.

## संजय वर्मा नवे पोलीस महासंचालक



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
निवडणूक आयोगाने संजय वर्मांची पोलीस महासंचालकपदी नियुक्ती केली आहे. रश्मी शुक्ला यांच्यानंतर आता राज्याच्या पोलीसदलाची सुत्रे संजय वर्मा यांच्याकडे असणार आहे.
राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे निर्देश सोमवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले होते. तसेच मुख्य सचिवांनी सेवाज्येष्ठता व योग्यतेनुसार तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावे मंगळवारी दुपारी एक वाजेपर्यंत निवडणूक आयोगाकडे पाठवावीत, यापैकी एका अधिकाऱ्याची पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती केली जाईल, असेही निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले होते. त्यानुसार आज संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली.
वर्मा हे मुळचे उत्तर प्रदेशचे असून ते १९९० च्या बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे आयपीएस अधिकारी आहेत. त्यांच्याकडे तीन दशकाहून अधिक काळ पोलीस सेवेत काम करण्याचा अनुभव आहे.
संजय वर्मा हे न्यायवैद्यक विज्ञानातील त्यांच्या कौशल्यांसाठी ओळखले जातात. कायदा व तांत्रिक विभागाचे संचालक म्हणून काम करताना त्यांनी न्यायवैद्यक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. गुन्हा घडल्याच्या ठिकाणाचा तपास आणि तेथून पुरावे गोळा करण्यासाठी त्यांनी राज्यात जवळपास दोन हजारांहून अधिक तज्ञांची चमू तयार केली. त्यांच्या कार्याबद्दल अनेकदा त्यांचे कौतुकही करण्यात आले.
दरम्यान, आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्यातील २५ हून अधिक पोलीस अधिकारी, तर ३०० हून अधिक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. मात्र, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली नव्हती. रश्मी शुक्ला यांच्यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांचे फोन टॅप केल्याचा आरोप होता. अखेर रश्मी शुक्ला यांना पदावरून हटविण्यात आले.

## अजित पवार गटाचा आज स्वतंत्र जाहीरनामा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने निवडुकीसाठी स्वतंत्र जाहीरनामा तयार केला असून त्याचे प्रकाशन आज, बुधवारी केले जाणार आहे. त्यामुळे महायुतीचा एकच असा जाहीरनामा नसेल हे स्पष्ट आहे.
महायुतीचा एकच संयुक्त जाहीरनामा प्रकाशित होणे अपेक्षित होते. मात्र, राष्ट्रवादी अजित पवार गटाने स्वतःचा निवडणूक जाहीरनामा प्रकाशित करण्याचा निर्णय घेऊन महायुतीत आघाडी घेतली आहे. त्यामुळे भाजप आणि शिंदे गटाकडूनही स्वतंत्र जाहीरनामे सादर केले जाणार आहेत.
प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पक्षाचा निवडणूक जाहीरनामा प्रकशित होईल. कार्यक्रमात अजित पवार, प्रफुल्ल पटेल, मंत्री छगन भुजबळ हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होणार आहेत.

## संविधान दिनाचे औचित्य साधून २ लाखांवर कैद्यांच्या सुटकेची तयारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
२६ नोव्हेंबर रोजी ७५ व्या संविधान दिनानिमित्त तुरुंगात असलेल्या कैद्यांसाठी केंद्र सरकार विशेष मोहीम राबवणार आहे. त्यांना नुकत्याच लागू झालेल्या भारतीय न्याय संहितेनुसार जामीन देण्यात येईल.
नवीन कायद्याच्या कलम ४७९ नुसार जर कैद्याने त्याच्यावरील आरोपासाठी संभाव्य शिक्षेपैकी निम्म्याहून अधिक कारागृहात व्यतीत केला असेल तर जामीन मिळेल. प्रथमच गुन्ह्यासाठी तुरुंगवास भोगलेल्या कैद्याने संभाव्य शिक्षेच्या एक तृतीयांश काळ तुरुंगवास भोगला असेल तर त्यालाही जामिनाचा हक्क असेल.
गृह मंत्रालयाने या संदर्भात सर्व राज्यांचे सचिव आणि तुरुंग प्रशासकांसाठी सूचना जारी केली आहे. संविधान दिनानिमित्त अशा सर्व कच्च्या कैद्यांची जामिनावर सुटका करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यासाठी तपशील देण्याचे निर्देशही मंत्रालयाने दिले.
प्रथमच गुन्ह्यांसाठी शिक्षेपैकी एक तृतीयांश कालावधी तुरुंगात घालवलेले २ लाख कैदी आहेत. त्यांना जामीन देण्याचे आदेश सुप्रीम कोटार्ने २३ ऑगस्ट रोजी दिले होते. ही तरतूद १ जुलै २०२४ पूर्वीच्या कैद्यांनाही लागू होईल.
देशातील तुरुंगांमध्ये सुमारे ५.७५ लाख कैदी आहेत. यापैकी ७५% सध्या केसेसचा सामना करत आहेत. दिल्लीच्या तिहार तुरुंगात १० हजार कैद्यांची क्षमता असून तेथे १४ हजार कैदी आहेत.
उत्तर प्रदेशच्या तुरुंगात सर्वाधिक ७६ हजार कैदी आहेत. यानंतर महाराष्ट्रात सुमारे ६० हजार, बिहारमध्ये सुमारे ४५ हजार, मध्य प्रदेशात ३९ हजार आणि बंगालमध्ये ३७ हजार कैदी असल्याची माहिती आहे.

## ८७ दिवसांनंतर आरोप निश्चित

**कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरण**

■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. ५ :
पश्चिम बंगालच्या सियालदह न्यायालयाने कोलकाता येथील आरजी कर कॉलेजमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी संजय रॉयवर आरोप निश्चित केले आहेत. ११ नोव्हेंबरपासून या प्रकरणाची दररोज सुनावणी होणार आहे.
पोलिसांनी संजयला बाहेर काढले तेव्हा पहिल्यांदाच तो कॅमेरावर बोलताना दिसला की ममता सरकार आपल्याला या प्रकरणात गोवते आहे. त्याला तोंड न उघडण्याची धमकी देण्यात आली आहे. ८ ऑगस्टच्या रात्री आरजी कर हॉस्पिटलमध्ये एका प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. ९ ऑगस्ट रोजी पीडितेचा मृतदेह सापडला होता. या घटनेच्या विरोधात डॉक्टरांनी तब्बल ४२ दिवस आंदोलन केले.

## मदरसा कायद्याची वैधता कायम

■ वृत्तसंस्था, अलाहाबाद, दि. ५ :
सुप्रीम कोटार्ने यूपी मदरसा एज्युकेशन बोर्ड ॲक्ट 2004 वर निर्णय दिला आहे. न्यायालयाने मदरसा कायद्याची वैधता कायम ठेवली आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली.
यापूर्वी 5 एप्रिल 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाने मदरसा कायदा असंवैधानिक घोषित करणाऱ्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारकडूनही उत्तर मागवण्यात आले.
मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पाडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने २२ ऑक्टोबर रोजी निर्णय राखून ठेवला होता. अखेर आज सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबादल ठरविला.

## राज्यात ८५ वर्षांवरील मतदार १२ लाखांहून अधिक



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
राज्यात येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीत ८५ वर्षांहून अधिक वयोगटामधील एकूण १२ लाख ४० हजार ९१९ मतदार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.
राज्यात एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून यामध्ये ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या १२ लाखांहून अधिक आहे. या वयोगटात एकूण १२ लाख ४० हजार ९१९ मतदार आहेत. विशेष म्हणजे पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. ५ लाख ४२ हजार ८९१ पुरुष मतदार तर ६ लाख ९८ हजार २२ महिला मतदार आणि ६ तृतीयपंथी मतदार आहेत.

## आशियातील सर्वाधिक ट्रॅफिकमध्ये बंगळुरू आणि पुणे टॉपवर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
टॉमटॉम ट्रॅफिक इंडेक्सच्या जारी केलेल्या अहवालात, संपूर्ण आशियातील सर्वात खराब रहदारी आणि सर्वाधिक वाहनांची गर्दी असलेल्या शहरांमध्ये देशातील दोन शहरे आघाडीवर आहेत. यामध्ये बंगळुरू पहिल्या तर पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे.
बंगळुरूमध्ये, चारचाकी वाहनात १० किमी अंतर कापण्यासाठी २८.१० सेकंद लागतात. पुण्यात हेच अंतर कापण्यासाठी २७ मिनिटे ५० सेकंद लागतात. याशिवाय नवी दिल्ली १२ व्या तर मुंबई १४ व्या स्थानावर आहे.








# अवकाळीमुळे 33 टक्के भातशेतीचे नुकसान

ठाणे, दि. ५ : प्रतिनिधी

> कोकणातील पाचही जिल्ह्यात भातशेती, नाचणी आणि फळ पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरु आहे. आतापर्यंत सुमारे 60 टक्के नुकसानी पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित 40 टक्के पंचनामे येत्या आठवडाभरात पूर्ण होतील.
> -अंकुश माने, विभागीय कृषी सहसंचालक, कोकण विभाग

भातशेतीत भाताला लोंब्या येऊन भात पिक कापणीच्या टप्प्यात आले असतानाच 1 ते 21 ऑक्टोबर या 21 दिवसांच्या कालावधीत झालेल्या र अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाने, कोकणातील पाच जिल्ह्यातील 2 हजार 806 गावांतील 97 हजार 177 शेतकऱ्यांच्या एकूण 38 हजार 904 हेक्टर क्षेत्रातील सरासरी 33 टक्केपेक्षा अधिक भातशेतीचे नुकसान झाले आहे. ही नुकसानी 33 टक्केपेक्षा अधिक असल्याची माहिती कृषि विभागाकडून प्राप्त झाली आहे.

कोकणातील ठाणे, पालघर, रायगड,रत्नागीरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात सर्वाधिक 57 हजार 767 बाधीत शेतकरी ठाणे जिल्ह्यात आहेत.

गुरुवारी सकाळी परशुराम उर्फ कालुराम पिरकट (वय 45) या आदिवासी हातरिक्षा चालकाचा रिक्षा ओढताना हॉटेल शालिमार जवळ रक्ताची उलटी होवून मृत्यू झाला. मोरबे डॅम चौक जवळील निंबरवाडी येथील आदिवासी वाड्यात परशुराम राहतात. गेल्या 15 वर्षापासून माथेरान येथे हातरिक्षा ओढण्याचे काम करून उपजीविका सुरू होती. सर्वोच्च न्यायालयाने माथेरानमध्ये प्रथम सात इ रिक्षांना परवानगी देऊन येथील रस्त्यांवर त्या कशा चालतात हे पहावयास सांगितले त्यानंतर आणखी 13 म्हणजेच 19 रिक्षांना प्राथमिक स्वरूपात परवानगी देताना पावसाळयामध्ये या रिक्षा कशा चालतात यावर अहवाल सादर करण्यास सांगितले. परंतु त्यानंतर त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नसून येथील रस्ते व ई रिक्षा प्रकल्प अजूनही न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहत आहे. न्याय देण्यासाठी विलंब होत असल्याने अजून किती लोकांच्या मृत्यूचे न्यायालय वाट पाहते असा प्रश्न हात रिक्षा चालकांकडून केला जातोय.

**निवडणूक कामात सरकारी यंत्रणा व्यस्त, पंचनामे रखडले**

शासकीय यंत्रणा निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्याने भातपीक नुकसानीचे पंचनामे होण्यास विलंब होत आहे. नुकसानी पंचनामे झाल्या शिवाय शिल्लक भात कापणी करता येत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले असल्याची माहिती रायगडमधील प्रयोगशिल शेतकरी राजन भगत यांनी दिली आहे. कोकणातील उर्वरित जिल्ह्यात देखील अशीच परिस्थिती असल्याचे दिसून येत आहे. नुकसानी पंचनामे वेळेवर झाले नाही तर शासनाकडून मिळणारी नुकसान भरपाई आणि विमा परतावा मिळू शकणार नाही, अशी भिती शेतकरी व्यक्त करित आहेत. लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षाचे प्रमुख देखील निवडणूक प्रचारात व्यस्त असल्याने त्यांच्याकडून देखील नुकसानी पंचनामे व्हावेत, या करिता प्रयत्न होत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगीतले.

# 'देता की जाऊ' ठाण्यात हाच झालाय परवलीचा शब्द

ठाणे, दि. ५ : प्रतिनिधी

एकेकाळी महाराष्ट्रात काँग्रेसचा एकछत्री अंमल होता. त्यानंतर राज्यात युती-आघाडीचा काळ सुरू झाला. आता तर महायुती व महाविकास आघाडीचे पर्व सुरू आहे. दोन्हीकडील तिन्ही पक्षांमध्ये एकेका जागेसाठी डझनावरी इच्छुक आहेत. त्यामुळे मला इकडे किंवा तिकडे राहून जे मिळत नाही ते मिळवण्याकरिता पटापट उड्या मारण्याचा कल या निवडणुकीत वाढला आहे. 'देता (उमेदवारी) की जाऊ' हाच ठाणे जिल्ह्यातील राजकारणातही परवलीचा शब्द झाल्याचे बंडखोरीवरून दिसते.

ठाणे जिल्ह्यात १८ पैकी १३ विधानसभा मतदारसंघांत दखलपात्र बंडखोर आहेत. उर्वरित मतदारसंघांत दखलपात्र बंडखोर नसले तरी नाराजीचे सूर आहेतच. आज (सोमवारी) दुपारपर्यंत बंडखोरीचे चित्र स्पष्ट होईल. महाविकास आघाडीमध्ये ठाणे जिल्ह्यात काँग्रेसला जागा वाटपात फटका बसला आहे. काँग्रेस व राष्ट्रवादी या दोघांनी मागील विधानसभा निवडणूक लढवली तेव्हा काँग्रेसच्या वाट्याला आठ जागा आल्या होत्या. यावेळी केवळ दोन मतदारसंघांवर काँग्रेसला समाधान मानावे लागले. ठाणे हा स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा बालेकिल्ला. शिवसेनेला पहिली सत्ता ठाण्यानेच दिली. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर ठाण्याच्या मैदानात लढत दोन शिवसेनांमध्ये असल्याने काँग्रेस आकुंचित झाली. महायुतीत ठाण्यात जास्त आमदार भाजपचे आहेत. मात्र, शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रिपद हवे असल्यास ठाण्यातच पाय पसरता येऊ शकतात. भाजपच्या कार्यकर्त्यांना त्यांचा मुख्यमंत्री व्हावा, असे वाटते. या रस्सीखेचीत महायुतीत बंड झाले. अजित पवार यांचे जिल्ह्यात फारसे अस्तित्व नाही.

काँग्रेस, शरद पवार गट व



अजित पवार गट यांचा डीएनए सेक्युलर राजकारणाचा आहे. त्यांच्या व्होट बँकेत साधर्म्य आहे. भाजप, शिंदेसेना व उद्धवसेना यांचा डीएनए हिंदुत्ववादी राजकारण, मराठी माणसाचे हितरक्षण याचा आहे. मागील पाच वर्षांत उद्धवसेनेनी आपल्या राजकारणाचा पोत व रंग बदलला आहे. त्यांची जहाल हिंदुत्ववादी भाषा मवाळ झाली. त्यामुळे मुस्लीम, दलित मतदारांमध्ये त्यांचेही आकर्षण आहे. थोडक्यात काय तर एकसारखी विचारधारा असलेल्या पक्षांतील एक वाढला तर दुसरा कमी होतो. समान विचारधारेच्या दुसऱ्या पक्षाची व्होट बँक खाल्ल्याखेरीज तो पक्ष वाढत नाही. ठाणे जिल्ह्यातही हीच चुरस कमालीची वाढून त्याचे रूपांतर ईर्षेत झाले आहे. महायुती व मविआच्या निर्मितीमुळे सरकारच्या स्थापनेमागील वैचारिक आधार पुसला गेल्याने इच्छुकांच्या बंडाला नैतिक बळ प्राप्त झाले.

भाजपत असलेल्या गणेश नाईक-मंदा म्हात्रे यांच्यातील वैर विकोपाला गेले आहे. कल्याण पूर्वेतील दोन्ही गायकवाड एकमेकांच्या जीवावर उठले. किणीकर-वाळेकर दुरावा कमी झालेला नाही. नरेंद्र मेहता-गीता जैन यांच्यातून विस्तव जाणे शक्यच नाही. त्यामुळे अशा काही ठिकाणी बंडाचे चटके दोन्हीकडील पक्षांना सहन करावे लागतील. काही ठिकाणी बंड शमले तरी असंतोष टिकून राहणार. राजकारण असो की नोकरी मला लागलीच काय मिळतेय हे पाहून लोक उड्या मारतात. पाच वर्षांनंतर काय होणार हे कुणाला ठावूक? त्यामुळे 'देता की जाऊ' हाच या व यापुढील निवडणुकांचा परवलीचा शब्द आहे.

# महायुतीच्या प्रचारपत्रकावर स्व.आनंद दिघे यांची प्रतिमा

डोंबिवली, दि. ५ : प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यातील शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे शिवसैनिकांच्या हद्यातील स्थान ओळखून यावेळी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या प्रचारपत्रकांवर आनंद दिघे यांची प्रतिमा ठळकपणे महायुतीच्या इतर नेत्यांसोबत प्रसिध्द करण्यात आली आहे.

यापूर्वी या प्रसिध्दीपत्रकाच्या जागेवर पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, युवा नेते आदित्य ठाकरे यांचे स्थान असायचे. शिवसेनेच्या फुटीनंतर या दुसऱ्या फळीच्या जागा आता रिक्त झाल्या आहेत. या जागेत आता आनंद दिघे यांना स्थान देण्यात आले आहे. यापूर्वी ठाकरे घरातील प्रतिमांमुळे आनंद दिघे यांची प्रतिमा झाकोळली जायची. ठाणे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात गाव तेथे शाखा सुरू करण्यात आनंद दिघे यांचा सिंहाचा वाटा होता. ग्रामीण भागातील शिवसैनिकांमध्ये आताही दिघे यांच्याविषयी वेगळीच आत्मियता आहे. दिघे यांचा शिष्य म्हणून आताही अनेक जुने वृध्दत्वाकडे झुकलेले शिवसैनिक दिघे यांच्यासारखा कपाळी टिळा लावून आपला स्वाभिमानी बाणा टिकवून आहेत. यामधील बहुतांशी वर्ग हा शिवसेनाप्रमुखांवरील निष्ठेमुळे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या पाठीशी आहे.

दिघे यांना मानणारी एक जुनी निष्ठावंतांची फळी शहरी, ग्रामीण भागात आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना या निष्ठावंत फळीचे मोलाचे सहकार्य व्हावे या विचारातून महायुतीच्या नेत्यांनी आनंद दिघे यांची देखणी प्रतिमा महायुतीच्या प्रसिध्दपत्रकावर झळकावून जुन्या निष्ठावंत शिवसैनिकांना साद घालण्याचा प्रयत्न केला आहे.

जिल्ह्यातील शिवसैनिकाच्या घरी कोणताही कार्यक्रम असला तरी वेळात वेळ काढून रात्रीअपरात्री जिल्हाप्रमुख आनंद दिघे तेथे हजेरी लावायचे. दिघे यांच्या तळमळीमुळे ठाणे जिल्ह्याच्या शहरी, ग्रामीण भागातील शिवसैनिक आताही आपल्या हदयात त्यांचे स्थान टिकवून आहेत. दिघे यांच्या या ताकदीचा विधानसभा निवडणुकीत लाभ उठवावा या विचारातून त्यांची प्रतिमा महायुतीच्या प्रसिध्दपत्रकावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या बाजुला झळकविण्यात आली आहे.

गेल्या काही महिन्यापूर्वी आनंद दिघे यांच्या मृत्युचे प्रकरण उकरून काढून यावरून ठाकरे आणि शिंदे शिवसेनेत जोरदार शाब्दिक वाद रंगला होता. त्यामुळेही आनंद दिघे यांना या निवडणुकीत वरचे स्थान देण्यात आल्याची चर्चा आहे.

# डोंबिवलीच्या बच्चे कंपनीकडून गड-किल्ल्यांची बांधणी



डोंबिवली, दि. ५ : प्रतिनिधी

दिवाळी म्हटली की फटाके फोडायचे, मौज-मज्जा करायची आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे गड व किल्ले हुबेहूब बांधून त्यांचे संरक्षण करण्यासाठी आहोरात्र काळजी घ्यायची. डोंबिवलीतल्या शेकडो बच्चे कंपनीने टिळकनगर, पेंडसेनगर, फडके रोड, रामनगर, पश्चिमेला कोपर, चिंचोळयाचा पाडा, नवापाडा, आदी भागात एकसे बढकर एक गड व किल्ले बांधले आहेत. बच्चे कंपनी आणि त्यांनी साकारलेल्या गड व किल्ल्यांचे कौतुक करावे तितके कमीच असल्याची प्रशंसा सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले.

दिवाळी सणाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्य पदस्पर्शाने पावन झालेला गड-किल्ल्यांच्या माध्यमातून शिवकालीन इतिहास जागृत करण्याच्या हेतूने शहरातील बच्चे कंपनी एकत्र येऊन गड व किल्ले उभारतात. मंत्री रविंद्र चव्हाण यांनी डोंबिवलीतील गड व किल्ल्यांना भेटी देऊन ते उभारणाऱ्या मुलांशी संवाद साधला. प्रचंड कल्पकता असलेल्या लहान मुलांमध्ये नवनवीन करण्याची, तसेच इतिहासाचा अभ्यास करून कलाकृती साकार करण्याची प्रचंड इच्छाशक्ती असते हे यातून दिसून आले. दिवाळी म्हणजे किल्ला आणि किल्ला म्हणजे शिवराय हीच परंपरा जपून मुलांनी विविध किल्ले साकारले आहेत.

आपल्यामध्ये जपल्या जाणाऱ्या संस्कृती आणि परंपरांपैकी एक म्हणजे दिवाळीत किल्ला बनवण्याची परंपरा आजही कायम आहे. दिवाळी पहाटचे औचित्य साधून डोंबिवलीत फेरफटका मारताना परिसरात मुलांनी दिवाळी निमित्त तयार केलेले गड व किल्ले पाहिले. डोंबिवलीकरांची नवीन पिढी आपला इतिहास जपत आहे. हे सुंदर किल्ले पाहून मुलांचे कौतुक वाटले. वंदनीय शिवछत्रपतींमुळे आपला हिंदू धर्म, आपली संस्कृती शाबूत आहे. शिवरायांमुळेच आपले सण-उत्सव-संस्कृती साजरी करू शकतो. शिवरायांचा हा गौरवशाली वारसा आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतो आहे, यातच खरे समाधान आहे, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले.

## समुद्रात आंघोळीसाठी उतरलेल्या बेळगाव येथील पर्यटकाचा बुडून मृत्यू

वेंगुर्ले, दि. ५ : प्रतिनिधी

तालुक्यातील शिरोडा वेळागर येथील समुद्रात आंघोळीसाठी उतरलेला बेळगाव येथील पर्यटक पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. विनायक रमेश शिंदे (वय ४४, रा.बेळगाव) असे त्याचे नाव आहे.याप्रकरणी वेंगुर्ले पोलीस स्थानकात आकस्मिक मृत्यू नोंद करण्यात आली आहे. सध्या दिवाळीची सुट्टी सुरू असल्याने बेळगाव येथील काही मित्र पर्यटनासाठी सिंधुदुर्गात आले होते. हे सर्व सकाळी शिरोडा वेळागर येथील बीज वर पोहोचले. तेथील समुद्राच्या लाटा पाहून हे पाण्यात आंघोळीसाठी उतरले. मात्र यातील विनायक शिंदे यांचा किनाऱ्यापासून काही अंतरावरच पाण्यात बुडून मृत्यू झाला. याबाबत शिरोडा पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून रेडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.या घटनेची खबर सूरज कृष्णा देवगेकर यांनी वेंगुर्ले पोलीस स्थानकात दिली.पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस हवालदार योगेश राऊळ हे करीत आहेत.

# भाजप व शिंदेसेनेचा वाद चव्हाट्यावर

## उल्हासनगरात महायुतीच्या मेळाव्यावर शिंदेसेनेचा बहिष्कार

उल्हासनगर, दि. ५ : प्रतिनिधी

भाजपा शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी एका कार्यक्रमात मुख्यमंत्री यांच्याबाबत काढलेल्या अपशब्दाच्या निषेधार्थ रविवारच्या महायुतीच्या मिळाव्यावर शिंदेसेनेने बहिष्कार घातला. याप्रकाराने भाजप-शिंदेसेनेचे वाद चव्हाट्यावर आले असून मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांनी काढलेल्या अपशब्द प्रकरणी मेळाव्यात दिलगिरी व्यक्त केली आहे. उल्हासनगर कॅम्प नं-३, रिजेन्सी हॉल मध्ये शनिवारी भाजप-साई पक्षाचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी मुख्यमंत्री बाबत अपशब्द काढले. तेंव्हा पासून शिंदेसेनेचे पदाधिकारी आक्रमक झाले असून त्यांनी रामचंदानी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. शनिवारच्या घटनेचा पडसाद टाऊन हॉल येथील महायुतीच्या मेळाव्यावर पडला. शिंदेसेनेचे पदाधिकारी मेळाव्याच्या ठिकाणी येऊन भाजपचे शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी कुमार आयलानी यांनी त्यांची समजूट काढण्याचा प्रयत्न केला. मात्र शिंदेसेनेचे पदाधिकारी ऐकण्याच्या परिस्थिती मध्ये नोव्हते. त्यांनी प्रदीप रामचंदानी यांच्यावर कारवाई कारण्यांची मागणी करून घोषणाबाजी केली. यावर तोडगा काढू, असे आश्वासन आयलानी यांनी देऊनही शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मेळाव्यावर बहिष्कार टाकून बाहेर पडले.

महायुतीच्या पहिल्याच मेळाव्यावर भाजप व शिंदेसेनेचे वाद चव्हाट्यावर आल्याने, भाजप उमेदवार कुमार आयलानी यांची कोंडी झाली. मेळाव्याला भाजपचे मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासह माजी खासदार जगन्नाथ पाटील, कुमार आयलानी, प्रदीप रामचंदानी, नरेंद्र राजांनी, जमनुदास पुरस्वानी, राजेश वधारिया, लाल पंजाबी यांच्यासह रिपाई आठवले गट व कवाडे गटाचे शहराध्यक्ष उपस्थित होते. शिंदेसेनेचे उपजिल्हाप्रमुख अरुण अशान यांनी प्रदीप रामचंदानी यांनी मुख्यमंत्री यांच्याबाबत काढलेल्या अपशब्दबाबत माफीची मागणी केली. माफी मागितली नाहीतर, आम्ही भाजपा उमेदवाराच्या प्रचारात नसेल, अशी भूमिका घेतली आहे.

# जेवण बनवण्यावरुन वाद; लोखंडी रॉडने 11 घाव घालून केली हत्या

पिंपरी, दि. ५ : प्रतिनिधी

चिंचवड मध्ये जेवण बनवण्याच्या वादावरून तरुणाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी आरोपी मुकेश हिरा कुसवाह ला अटक केली आहे. दिपू कुमार असं हत्या झालेल्या तरुणाच नाव आहे. हत्येची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुकेश हिरा कुसवाह आणि हत्या झालेला दिपू कुमार यांच्यासोबत इतर तीन तरुण चिंचवड मधील व्ही.के.व्ही कंपनीत काम करत होते.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने दोन महिन्यापूर्वीच दिपू कुमार हा चिंचवडमधील कंपनीत काम करण्यास आला होता. कंपनीत एकूण पाच जण काम करायचे आणि तिथेच राहायचे. जेवण ही तिथेच बनवून खात असायचे. परंतु, शुक्रवारी जेवण बनवण्यावरून मुकेश आणि दिपू यांच्यात वाद झाले. काही वेळानंतर सर्वजण जेवण करून झोपले. दिपू इतर दोन तरुणांसह झोपला. शनिवारी रात्री एकच्या सुमारास मुकेश कुसवाह झोपत नव्हता. तो सतत विचारात होता. त्याला दिपू कुमारचा राग आला होता. याच रागातून झोपेत असलेल्या दिपू कुमारच्या डोक्यात अवघ्या वीस सेकंदात 11 लोखंडी रॉडने वार करून हत्या केली. ही सर्व घटना कंपनीत लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या घटनेनंतर पिंपरी पोलिसांनी मुकेश हिरा कुसवाह ला अटक केली आहे.

# माथेरानमध्ये हातरिक्षा चालकाचा दुर्दैवी मृत्यू

माथेरान, दि. ५ : प्रतिनिधी

माथेरान येथे ब्रिटिश काळापासून अंतर्गत वाहतुकीसाठी हातरिक्षाचा वापर केला जातो. परंतु, रिक्षा चालवताना चालकांना गंभीर शारीरिक ताणाचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते. आज सकाळी, परशुराम उर्फ कालुराम पिरकट (वय 45), जो गेल्या 15 वर्षांपासून हातरिक्षा चालवून उपजीविका करत होता, हॉटेल शालिमार जवळ रिक्षा ओढताना दुर्दैवी मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूमुळे माथेरानमधील हातरिक्षा चालकांच्या समस्यांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

माथेरानमध्ये ई-रिक्षा परवानगी मिळावी, या मागणीसाठी श्रमिक रिक्षा संघटनेने न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने प्राथमिक स्वरूपात सात ई-रिक्षांना परवानगी दिली होती आणि यानंतर आणखी 13 ई-रिक्षांना मंजूरी देण्यात आली. पावसाळ्यात ई-रिक्षा कशा चालतात, याचा अहवाल न्यायालयाला सादर करण्याची सूचनाही दिली होती. तथापि, अजूनही उर्वरित रिक्षांना परवानगी न मिळाल्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा चालू आहे. श्रमिक रिक्षा संघटनेच्या उपाध्यक्ष प्रकाश सुतार यांनी लवकरात लवकर उर्वरित 74 हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा परवानगी मिळावी, अशी मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, ही अत्यंत कष्टप्रद कामे करणाऱ्या रिक्षा चालकांना कायमस्वरूपी ई-रिक्षा परवानगी देऊन त्यांच्या आयुष्यात सुधारणा घडवावी, अन्यथा अशा दुर्दैवी घटनांचा सिलसिला थांबणारना नाही.

# जितेंद्र आव्हाडांनी जनाची नव्हे तर मनाची तरी लाज ठेवावी-आनंद परांजपे संतापले

ठाणे, दि. ५ : प्रतिनिधी

जे स्वत: विनयभंगाची केस दाखल झाल्यावर कुठल्या मनस्थितीत गेले होते त्यामुळे फार त्यांनी बोलू नये. कब्रस्तानमधील मातीचं पाकिट कुणी खाल्लं, टॉरेन्सचं पाकिट महिन्याला कोण घेते या सगळ्या गोष्टी मुंब्रा कळवातील जनतेला माहिती आहे असा घणाघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आनंद परांजपे यांनी जितेंद्र आव्हाडांवर केला आहे.

पत्रकार परिषद घेत आनंद परांजपे म्हणाले की, ज्यांच्यावर विनयभंग, ३०७ गुन्हा आहे. ज्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याची केस आहे. त्यांना नैतिक अधिकार नाहीत. जितेंद्र आव्हाडांच्या पायाखालची वाळू सरकली आहे त्यामुळे त्यांच्या डोक्यात केमिकल लोचा झाला आहे. विकासाची खोटी स्वप्ने लोकांना दाखवली. १५ वर्षानंतर लोक त्यांना प्रश्न विचारतेय. त्यातून विचलित होऊन ते आरोप करतायेत असं त्यांनी म्हटलं.

त्याशिवाय इतिहासाचे खोटे दाखले द्यायचे. मी विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढतोय असं सांगायचे. कळवा ब्रीज ते वाय जंक्शन या पलीकडे एकही पाऊल आव्हाड टाकू शकत नाहीत. डॉ. जितेंद्र आव्हाड पहिल्यांदा मंत्री झाले तेव्हा अजित दादांनी दिलेल्या शब्दामुळे पतीला मंत्रिपद मिळाले असं आव्हाडांच्या पत्नी बोलल्या होत्या. जितेंद्र आव्हाडांनी जनाची नाही तर मनाची लाज ठेवावी असा इशारा परांजपे यांनी आव्हाडांना दिला.

दरम्यान, कळवा मुंब्रा इथं आल्यावर सातत्याने हिंदू मुस्लीम करायचे. कोट्यवधी भारतीयांची आस्था असलेले प्रभू श्रीराम मासांहरी होते असं विधान आव्हाडांनी केले. कायम हिंदू आणि सनातन धर्माचा अपमान करायचा. उत्तर भारतीयांचे शोषण करायचे त्याला कंटाळून उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे मुंब्रा कळवा मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद वाढलेली आहे. मतदारसंघातील जनता त्यांना विकासाचा जाब विचारतेय असंही आनंद परांजपे यांनी सांगितले. तसेच लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही आमची स्पष्ट भूमिका आहे. कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता हे आरक्षण देण्यात यावं अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांच्या निर्णयावर दिली.

# पाण्याच्या टाकीत पडल्याने आठ वर्षीय मुलगा दगावला

## ठेकेदारासह मनपा अधिकारी आणि सुरक्षा सुपरवायझरवर कठोर कारवाईची मागणी

नवी मुंबई, दि.५ : प्रतिनिधी

वाशी सेक्टर १४ येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या गार्डनमध्ये पाण्याच्या टाकीत पडल्याने आठ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकरणी वाशी पोलिसांनी एडीआर (अप्राकृतिक मृत्यू) दाखल करून तपास सुरू केला आहे. घटनेच्या वेळी गार्डनमध्ये सुरक्षा रक्षक उपस्थित नसल्याने मनपाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्थानिक नागरिक आणि संघटनांनी ठेकेदारासह मनपा अधिकारी आणि सुरक्षा सुपरवायझरवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

शनिवारी रात्री वाशी सेक्टर १४ मधील पालवे गार्डनमध्ये दिवाळीमुळे गर्दी होती. याच वेळी, सिद्धार्थ विशाल उघडे (८ वर्षे) नावाचा मुलगा अचानक गायब झाला. शोध घेतल्यावर गार्डनमधील पाण्याच्या भूमिगत टाकीचे झाकण उघडे दिसले, आणि त्यात सिद्धार्थ पडलेला आढळला. त्वरित रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेने मनपाच्या सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटींवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

मनपा अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाईची मागणी

पश्चिम महाराष्ट्र एकता मंचाचे अध्यक्ष योगेश चव्हाण यांनी सांगितले की, घटनेच्या वेळी गार्डनमधील सुरक्षा रक्षक गायब होते, आणि सुपरवायझर अक्षय म्हात्रेने दुसरा गार्ड का तैनात केला नाही, हा प्रश्न गंभीर आहे. या घटनेसाठी ठेकेदार, सुपरवायझर आणि संबंधित मनपा अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. मंचाने मनपा आयुक्त आणि पोलीस आयुक्तांना निवेदन देऊन या प्रकरणात न्यायाची मागणी केली आहे. तसेच, दोषींना वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.या घटनेमुळे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे, आणि मनपाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

## अपघातात 35 वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू

पुणे, दि. ५ : प्रतिनिधी

दिवाळीनिमित्त रस्त्यावर फटाके फोडणाऱ्या ३५ वर्षीय व्यक्तीला भरधाव कारने धडक दिली आहे. या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. १ नोव्हेंबर रोजी पुण्याच्या पिंपरी-चिंचवडमधील रावेत भागात ही घटना घडली. या घटनेचं सीसीटीव्ही फूटेज आता पुढे आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे अद्यापही पोलिसांनी आरोपींचा शोध न घेतल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जातो आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोहम पटेल असं मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री तो त्याच्या रावेत येथील फेलीसिटी सोसायटीसमोर फटाके फोडत होता. यावेळी रस्त्याने जाणाऱ्या भरधाव कारने त्याला जोरदार धडक दिली. त्यामुळे तो रस्त्याच्या बाजुला जाऊन पडला. या भीषण अपघातामुळे त्याच्या डोक्याचा जबर मार लागला. या अपघातानंतर स्थानिकांनी याची माहिती लगेच पोलिसांना दिली.

# यवतमाळकर स्वरकन्येच्या सत्काराला, अभिनेता सचिन येणार



■ **महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि.५:** आपल्या गायनाने महाराष्ट्राला वेड लावणारी यवतमाळ येथील गीत रंजना प्रशांत बागडे ही दूरचित्रवाणीच्या स्टार प्रवाह वाहिनीवरील मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद पर्व ३ महाअंतिम फेरीत पाहोचली आहे. गीतचे कौतुक करण्यासाठी अभिनेता सचिन पिळगावकर बुधवारी यवतमाळात येत आहेत. गीतच्या यशाबद्दल यवतमाळकरांच्या वतीने तिचा नागरी सत्कार बुधवार, ६ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. स्थानिक बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

छोटे उस्ताद कार्यक्रमाचे परीक्षक, अभिनेता सचिन पिळगांवकर यांच्याहस्ते गीतचा सत्कार करण्यात येणार आहे. इयत्ता नववीत असलेली यवतमाळची स्वरकन्या गीत हिने आपल्या विविधांगी गायगाने वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी संगीत क्षेत्रात ओळख निर्माण केली आहे. अनेक वाहिन्यांवर तिने आपल्या गायनाने छाप पाडली. स्टार प्रवाह वाहिनीवरील छोटे उस्ताद कार्यक्रमात महाअंतिम फेरीत ती पोहचली आहे. त्यानिमित्त यवतमाळात तिचा नागरी सत्कार व लाईव्ह कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले आहे. गीतच्या गायनाचे चाहते असलेले अभिनेते सचिन पिळगांवकर हे ६ नोव्हेबरला स्वत: गीतच्या घरी जावून तिचे अभिनंदन करणार असून त्यांनतर सायंकाळी वाजता यवतमाळ शहरात काढण्यात येणाऱ्या स्वागत रॅलीत ते गीतसोबत सहभागी होणार आहेत. त्यांच्याच हस्ते गीतचा नागरी सत्कार कार्यक्रमस्थळी होणार आहे. त्यानंतर गीतच्या गाजलेल्या गीतांचा स्वरदीपोत्सव हा लाईव्ह कार्यक्रम सादर होणार आहे.

गीतने यापूर्वी झी टिव्हीवरील सारेगमप लिटील चॅम्प, सोनी टिव्हीवरील सुपरस्टार सिंगर आदी कार्यक्रमांत सहभागी होत पुरस्कार पटकाविले आहेत. स्टार वाहिनीवर आता ती अंतिम फेरीत पोहोचली असून, तीच विजयी होईल, असा विश्वास व्यक्त करत यवतमाळच्या चाहत्यांनी तिचा नागरी सत्कार आयोजित केला आहे. वयाच्या चवथ्या वर्षापासून गीत गाणे गात आहे. सुगम, शास्त्रीय, रॅप, कव्वाली, गझल असे सर्व प्रकार ती सहजपणे हाताळते.

त्यामुळे तिच्या प्रत्येक गाण्यावर रसिक वन्समोअर ची दाद देतात, असा अनुभव तिचे वडील प्रा. प्रशांत बागडे यांनी सांगितला. पहाटे उठल्यानंतर दररोज एक तास रियाज आणि रात्री झोपण्यापूर्वी ती नियमित रियाज करते. गीतने शास्त्रीय संगीताचे धडे अमरावती येथील

# माझी लढत देवेंद्र फडणवीस यांच्याशीच



■ **महासागर प्रतिनिधी,**
**वर्धा, दि. ५:** विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज परत घेण्याची प्रक्रिया आटोपली आहे. आरोप प्रत्यारोप तसेच खुलासे सूरू झाले आहेत. सर्वाधिक लक्षवेधी चर्चा आजवर आर्वी मतदारसंघात भाजप उमेदवारीवरून झाली. आता कॉंग्रेस गोटात आरोप फेटाळून लावणे सूरू झाले आहे. खासदार अमर काळे यांनी पत्नी मयुरा काळे यांच्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची उमेदवारी खेचून आणली. त्यावर त्यांना आरोपाच्या पिंजऱ्यात उभे केल्या जात आहे. त्यावर खासदार अमर काळे यांनी एका स्थानिक वृत्तवहिनी सोबत बोलतांना खुलासा केल्याचे दिसून आले आहे.

ते म्हणतात उमेदवार पत्नी मयुरा काळे यांनी कुठेच अर्ज केला नव्हता. पक्षानेच स्पष्ट केले की तुम्हालाच उभे रहावे लागेल. म्हणून माझा नाईलाज झाला. आमची लढत सुमित वानखेडे किंवा दादाराव केचे यांच्याशी नाही. लढत देवेंद्र फडणवीस यांच्याशी आहे. नॉट रिचेबल हा आरोप खोटा आहे. मी उपलब्ध असतोच. मात्र या निवडणुकीनंतर भेटीगाठी साठी दिवस ठरवू. तसे नियोजन करू, असा खुलासा त्यांनी केला.

घराणेशाहीच्या आरोपवर ते विचारतात की मग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत काय म्हणाल? एक खरं की खासदार काळे हे आरोप फेटाळून लावतात. मात्र फडणवीस यांचे ओएसडी असा उल्लेख करीत ते थेट देवेंद्र फडणवीस यांच्याशी सामना असल्याचे दाखवून प्रसंग बाका असल्याचे दाखवून देत आहे. तसेच आम्ही कुणाशी लढलो, हे एक वाट मोकळी ठेवत असल्याचे आर्वीचे सुजाण सांगतात. कारण वानखेडे यांना फडणवीस यांच्या प्रभावातून आर्वी, कारंजा व आष्टी या मतदारसंघातील तीनही तालुक्यात अनेक कामे मार्गी लावण्यात यश आले.

तो त्यांचा यूएसपी असल्याचे भाजप नेते म्हणतात आणि लोकांची कामे होत असेल तर चूकीचे काय, असे विचारतात. विद्यमान आमदार केचे यांना पुढील भवितव्याची हमी देत वानखेडे पक्के झाले. त्यामुळे खासदार काळे लढत फडणवीस यांच्याशीच असे म्हणत आहे. पण तिकीट आणतांना सासुरवाडीचा प्रभाव कामात आणणारे काळे सत्ताधारी प्रभावातून आलेल्या उमेदवारीवर टीका करू शकतात कां, असा प्रश्न चर्चेत आहे.

काळे यांचे गणगोत राजकीय प्रभाव राखून

# माघारीनंतर जिल्ह्यात १६० उमेदवार रिंगणात, सर्वाधिक २६ बडनेऱ्यात

स महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ५: नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस (४ नोव्हेंबर) आटोपल्यानंतर जिल्ह्यात आता १६० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत. छाननीअंती जिल्ह्यात २४८ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी ८८ जणांनी माघार घेतल्यामुळे १६० ही संख्या पुढे आली आहे. सर्वाधिक २६ उमेदवार मेळघाट मतदारसंघात उरले असून सर्वात कमी ही संख्या मेळघाट मतदारसंघाची आहे.



दरम्यान गेल्या तीन-चार दिवसांत डॅमेज कंट्रोल राबविल्यामुळे भारतीय जनता पक्षाने माजी आमदार प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) व रविराज देशमुख (तिवसा) यांना आपली उमेदवारी मागे घेण्यास बाध्य करुन तेथील बंडखोरी टाळली. प्रशासकीय यंत्रणेनुसार गेल्या ३१ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. पहिल्या दिवशी केवळ दोन उमेदवारांनी धामणगाव रेल्वे मतदारसंघातून माघार घेतली होती. उर्वरित जणांनी आज, शनिवारी शेवटच्या दिवशी निवडणुकीचे मैदान सोडले. त्यामुळे उमेदवारी मागे घेणाऱ्या एकूण उमेदवारांची संख्या ८८ वर पोचली आहे.

माघारीनंतर बडनेरा मतदारसंघात २६, धामणगाव रेल्वेत २४, अमरावती व अचलपुर येथे प्रत्येकी २२, मोर्शीत १४, दर्यापुर व तिवसा येथे प्रत्येकी १६ तर मेळघाट विधानसभा मतदारसंघात१५ उमेदवार मैदानात उरले आहेत. दुसरीकडे सर्वाधिक २० उमेदवारांनी तिवस्याचे मैदान सोडले.

तर दर्यापुरमधून १६, बडनेऱ्यातून १४ आणि मोर्शीतून १० जणांनी माघार घेतली.

# तरोडा येथे पारावर गाई चढविणे, घोंगडीवर गाई बसवण्याची स्पर्धा



## ५० वर्षापासून परंपरा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**आर्णी , दि.५:** तालुक्यातील तरोडा येथे मारोती संस्थान व यात्रा उत्सव समितीच्या वतीने दिवाळीच्या पर्वावर मारोती मंदिराच्या पारावर गाई चढविणे व घोंगडीवर गाई बसवण्याची स्पर्धा घेण्यात आली.

ही गेल्या ५० वर्षापासून परंपरा आहे. तरोडा गावाला लागुन असलेल्या अडाण नदीच्या काठावर पुरातन मारोती मंदिर आहे. येथे दरवर्षी गाई चढवण्याची आणि घोंगडीवर गाई बसवण्याची स्पर्धा घेण्यात आली. यावेळी सरपंच रामजी कुमरे, ठाणेदार केशव ठाकरे, जमादार अरुण चव्हाण, उपसरपंच राहुल महल्ले, संस्थानचे अध्यक्ष गोपाल भोयर, पोलिस पाटील आशिष रहाटे, प्रकाश महल्ले, नाना महल्ले, राजाभाऊ भोयर तसेच मंदिराचे विश्वस्त मंडळ आणि गावकरी उपस्थित होते. यावेळी घाटंजी कोळी (खुर्द ) येथील हार्दिक राठोड या दहा वर्षाच्या चिमुकल्याने डफडीच्या तालावर व बासरीच्या सुरावर गाई घोंगडीवर बसवून सर्वाचे लक्ष वेधले होते. मारोतीच्या मंदीराच्या पारावर गाई चढवणे व घोंगडीवर गाई बसवणे या स्पर्धेत तालुक्यासह यवतमाळ, घांटजी येथील गुराख्यांनी सहभाग

# नॅचरल शुगरचे ८ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित

■ **महासागर प्रतिनिधी,**
**महागाव , दि.५:** तालुक्यातील गुंज येथील नॅचरल शुगर अॅण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. युनिट नं. २ च्या विस्तारीत नवव्या गळीत हंगामाचा शुभारंभ नुकताच पार पडला. या वेळी मागील गळीत हंगामात सर्वाधिक ऊस तोडणी वाहतूक करणारे कंत्राटदार स्वनील पंजाबराव कदम व त्यांच्या पत्नी संध्या स्वनील कदम यांच्या हस्ते बॉयलरअग्नि प्रदिपन करण्यात आले. कृषीरत्न भैरवनाथ ठोंबरे, चेअरमन व कार्यकारी संचालक नॅचरल उद्योग समुह यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच कृषिभूषण पांडूरंग आवाड, संचालक, संभाजीराव रेड्डी, संचालक यांच्या उपस्थितीत धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर हा शुभारंभ सोहळा पार पडला. या



कार्यक्रमाला परिसरातील गणमान्य अतिथी, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी हजेरी लावली.

यावर्षी शेतकऱ्यांनी कारखान्याकडे एकूण हजार हेक्टरच्या ऊस नोंदी केल्या आहेत. एकूण आठ लाख मे.टन गाळपाचे टार्गेट निश्चित बॉयलरच्या शुभारंभ कार्यक्रमात मशिनरी पुरवठादार, सिव्हील कॉन्ट्रेक्टर यांचा वेळेत काम केल्याबद्यल ठोंबरेंच्या हस्ते सत्कार कराण्यात आला.

प्रास्ताविक संचालक कृषीभूषण पांडूरंग आवाड व आभार प्रदर्शन संभाजीराव रेड्डी यांनी केले. या प्रसंगी चितांगराव कदम, सविता कदम, ख. वी. संघाचे अध्यक्ष विशाल पवार, गोविंदराव देशमुख आदी उपस्थित होते.

# दिवाळीनंतर शहरातकचऱ्याचे ढीग साचले

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ५ :** शहरात दोन दिवसांपूर्वी दिवाळी आणि त्यानंतर पाडवा व भाऊबीजेचा सण साजरा झाला. दिवाळीनिमित्त फटाक्यांची जोरदार आतिषबाजी झाली. या फटाक्यांचा कचरा तसेच घरोघरी आणलेल्या नवीन वस्तू, खाद्य पदार्थ, मिठाईचे बॉक्स,प्लास्टिकच्या पिशव्या आदींच्या कचऱ्याने शहरातील वस्ती वसाहतीमधील नाल्या तुंबल्या आहेत. शहरातील रस्त्यांवर व रस्त्याच्या कडेला तसेच सर्व्हिस गल्लयांमध्ये कचऱ्याचे ढीग लागले आहेत. मनपाचे कर्मचारी मात्र अजून सुटीच्याच मूडमध्ये असल्याने साफसफाईसाठी नियमितपणे बाहेर पडलेले नाहीत.

दिवाळीनिमित्त शहरातील गांधी रोड, फतेह चौक, भाजी बाजार, टिळक रोड, पंचायत समिती रोड, महापालिका रोड, खुले नाट्यगृह, बसस्थानक चौक, टॉवर चौक, जयहिंद चौक, डाबकी रोड, शिवाजी नगर, सिटी कोतवाली, अशोक वाटिका परिसर तसेच तुकाराम चौक मलकापूर, कौलखेड चौक, जठारपेठ चौक, उमरी आदी भागांमध्ये विक्रेत्यांनी ठाण मांडले होते. शुक्रवारी दुपारीच अनेक विक्रेते आपापले साहित्य, झेंडूची फुले, केळीची पाने जागेवरच सोडून निघून गेले. त्यामुळे शहरातील अनेक ठिकाणी कचरा साचला आहे.

# आव्हान चान्सलर्स ब्रिगेड-२०२४

## महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे विद्यापीठात आयोजन

## महाराष्ट्रातील २३ विद्यापीठांचे १०४८ विद्यार्थी सहभागी होणार



■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ५:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आव्हान -२०२४ चान्सलर्स ब्रिगेड या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे ७ ते १६ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.०० वा. होणार असून समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, उद्घाटक म्हणून एन.डी.आर.एफ., पुणे येथील श्री संतोष सिंग, प्रमुख अतिथी म्हणून अमरावती शहर पोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, श्री भैय्यासाहेब मेटकर, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. नितीन चांगोले यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

### २३ विद्यापीठांचे १०४८ विद्यार्थी सहभाग घेणार

सदर शिबिरामध्ये महाराष्ट्रातील २३ विद्यापीठांतील ६०४ मुले व ४४४ मुली असे एकूण १०४८ विद्यार्थी व त्यांच्या सोबत ७२ चमू व्यवस्थापक सहभागी होणार आहे.

### प्रशिक्षणात मिळणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

प्रशिक्षणार्थींना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण एन.डी.आर.एफ. पुणे यांचे चमूकडून देण्यात येणार आहे. प्रशिक्षणार्थ्यांना अग्निसुरक्षा, अग्निरोधक, जंगलाची आग, भूकंप, ज्वालामुखी, भुस्खलन, सर्पदंश, ढगफुटी, चक्रीवादळ, जैविक व रासायनिक आपत्ती, आण्विक आपत्ती, पुरग्रस्त व्यवस्थापन, रोप रेस्क्यू, प्रथमोपचार, त्सुनामी अशा विविध आपत्ती व्यवस्थापनाचे धडे प्रशिक्षणातून दिले जाणार आहे. नऊ दिवस चालणा-या या आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचा समारोपीय समारंभ १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.०० वा. होणार असून समारंभाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार आहेत. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी श्री सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संजिता मोहपात्रा, प्र-कुलगुरूडॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. आर.डी. सिकची, डॉ. अविनाश बोर्डे, डॉ. विद्या शर्मा उपस्थित राहणार आहेत.

समारंभाला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश


**Format C-1**

Declaration about criminal cases

(For candidate to publish in Newspaper, TV)

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil ) No. -536 of 2011 (Public Interest Foundation & Ors Vs. Union of India & Anr)

Name and Address of candidate : **Girish krishnarao Pandav**
Name of political party : **Indian National Congress**
(Independent candidates should write "Independent" here)
Name of Election : **Legislative Assembly Maharashtra State**
*Name of Constituency : **53 - Nagpur South**

I Girish krishnarao Pandav (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A)** Pending criminal cases

| SL No. | Name of Court | Case No. and dated | Status of Case(s) | Section (s) of Acts concerned and brief description of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1 | JMFC Court Nagpur | S.C.C.14094/2024 | Pending | 143,341,291 of IPC & 135 of Maharashtra Police Act. Unlawful Assembly disobeying order during political agitation |
| 2 | JMFC Court Nagpur M.V. Court | S.C.C.2788/2023 | Pending | 288,269,of IPC & 135 of Maharashtra Police Act. Negligent Conduct disobeying order during political agitation |
| 3 | JMFC Court Nagpur M.V. Court | S.C.C.13006/2022 | Pending | 288,269,of IPC & 135 of Maharashtra Police Act. Negligent Conduct disobeying order during political agitation |
| 4 | JMFC Court Nagpur | S.C.C 411/2021 | Pending | 188,269,270 of IPC & 51B of Disaster Management Act. disobeying order during political agitation |

(B) Deatails about cases of conviction for criminal offences

| SL No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence (s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1 | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

***in the case of election to Council of States or Election to Legislative Council by MLAs, Mention the election concerned in place of name of constituency**

# धगधगत्या इतिहासाचे दुर्दैवी विस्मरण

केवळ सत्ता प्राप्तीसाठी चटावलेल्या महाराष्ट्राला धगधगत्या इतिहासाचे विस्मरण पडल्याची टीका सुप्रसिद्ध लेखक विश्वास पाटील यांनी एका पोस्टद्वारे केली आहे. मराठ्यांना गनिमी काव्याचा महामंत्र देणाऱ्या व दिल्लीकर जहांगीर बादशहाच्या लष्कराला पाणी पाजणाऱ्या भातवडीच्या युद्धाला चार दिवसाआधी ४०० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने विश्वास पाटील यांनी एक विस्तृत पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी राज्यातील सध्याच्या राजकारणावर भाष्य करत सत्ताप्राप्तीसाठई चटावलेल्या महाराष्ट्राला सध्या आपल्या धगधगत्या इतिहासाचे विस्मरण झाल्याची खंत व्यक्त केली आहे.

---------------



शिवरायांसह तमाम मराठ्यांना गनिमी काव्याचा धडा शिकवणारे भातवडीचे युद्ध ऑक्टोबर सोळाशे चोवीसच्या अखेरीस घडले होते. जिथे शहाजीराजे व मलिक अंबरने दिल्लीच्या व विजापूरच्या एक लाख फौजेची आपल्या फक्त चाळीस हजार सैन्यानिशी धूळदाण केली होती. त्या घनघोर युद्धाला आज ४०० वर्षे पूर्ण झाली. ज्या युद्धामध्ये जिजाऊ साहेबांचा ऐन विशीतला लाडका दीर आणि शिवरायांचे चुलते शरीफजीराजे भोसले हुतात्मा झाले होते. तो प्रसंग अहमदनगर पासून फक्त ११ मैलावरील भातवडी गावात घडला होता.

खरे तर, मराठ्यांच्या इतिहासालाच कलाटणी देणाऱ्या या घटनेचे स्मरण महाराष्ट्रभर दारोदारी दिंड्यापताका फडकवून व्हायला हवे होते. मात्र राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी चटावलेल्या आजच्या मानी मराठ्यांना व या भूमीला या पवित्र युद्धाचे विस्मरण घडावे ही किती दुर्दैवी बाब आहे.

जिथे आपल्या भूत आणि भविष्यासाठी हुतात्म्यांचे सडे पडले. तोफा धडाडल्या. दुश्मनांचा नायनाट झाला, त्या स्फूर्तीदायी इतिहासामागे आपण धावायला हवे. पण आजकाल ज्या दिशेने मीडियाचा कॅमेरा फिरतो त्या दिशेनेच सर्वजण धावत असतात.

**विश्वास पाटील**

भातवडीच्या युद्धात जेव्हा दिल्लीकर मोगलांचा सेनानायक मनचेहर हा आपल्या तीनशे हत्तींचे दल घेऊन रणांगणात हाहाकार माजवत होता. तेव्हा त्याचा माज उतरवण्यासाठी शरीफजी भोसले घोडा फेकत निघाले. त्यांनी आपल्या थोरल्या भावाला, शहाजीराजांना शब्द दिला होता की, ह्मोगलांच्या बलाढ्य हत्तीदलाचा नायनाट केल्याशिवाय मी काय, माझा मुडदाही आपल्या भेटीस माघारा येणार नाही दादा. दिल्या शब्दाप्रमाणे शरीफजी आणि हंबीरराव चव्हाणने ते प्रचंड हत्तीदल धुळीस मिळवले होते.

दुश्मनांच्या हजारो तलवारींच्या पात्यांचा नायनाट आपल्या बुद्धीच्या एका समशेरीने कसा करता येतो, त्याचे तंत्र शहाजीराजांनी या युद्धापासूनच आत्मसात केले. अन् तोच महामंत्र शिवरायांना बेंगलोरच्या किल्ल्यात प्रात्यक्षिकासह शिकवला होता. त्याच महामंत्रावर आपला सारा इतिहास घडला होता. दुर्दैवाने आज त्या महाप्रसंगाचे आम्हा सर्वांना विस्मरण व्हावे, यासारखी दुर्दैवी गोष्ट दुसरी असू शकत नाही.

सिंधुदुर्ग मधील शिवरायांचां पुतळा पडला म्हणून मराठवाड्यापासून सर्वजण तिकडे धावले. परंतु आजच्या अहिल्यानगर पासून म्हणजेच अहमदनगर पासून अवघ्या अकराव्या मैलावर, म्हणजेच आपल्या उंबरठ्याशी घडलेल्या या महाप्रसंगाचे सर्वांना विस्मरण घडावे, हे आपल्या भूमीचे दुर्दैव आहे.

आज नगर जिल्ह्याच्या तालुक्या तालुक्यामध्ये सत्तेचा सारीपाट, राजकीय प्रचार व चिखलफेक सुरू आहे. त्यातून नव्या पिढीने थोडी सवड काढून भातवडीच्या रानात जाऊन त्या राष्ट्रासाठी धारातीर्थी पतन पावलेल्या शरीफजी भोसलेंच्या बाजूला पडलेल्या समाधीवर फुलांच्या चार ओंजळी जरूर वाहव्यात. वर मी दिलेल्या छायाचित्रात या समाधीची किती दुरावस्था झाली आहे हे आपल्या लक्षात येईल .

केवळ प्रसिद्धीसाठी शिवराय आणि संभाजीराजे यांचे उंच उंच पुतळे उभे करायचे. मात्र त्यांच्याच इतिहासातील ख?्या घटनांप्रसंगांचा आणि भातवडी सारख्या धगधगत्या स्फूर्तीदायी अग्निकुंडांचा विसर पडू द्यायचा हे या भूमीच्या भवितव्यासाठी फारसे काही चांगले नाही, असेच मला वाटते.

या लढाईचे वर्णन प्रत्यक्ष साक्षीदार परमानंदस्वामी यांनी आपल्या शिवभारतामध्ये केलेले आहे. डॉक्टर बाळकृष्ण यांनी आपल्या शिवाजी द ग्रेट या ग्रंथाच्या पहिल्या खंडात त्याबाबत विस्ताराने लिहिली आहे. मी माझ्या शिवरायांच्या जीवनावरील महासम्राटह्व कादंबरीच्या झंजावात या पहिल्या भागातही या लढाईचे संपूर्ण वर्णन केलेले आहे, वाचकांनी तो स्फूर्तीदायी इतिहास जरूर वाचावा.

या निमित्ताने भातवडीच्या युद्धात रणरंग खेळून कीर्तिमान होणाऱ्या शहाजीराजे, शरीफजी भोसले, मलिक अंबर, हंबीरराव चव्हाण, दत्ताजी नागनाथ, मंबाजी भोसले, नरसिंह पिंगळे, मुधोजी फलटणकर, विठोजी काटे अशा तमाम बहादराना माझा मानाचा मुजरा.

***काळाच्या मांडीवरी पहुडला***
***मर्द शरीफजी ज्या सम्रांगणात***
***चला वाहू फुले तिथे अन***
***ओवाळू आसवांची वात!***

●●●●●●●

# औरंगजेबाच्या देहाची आणि कीर्तीची कबर खोदणारी!

**(महाराणी ताराबाई भोसले पुण्यस्मरण विशेष.)**

राजाराम महाराजांच्या निधनानंतर राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेऊन महाराणी ताराबाईंनी मोगली फौजांना मागे सारण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी मराठेशाहीतील मुत्सद्यांना काळाचे गांभीर्य समजावून देऊन शेवटपर्यंत या सगळ्यांबरोबर एकजुटीने राहून शत्रू थोपवून धरला. त्या स्वतः लष्करापुढे येऊन लष्कराचा आत्मविश्वास वाढवित असत. मराठ्यांची खालावलेली आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी त्यांनी मोगली मुलुखावर स्वाऱ्या करून चौथाई आणि सरदेशमुखी गोळा करून आर्थिक बळ वाढवले.

----------------



महाराणी ताराबाई (१६७५ - १७६१) या छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. ताराबाईंचे लग्न छत्रपती राजाराम महाराजांशी सन १६८७च्या सुमारास झाले. दि. २५ मार्च १६८९ रोजी मोगलांनी रायगडास वेढा घातला असता त्या छत्रपती राजाराम यांच्यासह रायगडावरून निसटून गेल्या. छत्रपती राजाराम जिंजीला गेल्यानंतर महाराणी ताराबाई, राजसबाई व अंबिकाबाई या विशाळगड येथे राहिल्या. रामचंद्रपंत अमात्य यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विशाळगड येथे लष्करी व मुलकी व्यवहाराची माहिती घेतली. सन १६९४ साली त्या तिघी जिंजीला पोहचल्या. दि. ९ जून १६९६ रोजी महाराणी ताराबाईंना शिवाजी (दुसरा) हा पुत्र झाला.

ताराबाईंनी करवीर राज्याची म्हणजे कोल्हापूरच्या राजगादीची त्यांनी स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजीमहाराज यांच्यामागे त्यांनी समर्थपणे राज्याची धुरा सांभाळली. सरसेनापती संताजी, धनाजी यांना बरोबर घेऊन त्यांनी मोगलांना सळो की पळो करून सोडले.

ताराबाई औरंगजेबाच्या प्रचंड मुघल सैन्याविरुद्ध उभ्या ठाकल्या असताना केवळ २४ ते २५ वर्षांच्या होत्या. त्यांनी औरंगजेबासारख्या मुत्सदी, नृशंस व कपटी सम्राटाशी सलग साडेसात वर्षे लढा दिला. तत्कालीन कवि गोविंद यांनी ताराबाईच्या शौर्याचे वर्णन असे केले आहे-

***दिल्ली झाली दीनवाणी दिल्लीशाचे गेले पाणी***
***ताराबाई रामराणी भद्रकाली कोपली***
***ताराबाईच्या बखते दिल्लीपतीची तखते***
***खचो लागली तेवि मते कुराणेही खंडली***
***रामराणी भद्रकाली रणरंगी क्रुद्ध झाली***
***प्रलयाची वेळ आली मुगलहो सांभाळो***

सन १७०० साली छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याचे उत्तराधिकार छत्रपती शाहू महाराजांकडे वारसाहक्काने जाण्यास हवे होते. शाहूराजे त्यावेळी वयाने खूपच लहान होते आणि नंतरच्या काळात मोगलांच्या कैदेत होते.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

ताराबाईंनी आपला मुलगा शिवाजी ह्याला गादीवर बसवले आणि रामचंद्रपंत अमात्य यांच्या सल्ल्याने मराठा राज्याचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. मोगलांनी औरंगजेबाच्या मृत्यूनंतर संभाजी राजांचे पुत्र शाहू यांची सुटका करताना महाराष्ट्रात दुहीचे बीज पेरले. शाहू हेच मराठा राज्याचे उत्तराधिकारी असल्याचे अनेक सरदार, सेनानी यांना वाटू लागले.

दोन्ही बाजूंनी छत्रपतीपदाच्या वारसा हक्कावरून संघर्ष सुरू झाला. या काळात ताराबाईच्या पक्षातले खंडो बल्लाळ, बाळाजी विश्वनाथ, धनाजी जाधव यांसारखे सेनानी आणि मुत्सद्दी शाहूंच्या पक्षात गेले. शाहूराजांनी महाराणी ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी दुसरा यांच्याविरुद्ध युद्ध पुकारले.

सन १७०७ साली खेड येथे झालेल्या लढाईत बाळाजी विश्वनाथ ह्या पेशव्याच्या कुशल नेतृत्वाखाली शाहूराजांची सरशी झाली. ताराबाईंनी जिंकलेले सर्व किल्ले शाहूला मिळाले. शाहूच्या पक्षात गेलेले बाळाजी विश्वनाथ यांनी ताराराणीच्या पक्षातील उदाजी चव्हाण, चंद्रसेन जाधव, कान्होजी आंग्रे, पिलाजी गोळे आदी सेनानींना शाहूच्या बाजूला वळवून घेतले. त्यामुळे शाहूचा पक्ष बळकट झाला.

शाहूंनी साताऱ्याला गादीची स्थापना केली आणि ताराबाईंनी साताऱ्याहून माघार घेऊन, कोल्हापूर येथे वेगळी गादी स्थापन केली. परंतु सन १७१४ मध्ये राजारामची दुसरी विधवा पत्नी राजसाबाई यांनी ताराबाईस पदच्युत करून स्वतःचा मुलगा संभाजी (दुसरा) याला गादीवर बसवले. ताराबाई आणि तिच्या मुलाला दुसऱ्या संभाजीने कैद केले. शिवाजी (दुसरा) सन १७२६ मध्ये मरण पावला. ताराबाईनंतर सन १७३०मध्ये छत्रपती शाहूंशी समेट करून कोणताही राजकीय अधिकार न ठेवता सातारा येथे राहावयाला गेल्या.

सन १७००साली जिंजी मोगलांच्या ताब्यात आली. पण तत्पूर्वी राजाराम जिंजीहून निसटून महाराष्ट्रात परतले. ताराबाई व इतर लोक मात्र मोगलांचा सेनापती जुल्फिखारखान यांच्या तावडीत सापडले. पण जुल्फिखारखानने सर्वांची मुक्तता केली. दि. ३ मार्च १७०० रोजी छत्रपती राजाराम यांचा सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाल्यानंतर मराठी साम्राज्याची सूत्रे ताराबाईंच्या हाती आली.

त्यांच्या सैन्यामध्ये बाळाजी विश्वनाथ, उदाजी चव्हाण, चंद्रसेन जाधव, कान्होजी आंग्रे, पिलाजी गोळे, गिरजोजी यादव आदी मातबर सेनानी होते. त्यांनी मोगलांची पळता भुई थोडी अशी अवस्था केली. सन १७०५ साली त्यांनी मोगलांच्या ताब्यातील पन्हाळा किल्ला जिंकून कारंजा ही राजधानी बनविली.

पुढे शाहूच्या मध्यस्थीने ताराबाईंची कैदेतून सुटका झाली. त्यानंतर त्या सातारा येथे राहावयास गेल्या. सन १७४०च्या दशकात शाहूच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षात ताराबाईंनी त्यांच्याकडे एक मूल आणले, राजाराम दुसरा- ज्याला रामराजा देखील म्हटले जाते. तिने मुलाला आपला नातू आणि शिवाजी महाराजांचा थेट वंशज म्हणून सादर केले तिने असा दावा केला की त्याच्या संरक्षणासाठी तो जन्मल्यानंतर लपविला गेला होता आणि एका राजपूत सैनिकाच्या पत्नीने त्याला वाढवले होते. ह्या मुलाला शाहूने दत्तक घेतले कारण त्याला स्वतःचा मुलगा नव्हता.

सन १७४९ मध्ये शाहूच्या मृत्यूनंतर राजाराम द्वितीय त्याच्यानंतर छत्रपती झाला. जेव्हा पेशवा बालाजी बाजीराव मुघल सरहद्दीवर रवाना झाला, तेव्हा ताराबाईंनी राजाराम द्वितीयला बालाजी बाजीराव यांना पेशव्याच्या पदावरून काढून टाकण्यास उद्युक्त केले. जेव्हा राजाराम यांनी नकार दिला, तेव्हा दि. २४ नोव्हेंबर १७५०रोजी तिने त्याला सातारा येथील अंधारकोठडीत कैद केले.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात )**

●●●●●●●

# आपल्या स्वप्नांचे गोकुळ..!

स्वप्नांचे गोकुळ म्हणजे आपल्याला समजायला लागले तेव्हापासून आपण आपल्या आवडत्या गोष्टीला, वस्तूला, व्यक्तीला किंवा एखाद्या प्रिय ठिकाण याविषयी मनातल्या मनात त्याविषयक आठवण बंद डोळ्यांनी आपण घेत असतो. स्वप्नं म्हणजे काय ? तर एखांदा भ्रामक, पोकळ विचार. स्वप्नांचा अर्थ जर सांगायचा झाला तर न टिकणारी गोष्ट, मिथ्या जग असं आपण म्हणू शकतो.

---------------------

स्वप्नेही चांगली, वाईट बऱ्याचदा भीतीदायक ही असतात. हीच स्वप्ने आपल्याला अधून मधून झोपेमध्ये पडत असतात. पण का पडतात. तर आपण झोपायच्या अगोदर जास्त विचार एखाद्या विषयाला घेऊन केलेला असेल. किंवा एखाद्या व्यक्तीला, एखाद्या वस्तूचा विचार केला असेल तर नकळत आपल्याला त्या विषयाला घेऊन स्वप्ने पडतात. काही स्वप्न खूप चांगली असतात. आणि ती बघतानाही खूप चांगलं वाटत असते. पण अचानक कोणी आवाज देतो आणि आपली झोप खुलून जाते. मग आपण म्हणतो की मला आज हे स्वप्न पडलेलं होतं.

सहसा त्याचा काही अर्थ निघत नाही. पण स्वप्न पडतात हे मात्र नक्की. बऱ्याचदा आपण एखादा भीतीदायक चित्रपट बघितला तर आपल्याला रात्रभर झोप येत नाही. तेच ते विचार ते चित्रपटाला घेऊन येत असतात. आणि मग नकळतच अर्ध्या रात्री आपल्याला स्वप्न पडते. आणि आपण भीतीमुळे घाबरतो. उठून बसतो. एक भीती आपल्या मनात निर्माण झालेली असते. पण मग आपली आई किंवा घरातील मोठी माणसे आपल्याला लक्षात आणून देतात की आपण चित्रपट बघितला होता. त्यामुळे तशी स्वप्न आपल्याला पडलेली आहे. भीतीदायक स्वप्ने ही बालपणात काही जास्त पडतात. मोठे झाल्यावर मात्र आपण खोल खड्ड्यात पाय पडलेलो आहे हा भास नेहमीच होतो.

तसेच चांगले स्वप्न पडले तर चांगलं वाटते. वाईट स्वप्न पडली तर वाईटही वाटते. आणि जर भीतीदायक पडली तर खूप भीतीही वाटत असते. पण या सर्व स्वप्नांचा काही अर्थ निघत नाही. म्हणूनच तर म्हणतात ना स्वप्न म्हणजे काय तर मनुष्याला निद्रावस्थेत असतांना जागृत असल्याप्रमाणे सृष्टीतील गोष्टीचा भास होणे म्हणजे स्वप्नं. पण बरीच स्वप्नही आपण उघड डोळ्यांनी बघत असतो. तसेही स्वप्न हे आपल्या हक्काचे मनोराज्य आहे.

आपण रात्रीला अंथरुणावर गेल्यानंतर आपण झोपेत असताना आपण काही लवकर झोपत नाही. अगोदर आपण सकाळपासून काय काय केलेले आहे. याचा विचार आपण करत डोळे बंद करत, आपण आठवत असतो. आणि काही विषयाला घेऊन आपण पुढच्या भविष्याचा विचार करत असतो. काही चांगले, काही वाईट असे दिवसभरात मिळालेले अनुभव आपल्याला आलेले असतात.

आपल्या मित्र-मैत्रिणी आपल्या घरातील लोक, आपली आई. यातील काही निवडक गोष्टी या आपण मनातल्या मनात आठवत असतो आणि बऱ्याचदा ज्या मिळणार नाही त्याही गोष्टी आपण बंद डोळ्यांनी स्वप्नात उतरवण्याचा प्रयत्न करत असतो. डोळे मिटून किती तरी संदर्भ त्या विषयाची मांडत असतो. जी गोष्टी आपण प्रत्यक्ष करू शकत नाही त्या गोष्टी आपण बंद डोळ्यात साठवून ठेवतो. प्रिय व्यक्तीची आठवण काढत बरीच स्वप्नं रंगवत असतो. जेव्हा की त्या स्वप्नांना काही अर्थ नसते. पण ते तसं झालं पाहिजे.

हे मात्र आपण स्वप्नामध्ये बघत असतो. जणू भविष्यात काय करायचे आहे. या विषयाचे नियोजनच आपण करत असतो. एखाद्या प्रिय व्यक्तीला भेटल्यानंतर काय बोलायचं, कसं वागायचं या सर्व गोष्टीचा आपण डोळे बंद करून विचार करत असतो.

त्या नंतर नकळतच आपल्याला झोप येते. स्वप्न बघणं आणि ते प्रत्यक्षात आणण्याचा धाडस करणं यामध्ये अंतर आहे. पण मात्र आपण स्वप्नांमध्ये त्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष करण्याचा धाडसही करतो. स्वप्नांच्या माध्यमातून आपल्याला हव्या त्या गोष्टी आपल्याला मिळालेल्या असतात. म्हणजे प्रत्यक्षात जरी मिळाल्या नाही तरी त्या स्वप्नांच्या माध्यमातून मिळालेल्या आहे. याची जाणीव खूप मोठा आनंद देऊन जाते. मी मोठा झाल्यावर काय करेल. मी काय बनेल. हे आपण स्वप्नामध्ये बघत असतो. बऱ्याचदा पेपर झाल्यानंतर आपल्याला किती मार्क मिळणार आहे.

आपण पास होणार की नाही. याचाही विचार आपण स्वप्नात करत असतो. आपण स्पर्धा परीक्षा देत असाल तर आपण जे वाचतो ती माहिती पानासहित कोणत्या पानावर लिहिलेली आहे या ही गोष्टी आपल्याला स्वप्नामध्ये दिसत असतात.

कोणत्या पानावर काय लिहिलेल आहे. हे मात्र आपल्याला स्वप्नामध्ये याचा भास होत असतो. एखादी व्यक्ती एखांद्या व्यक्तीचा प्रेमात पडलेली असेल तर कितीतरी प्रत्यक्ष उतरवण्यासाठी स्वप्ना बघत असतो. नव्याने लग्न होणारे वर वधू कितीतरी सुखी संसाराची स्वप्न ती रंगवतात. जन्म देणारे आई वडील आपल्या मुलांना सतत आनंदात बघतात आणि स्वप्नातही त्यांच्याच आनंदाचा विचार करत असतात. की आपली मुलं हसत आहेत. आनंदात छान खेळत आहेत.

आपले आई वडील तर उघड डोळ्यांनीच आपल्या भविष्याचा विचार करत असतात. त्या नुसार त्यांची दिनचर्या ही असते. एक त्यांच्या डोळ्यांमध्ये सुखाचा स्वप्नांचा गोकुळ सजलेला असतो. की जो प्रत्यक्षामध्ये उतरवायचा असतो. असा हा स्वप्नांचा गोकुळ खूप आनंदाचा खूप जवळचा आणि जीवन जगण्याचा एक भाग आहे. गरिबाला जरी मोठं मोठी घरे, उंच किंमतीच्या महाग वस्तू मिळत नसेल पण ते गरीबही स्वप्नांमध्ये ती वस्तू आपल्याला मिळालेली आहे.

त्याचा आनंद साजरा करत असतात. स्वप्न हे सर्वांच्या हक्काच असं घर आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वप्नांच्या घरामध्ये स्वतःला झोकून देत असतो.भविष्याची नवनवीन स्वप्न तो बघत असतो. हे स्वप्नांच गोकुळ सतत मानवी मनावर मनोराज्य करते. स्वप्नांचा गोकुळ निराशेतून बाहेर काढण्याचे काम करते. निराशेमध्ये आशेचं असलेलं किरण म्हणजेच स्वप्नांच गोकुळ असं म्हणायला हरकत नाही.

--------------

**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि अकोला.**
**9834583685**

●●●●●●●

## ६ नोव्हेंबर दिनविशेष

**महत्वाच्या घटना :**

१८६०: अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष म्हणून निवडून आले
१८८८: महात्मा गांधींनी कायद्याच्या अभ्यासासाठी लंडन येथे प्रवेश घेतला.
१९१२: भारत या पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९१३: दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाणकामगारांच्या मोर्चाचे नेतृत्त्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९५४: मुंबई राज्यात मुंबई वीज मंडळ या दिवशी स्थापन करण्यात आले.
१९९६: अर्जेंटिनाचे गांधी म्हणून ओळखले जाणारे प्रा. अडोल्फो डी. ओबिए्ता यांना पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते जमनालाल बजाज आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान.
१९९९: विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञानाचा लाभ उपलब्ध करुन दिल्याबद्दल भारताचे वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना युनेस्को गांधी सुवर्णपदक जाहीर.
२०१२: बराक ओबामा आणि जो बिडेन यांची दुस?यांदा अनुक्रमे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.

**६ नोव्हेंबर जन्म :**

१८१४: सॅक्सोफोन या वाद्याचे जनक ॲडोल्फ सॅक्स यांचा जन्म.
१८३९: प्राच्यविद्या संशोधक भगवादास इंद्रजी यांचा जन्म.
१८६१: बास्केटबॉल खेळाचे निमार्ते जेम्स नास्मिथ यांचा जन्म.
१८८०: निसान मोटर कंपनीचे संस्थापक योशूसुका अकावा यांचा जन्म.
१८९०: कविभूषण बळवंत गणेश खापर्डे यांचा जन्म.
१९०१: जेष्ठ टीकाकार, समीक्षक विचारवंत श्री. के. क्षीरसागर यांचा जन्म.
१९१५: चित्रपट कथाकार, दिगदर्शक दिनकर द. पाटील यांचा जन्म.
१९२६: पत्रकार,कथाकार,कादंबरीकार प्रभाकर नारायण पाध्ये उर्फ भाऊ पाध्ये यांचा मुंबई येथे जन्म.
१९२६: अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचा जन्म.
१९६८: याहू चे संस्थापक यारी यांग यांचा जन्म.

**६ नोव्हेंबर मृत्यू :**

१७६१: मराठेशाहीतील प्रसिद्ध राजकारणी (मराठा साम्राज्यातील ४ थी छत्रपती) महाराणी ताराबाई भोसले यांचे निधन.
१८३६: फ्रान्सचा राजा चार्ल्स (दहावा) यांचे निधन.
१९८५: प्रसिद्ध अभिनेते संजीवकुमार यांचे निधन.
१९८७: अभिनेते, दिग्दर्शक प्रा.भालबा केळकर यांचे पुणे इथे निधन.
१९९२: गायक,अभिनेते जयराम शिलेदार यांचे पुणे इथे निधन.
१९९८: कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे अनंतराव कुलकर्णी यांचे निधन.
२००२: हिंदीत राज्यघटना लिहिणारे वसंत कृष्ण वैद्य यांचे निधन.
२०१०: पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांचे निधन.

# भारतात वाढली गॅस्ट्रोएंट्रोलॉजिकल आजाराची समस्या



भारतातील लोकसंख्या आणि जीवनशैलीतील बदल तसेच खाण्यापिण्याच्या सवयीमुळे गॅस्ट्रोएंट्रोलॉजिकल रोग हा गंभीर जन आरोग्य समस्या बनला आहे.

या आजारात गॅस्ट्रोओसोफेजियल रिफ्लिक्स डिजीज (जीआयआरडी) आणि इरिटेबल बाऊल सिंड्रोम (आयबीएस) सारख्या रोगांपासून इन्फ्लेमेटरी बाउल डिजीज (आयबीडी), लिव्हर रोग आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कँसर सारख्या गंभीर विकारांचा त्यात समावेश आहे. या विकारांची वाढती प्रचलितता यांच्या जोखीम घटकांच्या अधिक चांगल्या समजुतीची आणि या आव्हानाला तोंड देण्यासाठी आवश्यक असलेल्या आरोग्य सेवा प्रतिसादांची आवश्यकता अधोरेखित करते.

भारतातील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिकल आजारांमधील वाढ शहरीकरण, आहार बदल आणि बदलत्या जीवनशैलीच्या पद्धतींशी संबंधित आहे. सुमारे 20 टक्के शहरी लोकसंख्या ऋूफ्ऊ(गॅस्ट्रोइसोफेजियल रिफ्लक्स डिसीज) च्या समस्यांनी ग्रस्त आहे. त्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह, उच्च-फॅट असलेले आहार आणि स्थिर जीवनशैली आदी कारणीभूत आहेत. IBS (इरिटेबल बॉवेल सिंड्रोम) सुमारे 4 टक्के ते 22 टक्के लोकांना प्रभावित करते. त्यामुळे तणाव, आहार आणि आतड्यातील सूक्ष्मजीव यासारख्या घटकांचा प्रभाव असतो.

दरम्यान, IBD (इन्फ्लेमेटरी बॉवेल डिसीज), ज्यामध्ये क्रोहन रोग आणि अल्सरटिव कोलाइटिस यासारखे आजार समाविष्ट आहेत. विशेषतः शहरी भागात या आजारांचं प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे, ज्याची घटना दर 6 ते 15 प्रति 100,000 आहे. हिपॅटायटीस बी आणि सी, मद्यपान-संबंधित यकृत रोग आणि नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (NAFLD) यांसारखे यकृत रोगांचा यात समावेश आहे ही चिंताजनक बाब आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात सुमारे 4 कोटी लोक हिपॅटायटीस बीच्या दीर्घकालीन संक्रमणाने ग्रस्त आहेत. शिवाय, भारतात जागतिक स्तरावर सर्वाधिक गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कर्करोगाचा दर आहे. तंबाखू सेवन, आहार पद्धती आणि हेलिकोबॅक्टर पायलोरी संक्रमणशी संबंधित असणारा पोट आणि अन्ननलिकेचा कर्करोगही भारतात मोठ्या प्रमाणात आहे.

हा आजार वाढण्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. अन्न, साखर आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांनी भरलेल्या पाश्चात्य आहाराकडे झुकणे यासारख्या अनेक घटकांमुळे हा रोग वाढत आहे. जीईआरडी आणि आयबीडी सारख्या स्थितींशी हे संबंधित आहे. शहरीकरणामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत, ज्यामुळे मधुमेह, लठ्ठपणा आणि संबंधित आतड्याशी संबंधित विकार वाढले आहेत.

याव्यतिरिक्त, शहरी वातावरणातील वाढत्या तणावाच्या पातळीचा आयबीएस आणि इतर कार्यात्मक आतड्याच्या विकारांच्या वाढत्या प्रादुभार्वाशी संबंध आहे. अस्वच्छता आणि स्वच्छता पद्धती आतड्याच्या संसर्गाचा धोका वाढवतात, ज्यामुळे संभाव्य दीर्घकालीन स्थिती निर्माण होऊ शकते.

भारतामध्ये या आजारांचे व्यवस्थापन करण्यासाठी आरोग्यसेवा सुविधांपुढे मोठे आव्हान आहे. शहरी भागात सामान्यतः चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध असतात, परंतु ग्रामीण भागात अनेकदा स्पेशल वैद्यकीय सेवांचा अभाव असतो, ज्यामुळे निदान आणि उपचार विलंब होतात. याव्यतिरिक्त, गॅस्ट्रोएंटेरोलॉजिकल आजारांविषयी जनजागृतीचा अभाव आहे.

●●●●●●●

## अशोकायन

### वात लावली.. !

**निवडणुक पुर्व ॲटम बॉमची**
**वात लावताच**
**हादरे बसले चहूकडे**
**वाह राज म्हणत**
**हदयी शब्द झोंबले**
**हे ही नसे थोडके !**

**सत्ताधाऱ्यांना राहिला नाही**
**म्हणे मतदारांचा धाक**
**महाराष्ट्राच्या राजकारणात**
**म्हणून सुरु आहे नंगानाच ..**

**महाराष्ट्राची आन बान शान**
**मतदारांनो तुमच्याच आहे हाती**
**अशा दलबदलु सोंगाड्यांना**
**द्याच एकदा आपटी तरच**
**ते येतील ताळ्यावरती .. !**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वाढती बेरोजगारी आणि गुन्हेगारी

**वाचक लिहितात**

महाराष्ट्रातील महायुती सरकारने मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर असलेली लाडकी बहिण योजना राज्यात सुरू केली आणि एकजात सर्व महिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला. महिन्याकाठी दीड हजार रूपये देवून महिलांची मते विकत घेण्याचा हा प्रकार आहे, याविषयी दुमत असूच शकत नाही. महिलांना अशाप्रकारे पैसे वाटण्याने एकदाचा सरकारला लाभ होईलही. परंतु, राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडतो आहे, त्याचे काय?

दुसरीकडे, प्रकल्प उभारण्याच्या आणि हजारो तरूणांना नोकरी देण्याच्या ज्या फुशारक्या या नेत्यांकडून मारल्या जात आहेत, त्यात काही तथ्य दिसत नाही. अभियांत्रिकीची पदवी घेवून हजारो तरूण वीमा पॉलिसी विकत आहेत किंवा रोजगार शोधत आहेत. या बेरोजगार तरूणांना घरच्या सदस्यांकडूनही सतत टोमणे ऐकावे लागतात. हाताला काम नाही म्हणून अनेक बेरोजगार गुन्हेगारीकडे वळले आहेत, चोरी, वाटमारी, अंमली पदार्थ विकणे आणि अशाच तत्सम गुन्ह्यात ते अडकत आहेत. सरकार आणि त्यांचे मंत्रीगण केवळ विकासाचे आणि सर्व घटकांचे भले केल्याचा ढोल बडवत आहेत. प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र अत्याधिक भयावह अशी आहे.

■ **संकेत क्षिरसागर, नागपूर.**

# कळंब तालुक्यात दुर्ग हेटी येथे गाई गोधनाचा उत्सव

### :डफडीच्या तालावर वाचतगाजत गावातून मिरवणूक

■ महासागर प्रतिनिधी,

**कळंब, दि. ५ :** तालुक्यातील दुर्ग हेटी गावात शनिवारी २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेदरम्यान गोधन मुहूर्तावर संपूर्ण गावातील शेतकऱ्यांनी आपल्या गायी व म्हशी सजवून त्यांची पूजा केली. गायी व म्हशींना ओवाळीत डफडीच्या तालावर वाचतगाजत गावातून मिरवणूक काढत गोधन उत्सव साजरा केला.



यावेळी सरपंच दत्तापूर ग्रामपंचायत प्रदीप पाटील झोटिंग यांच्याकडून उत्कृष्ट सजावट करणाऱ्यां शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. उत्कृष्ट सजावट करणाऱ्या गोधन मालकांना प्रथम बक्षीस रोख, बळवंतराव साठे बळवंतराव साठे यांच्या कडून द्वितीय बक्षीस, सुभाष अवताडे यांचे कडून तृतीय बक्षीस, छगन पाने यांच्याकडून देण्यात आले.

यात प्रदीप पाटील झोटिंग सरपंच दत्तापूर सह शेतकरी बळवंतराव साठे, बाबाराव अडथळे, सुभाष अवताडे, विलास अवताडे, दादाराव गहाट, पुरुषोत्तम नाईक, सुभाष काळे, विनोद काळे, किशोर अवथळे, बाबाराव साठे, आकाश काकडे, संदीप घाटोळ, पंकज साठे, निलेश साठे, पंडित बोपटे, प्रभाकर काकडे, गोपाल अवथळे, धीरज अवताडे, छगन पाने, देविदास अवथळे, दिनेश काकडे, मदन पाने, गुरु साठे, अंबादास साठे, अभिमान साठे, वसंत काकडे, डोमा अवथळे, सुभाष काळे, गोकुळ चावरे, आदींनी गोधनासह सहभाग नोंदवला होता. परिसरातील शेतकऱ्यांचा या उत्सवास चांगला प्रतिसाद मिळाला.

# माणुसकीची भिंत संस्थेची बेघरांसोबत दिवाळी साजरी

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद , दि. ५ :** हरवले आभाळ ज्यांचे, हो तयांचा सोबती! या उक्तीप्रमाणे माणुसकीची भिंतचे सदस्य हे गाडगेबाबांच्या दशसूत्रीवर अविरत कार्य करत आहेत. जेव्हा समाजातील मानवीय विचार करणारे लोक एकत्र येता, तेव्हा कल्पनातीत कार्य अविरत सुरू ठेवण्याचे काम माणुसकीची भिंत करत आहे. मानवतावादी विचार पेरण्याचे कार्य माणुसकीची भिंत करत आहे. नोव्हेंबर रोजी याच विचारांची असंख्य बीजे अनेक मानवाच्या मनात रुजवून हा मानवतेचा वटवृक्ष नऊ वर्षाचा झालेला आहे,

मागील नऊ वर्षापासून गोरगरीब गरजवंतांच्या मदतीला माणुसकीची भिंत दिवसरात्र धावत आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शनी मंदिरासमोर माणुसकीची भिंत




सोशल फाउंडेशन येथे दिवाळीचा सण साजरा करण्यात आला. बेघरांची दाढी-कटिंगकरून, त्यांना नवीन कपडे व फराळ, तसेच जेवण देऊन, त्यांच्यासोबत दिवाळीचा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी प्रथम लक्ष्मी मातेच्या व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शहरातील बेघर व गरजवंतांना स्नान करून जेवण देण्यात आले. सोबतच पुरुषांना ड्रेस, महिलांना साड्या व लुगड, दिवाळीनिमित्त फराळाचे पॅकेट देऊन त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

# ५४ रेड्यांची पोलिसांनी केली सुटका

### नागपूर-हैदराबाद मार्गावर दोन आरोपींसह ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी,

**वडकी , दि. ५ :** वडकी येथील स्थिर तपासणी नाक्यावर वाहन चेकींग दरम्यान पोलिसांनी एका कंटेनरमधून तब्बल ५४ रेड्यांची सुटका केली. ही कारवाई शनिवारी २ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून जवळपास ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नागपूर-हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गाने सातत्याने जनावरांची




तस्करी सुरू असते. सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४वरील कारेगांव जवळच्या स्थिर तपासणी नाक्यावर प्रत्येक वाहनांची कसून तपासणी केली जात असताना शनिवारी रात्री नागपूरकडून हैदराबादकडे जाणाऱ्या एचआर-५५-वाय-३१७७च्या क्रमांकाच्या कंटेनरची वडकी पोलिसांनी तपासणी केली. त्यात तब्बल ५४ रेडे आढळून आले. ही कारवाई रात्री११ वाजेदरम्यान करण्यात आली आहे. याप्रकरणी हरियाणाच्या घसेरा येथील असगर रशिद (४२) व त्याचा साथीदार मोरमल ईशाक (४५) या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. या कारवाईत ५४ रेडे अंदाजे किंमत ४ लाख ४० हजार रुपये व कंटेनर अंदाजे किंमत३० लाख असा एकूण ३४ लाख४० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच सुटका केलेल्या रेड्यांना वणी तालुक्यातील रासा येथील गोरक्षणाच्या ताब्यात देण्यात आले.

# तहसीलदारांनी साजरी केली अनाथ मुलांसोबत दिवाळी

■ महासागर प्रतिनिधी,

**हिवरा आश्रम, दि. ५ :** मेहकरचे तहसीलदार नीलेश मडके यांनी हिवरा आश्रम येथील नित्यानंद सेवा प्रकल्पातील अनाथ मुलांना स्वतःच्या वाहनाने घरी आमंत्रित करून मिष्टान्न मेजवानीचे आयोजन करून व पर्यावरणपूरक फटाक्यांची भेट देऊन आगळीवेगळी दिवाळी साजरी केली. नित्यानंद सेवा प्रकल्पातील अनाथ मुलांचा दिवाळी सण आनंदात साजरा व्हावा, यासाठी तहसीलदार मडके यांनी आगळेवेगळे नियोजन केले. अनाथ मुलांसह तहसील कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना आमंत्रित करून त्यांनी दिवाळी साजरी केली. आपल्या घरी मंडप उभारून त्यांनी भोजनाचे आयोजन केले.

सद्य:स्थितीत विधानसभा निवडणुकीच्या कामकाजाचा व्याप असतानाही तहसीलदार मडके यांनी अनाथ मुलांच्या दिवाळी सणाचे



आयोजन केले. त्या अनुषंगाने नियोजनाचा एक भाग म्हणून आदल्या दिवशी नित्यानंद सेवा प्रकल्पाला भेट देऊन त्यांनी मुलांसोबत चर्चा केली. त्यांच्या आवडीनुसार पदार्थ ठरवून केटरर्सकडे स्वयंपाकाचे नियोजन दिले. अतिथी देवो भव!' या उक्तीनुसार अनाथ मुलांच्या स्वागतासाठी भव्य मंडप उभारण्यात आला. केटरर्स द्वारे डायनिंग टेबलची व्यवस्था करण्यात आली. मुलांचे आगमन झाल्यानंतर तहसीलदार मडके यांच्या परिवाराच्या वतीने औक्षण करून मुलांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांच्या गायनाचा कार्यक्रमही पार पडला.

या कार्यक्रमाला मेहकरचे उपविभागीय अधिकारी जोगी आणि तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रकल्पाचे संचालक अनंत शेळके यांनी मनोगत व्यक्त केले. अशा प्रकारच्या संस्मरणीय दिवाळीचा यथोचित आनंद घेण्याची अनाथ मुलांची ही पहिलीच वेळ असल्याचे त्यांनी सांगितले.

# फराळ, फटाक्यांचे वाटप करून वंचितांची केली दिवाळी साजरी



### मेहकरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,

**मेहकर , दि.५:** मुलांना फराळ वाटपप्रसंगी उपस्थित मान्यचर. - येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वंचितांना फराळ, मिठाई व फटाके वितरित करून दिवाळी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव मानवतकर होते.

व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष सिद्धेश्वर पवार, नगर पालिकेचे माजी उपाध्यक्ष जयचंद बाठीया, प्रदीप जोशी, प्रवीण गायकवाड, संतोष मलोसे, गजानन देशमुख, प्रा. जुगराज पठ्ठे, ज्ञानेश्वर इंगळे प्रामुख्याने उपस्थित होते. शहरासह परिसरात भटकंती महिला, पुरुष व मुलांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते फराळाचे पाकिट, गोड पदार्थांसह फटाके वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे अध्यक्ष रफिक कुरेशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण गायकवाड यांनी केले. इरफान शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर पालावरील अनाथ मुलीचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.

# मातोश्री वृद्धाश्रमात आजी-आजोबांसोबत दिवाळी साजरी

### केश कर्तनासह घातले अभ्यंगस्नान, पुरणपोळीचे जेवण, रेणुकामाता मित्रमंडळाचा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ५ :** मातोश्री वृद्धाश्रमात दिवाळीनिमित्त मिष्ठान्न भोजन देताना सदस्य. - दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाशाची उधळण. मात्र ज्यांचे आभाळ हरवले आहे? त्यांना दिवाळी काय? अन दसरा काय? सर्व दिवस सारखेच. ही बाब लक्षात घेवून कुटुंबापासून दूर असलेल्या आणि खऱ्या अर्थाने एकमेकांना आधार देत आपले राहिलेले आयुष्य जगणाऱ्या शिवापूर येथील मातोश्री वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसोबत श्री रेणुका माता मित्र मंडळाने दिवाळी साजरी करुन त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा प्रयत्न केला.

केश कर्तनासह अभ्यंगस्नान, पुरणपोळी, बेसन तसेच मोतीचूरचे लाडू, अन्य मिठाई, आजोबांना नवीन



कपडे, आजीला पातळ, साडी मिळाल्याने आजी-आजोबांचे डोळे पाणावले होते. धावत्या युगात एकत्र कुटुंब पद्धती कालबाह्य होत चालली आहे. त्याच बरोबर नात्यातील गोडवाही कमी होत चालला आहे. त्यामुळे मुलांना लहानाचे मोठे केल्या नंतर म्हातारपणात कुणाकडे राहावे? असा प्रश्न आजी-आजोबांसमो निर्माण होतो. यातून अनेक जण आपल्या वृद्ध माता-पित्यांना वृद्धाश्रमात ठेवतात तर काही आपला त्रास आपल्या कुटुंबाला नको म्हणून स्वत: वादविवाद टाळण्यासाठी वृद्धाश्रमात येतात. यामुळे या आजी-आजोबांची दिवाळी साजरी करण्यासाठी हा उपक्रम राबवला जातो. उपक्रमाचे हे २६ वे वर्ष होते.

प्रथम आजोबांची दाढी-कटींग करण्यात आली. त्यानंतर औक्षण करुन सुगंधी उटण्याने स्नान घालण्यात आले. आजोबांना नवीन कपडे तर याच बरोबर पातळ नेसणाऱ्या आजीला पातळ, साडी तसेच गाऊन, पेटीकोट, ब्लाऊज, बाम, खोबरेल तेल, पावडर, दंत मंजन, स्नानाचा साबण, कपडे धुण्याचा साबण, आरसा, कंगवा, गुडघे दुखीचे मलम, डेटॉल, बर्मुडा, बंडी, चपला तसेच रोख १०१ रुपये आदी साहित्य देण्यात आले. हे साहित्य व धान्य देण्यासाठी मनपाचे तत्कालीन उपायुक्त वैभव आवारे, डॉ. गजानन नारे, विजय पारतवार, संदीप गावंडे, इंद्रजित माने, नरेश बावणे, शैलेश चोपडे, तुषार टिकाईत , प्रवीण मांडळे, सोनल मोरे, स्व. श्रीराम गावंडे स्मृती प्रीत्यर्थ नमन गावंडे, स्व. दामोदरपंत निंबेकर स्मृती प्रीत्यर्थ दिलीप निंबेकर, स्व. अरुण जोगळेकर स्मृती प्रीत्यर्थ अनघा जोगळेकर आदींनी सहकार्य केले.

# मेळघाटच्या वारली पेंटिंग्जची राष्ट्रपती यांनी केली प्रशंसा

### कांडलीच्या सुमित्रा यांचा दिल्लीच्या राजभवनात मुक्काम

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ५ :** वारली पेंटिग्ज आणि व्याघ्र प्रकल्पातील जंगल तसेच वन्यजीव संपदेला चित्राच्या माध्यमातून समाजापुढे आणणाऱ्या सुमित्रा आहकेला तब्बल दिवस राष्ट्रपतींच्या अतिथी म्हणून दिल्लीच्या राजभवनात राहण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्यांच्या अंगी असलेल्या घरगुती कलेचा सन्मानही राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आला.



गौरखेडा कुंभी येथे मुख्यालय असलेल्या खोज संस्थेत कार्यरत सुमित्रा आहके या आदिवासी भगीनी उच्चशिक्षित आहेत. रेखाकला हा विषय त्यांनी शालेय शिक्षणापासूनच जपला. त्यामुळे आदिवासी संस्कृतीची ओळख करुन देणारे वारली पेंटिग्ज, जंगलातील राहणीमान, वाघाचे महत्व आदी बाबी त्यांच्या चित्रकलेतून नेहमीच समाजासमोर आल्या आहेत. समाजसेवेची आवड म्हणून त्या खोज संस्थेतील शैक्षणिक विभागात काम करतात. आदिवासी मुला-मुलींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे, बडबड गीते व इतर कलांच्या माध्यमातून शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी मेळघाटातील धारणी व चिखलदरा या दोन्ही तालुक्यांतील खेडे व तांडे हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे.

राष्ट्रपती भवनात अलिकडेच दहा दिवसीय आवासीय कला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये देशभरातून सुमारे २०० आदिवासी प्रतिनिधींनी सहभाग घेतला. पुढे या प्रतिनिधींमधील निवडक १५ जणांची खास निवड करण्यात आली. विशेष असे की या खास निवडीतील १५ जणांमध्ये सुमित्रा आहकेला गुणवत्तेच्या श्रृंखलेत दुसरे स्थान प्राप्त झाले. त्यांनी तयार केलेले वारली पेटिंग्ज, गाव तसेच शहरातील फरक दर्शविणारे चित्र, देवस्वरुप मानला जाणारा वाघ आणि आदिवासी क्षेत्रातील लुप्त होत चाललेल्या कलाप्रकारांवर टाकलेला प्रकाश राष्ट्रपतींना खूप भावला. त्यामुळे निरोप समारंभावेळी सुमित्रा आहकेंना प्रमाणपत्र, चषक आणि भेटवस्तू देऊन सन्मानीत करण्यात आले. सुमित्रा आहके यांच्या यशामुळे अमरावती जिल्ह्याच्या सन्मानात मानाचा तुरा खोवला गेला असून या यशाबद्दल खोज संस्थेचे प्रमुख ड. बंड्या साने, सामाजिक कार्यकर्त्या ड. पूर्णीमा उपाध्याय, ब्रदर जोस आदींनी त्यांचे अभिनंदन .

# १११ बालकांच्या हृदयावर मोफत शस्त्रक्रिया

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ५ :** राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्ह्यातील ० ते १८ वर्षांपर्यंतच्या कॉक्लिअर इम्प्लान्टसह १११ बालकांवर नि:शुल्क शस्त्रक्रिया करण्यात आल्या. काही बालकांना पोटाचेही आजार होते, त्यांच्यावरही उपचार करण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी दिली. ही योजना बालकांसाठी संजीवनी ठरत आहे. हृदयविकारावर शस्त्रक्रियेसह शालेय विद्यार्थ्यांपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचाव्यात यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम हाती घेतला आहे. जिल्ह्यात जानेवारी ते सप्टेंबर या ४ महिन्यांच्या कालावधीत १११ बालकांच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात राज्यातील तीन वेगवेगळ्या ठिकाणी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. बालकांची या योजनेंतर्गत तपासणी करण्यात आली. ज्या बालकांमध्ये कोणतेही शारीरिक विकार आढळले त्यांची यादी तयार करून पुन्हा तज्ज्ञांमार्फत तपासणी करत नेमकी उपचार पद्धती ठरवण्यात आली. त्यानंतर ज्या रुग्णालयांमध्ये बालकांवर उपचाराची सोय आहे, तेथे संपर्क साधून शस्त्रक्रियेची तारीख ठरवण्यात आली. तोवर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार या बालकांवर औषधोपचार करण्यात आले. त्यांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यानंतरच आवश्यकतेनुसार त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आता सुपर स्पेशालिटीतही सोय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कॅथ



लॅब सुरू झाल्यामुळे बालकांवर येथेही काही शस्त्रक्रिया होऊ शकतात. त्यासाठी अन्य महानगरांकडे जाण्याची गरज नाही. तसेच ज्या बालकांना इतरत्र उपचाराची गरज आहे, त्यांना त्या हॉस्पिटलमध्ये पाठवले जाईल. जिल्ह्यात ४ महिन्यांमध्ये ६३७ बालकांना नवजीवन बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात जानेवारी ते सप्टेंबर या ४ महिन्यांच्या कालावधीत १११ बालकांच्या हृदयावर शस्त्रक्रिया व५२३ मुलांच्या पोटासह अन्य शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यात कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रियांचा समावेश आहे. या योजनेंतर्गत आतापार्यंत ६३७ बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ज्या बालकांच्या हृदयात काही विकार दिसला त्यांच्यावर आचार्य विनोबा भावे, सावंगी मेघे, कोकिला बेन अंबानी रुग्णालय, मुंबई, आरसीसी हॉस्पिटल मुंबई येथे या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

# कृषी केंद्रासह कार जळून खाक १८लाखांचे नुकसान

■ महासागर प्रतिनिधी,

**उदयनगर , दि. ५:** भीषण आगीत कृषी सेवा केंद्रासह जवळ असलेली कार जळून खाक झाल्याची घटना परिसरातील कव्हळा (ता. चिखली) येथे रविवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी रात्री घडली. यामध्ये१८ लाख २० हजार ३०० रुपयांचे नुकसान झाले. कव्हळा येथील मारोती मंदिर परिसरात रविवारी रात्री रात्री दोन वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत रतन बाजीराव आढाव यांच्या न्यू क्रांती कृषी सेवा केंद्र या दुकानातील ड्रीप, ठिबक सिंचनासाठी लागणारे साहित्य, खत, कीटकनाशक, बुरशीनाशक, तणनाशक, बियाणे यासह सर्व साहित्य सर्व साहित्य जळून खाक झाले. तसेच दुकानाच्या



भिंतीलगत असलेली सविता रमेश गाडेकर यांची कारही (क्रमांक एमएच ३४ - बीआर ५३६२) या आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. या आगीत दोघांचेही सुमारे १८ लाख २० हजार ३०० रुपयांचे नुकसान झाले.

ही आग परिसरातील ग्रामपंचायत कार्यालयाच्या काही खोल्यापर्यंत पोहोचल्याने मोठे नुकसान झाले. आग आटोक्यात आणण्यासाठी ग्रामस्थांनी लोकांनी एकत्र येऊन प्रयत्न केले. तब्बल तीन तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात त्यांना यश आले. त्यामुळे आणखी नुकसान टळले. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, आगीत नुकसान झालेल्यांना शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




## मूत्रपिंडाची समस्या असेल तर...

लाईफस्टाईल

मूत्रपिंडांशी संबंधित व्याधी असणाऱ्यांना प्रथिनयुक्त पदार्थ न खाण्याचा सल्ला दिला जातो. पण याबाबत रुग्णांचा बराच गोंधळ उडाल्याचं दिसतं. मूत्रपिंडाच्या समस्या असणाऱ्यांनी काय करायला हवं याविषयी...

तीव्र स्वरूपाचा मूत्रपिंडविकार असलेल्या पण डायलिसिसची गरज नसलेल्या रुग्णांच्या आहारातलं प्रथिनांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. पण डायलिसिसवर असलेल्या रुग्णांना प्रथिनांच्या सेवनाच्या बाबतीत थोडी सवलत मिळू शकते.



'रेनल डाएट' या प्रकारात मांस, सोया प्रथिनं, अंडी, सुक्या मेव्यातून मिळणारी प्रथिनं तसंच बीन्स यांचा समावेश असतो.

दुग्धजन्य पदार्थांमध्ये पोटॅशियम आणि फॉस्फरसचं प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. मूत्रपिंडाचं आरोग्य जपण्यासाठी भरपूर पाणी पिण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. पोषक घटक आणि जीवनसत्त्वांनी युक्त संतुलित आहार ही निरोगी आयुष्याची गुरूकिल्ली आहे. मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठीही हेच तत्त्व लागू पडतं. यासोबत वजन नियंत्रणात ठेवणं आणि नियमित आरोग्य तपासणीही गरजेची आहे.

## कंडोम वापरण्याने पुरुषांना कर्करोग

कोणत्याही प्रकारचे लैंगिक आजार टाळण्यासाठी कंडोम वापरण्याचा सल्ला दिला जातो. लैंगिक संक्रमित रोगांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी लोक कंडोम वापरतात. नको असलेली गर्भधारणा टाळण्यास कंडोम मदत करते; पण आता कंडोमच कर्करोगाचे कारण बनत आहे. एका संशोधनातून धक्कादायक गौप्यस्फोट करण्यात आल्याने कंडोमच्या संदर्भात लोकांमध्ये एक नवीन चिंता निर्माण झाली आहे.

अलीकडेच, अमेरिकेतील एका सर्वोत्तम कंडोमवर कर्करोगजन्य असल्याचा दावा दाखल करण्यात आला. या प्रकरणात, कंडोममध्ये कर्करोग निर्माण करणारे विषारी रसायन 'पीएफएएस'चे घटक असल्याचे म्हटले जाते. अमेरिकेतील नंबर-१ कंडोम म्हणवल्या जाणाऱ्या ट्रोजन कंडोममध्ये कॅन्सर निर्माण करणारी विषारी रसायने असल्याचे म्हटले आहे. मॅथ्यू गुडमन यांनी मॅनहॅटन फेडरल कोर्टात हा खटला दाखल केला. त्यांनी आरोप केला, की ट्रोजन अल्ट्रा थिन कंडोममध्ये पॉलीफ्लोर अल्काइल पदार्थ असतो. तो 'पीएफएएस'चा घटक असतो. हे आरोग्यासाठी हानिकारक मानले जाते.




हा पदार्थ पर्यावरणात आणि मानवी शरीरावर दीर्घकालीन स्थिरतेसाठी ओळखला जातो. हे नॉन-स्टिक आणि जेल बेससाठी वापरले जाते.

याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, ट्रोजन अल्ट्रा थिन कंडोमची प्रयोगशाळेत चाचणी करण्यात आली होती. त्यात असे आढळून आले, की त्यात सेंद्रिय फ्लोरिन आहे ज्यावर पीएफएएस चिन्हांकित आहे. ही सर्व माहिती कंडोमच्या पाकिटावर दिलेली नाही. ती दिली असती, तर त्यांनी तो कंडोम विकत घेतला नसता किंवा त्यासाठी कमी किंमत दिली असती. या प्रकरणाबाबत त्यांनी न्यायालयाला कंपनीकडून त्या कंडोमच्या देशभरातील सर्व खरेदीदारांना ५ दशलक्ष डॉलर्सची भरपाई देण्याची मागणी केली आहे.

'पीएफएएस' हा एक प्रकारचा पदार्थ आहे, ज्यामुळे कर्करोग होतो असे आढळले आहे. हे बाळाच्या जन्माच्या वेळेस कमी वजन आणि कमकुवत प्रतिकारशक्तीशी संबंधित मानले जाते. एका अभ्यासात कंडोम आणि त्यातील लुब्रिकेंट्सची तपासणी करण्यात आली. ट्रोजन अल्ट्रा थिन कंडोमसह प्रमाणित प्रयोगशाळेत २९ वेगवेगळ्या कंडोम नमुन्यांची चाचणी घेण्यात आली. तपासणीत असे दिसून आले, की २९ उत्पादनांपैकी १४ टक्क्यांमध्ये काही 'पीएफएएस' कण आढळले. 'पीएफएएस' असलेले अंदाजे ३ कंडोम होते आणि २ कंडोममध्ये त्यांच्या लुब्रिकेंट्समध्ये 'पीएफएएस' कण आढळले. हे रासायनिक कण कंडोम गुळगुळीत आणि स्टेन रेजिस्टेंस बनवण्यासाठी वापरले जातात.

## ठराविक रक्तगटाच्या लोकांना ब्रेन स्ट्रोक


ब्रेन स्ट्रोक हा एक गंभीर आजार आहे. त्यामुळे मृत्यूचा धोका जास्त असतो. एका नवीन अहवालानुसार, एका विशेष रक्तगट असलेल्या लोकांना अकाली 'ब्रेन स्ट्रोक' होण्याची शक्यता असते. बऱ्याचदा, ६० वर्षांनंतरच्या लोकांना मेंदूचा झटका येतो; परंतु काही रक्तगटाच्या लोकांना कमी वयातही स्ट्रोक येऊ शकतो. यासंदर्भात 'युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँड स्कूल ऑफ मेडिसिन'च्या संशोधकांनी हे संशोधन केले. त्यात त्यांनी गेल्या ४८ वर्षांचे रेकॉर्ड तपासले. संशोधनात जुन्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर असे आढळून आले, की ए रक्तगटाच्या लोकांना लहान वयातच ब्रेन स्ट्रोकचा धोका संभवतो. या चाचणीत सुमारे सहा लाख लोकांमध्ये असाच प्रकार दिसून आला आहे. संशोधकांनी असेही निरीक्षण केले आहे, की ए रक्तगट असलेल्या लोकांना इतर रक्तगटांच्या तुलनेत जास्त धोका असतो. वेगवेगळ्या रक्तगटानुसार रोगांचा धोकादेखील बदलू शकतो. 'ब्रेन स्ट्रोक' हा एक गंभीर आजार आहे. रक्तगट ए असलेल्या लोकांना ब्रेन स्ट्रोकचा धोका जास्त असतो, असे या नवीन संशोधनातून समोर आले आहे.



## पुरुषांपेक्षा महिलांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी

आजकाल महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून करिअर करत आहेत. चूल आणि मूलसोबत महिला इतर अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना दिसतात; मात्र यामुळे स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. त्याचा परिणाम विविध शारीरिक आणि मानसिक आजारांचा सामना करावा लागतो. थकवा, अशक्तपणा, रक्ताच्या अभावामुळे शरीर गंभीर आजारांच्या प्रभावाखाली येऊ शकते.

कमी आयर्न म्हणजेच लोह आणि हिमोग्लोबिनमुळे उद्भवणाऱ्या रोगास अशक्तपणा म्हणतात. अशक्तपणा, रक्ताचा अभाव ही एक गंभीर स्थिती आहे. त्याची प्रकरणे भारतात अधिक आढळतात. सर्वात चिंतेची गोष्ट म्हणजे ती स्त्रियांमध्ये अधिक आहे. शरीराचा प्रत्येक भाग रक्ताने एकमेकांशी संपर्क साधतो. रक्ताच्या प्रमाणात ऑक्सिजनचा पुरेसा पुरवठा चांगला असतो; परंतु तरीही भारतातील स्त्रियांना सर्वाधिक अशक्तपणाचा अधिक त्रास जाणवत आहे. भारतीय महिलांमध्ये अशक्तपणाचे एक कारण म्हणजे पोषक तत्वांचा अभाव. ग्रामीण भागात स्त्रियांमध्ये अशक्तपणाची अधिक प्रकरणे आहेत, कारण त्यांना भरपूर अन्न मिळत नाही.



बऱ्याच स्त्रिया शाकाहारी अन्नावर अवलंबून असतात. त्यामुळे लोहाची कमतरता वाढू शकते, कारण नॉनव्हेजमध्ये असलेला लोह वनस्पती-आधारित पदार्थांमध्ये त्या तुलनेत कमी असतात. शरीरात व्हिटॅमिन बी -१२ सारखे इतर कोणतेही घटक कमी असतील तर शरीरात रक्ताचा अभाव असू शकतो. व्हिटॅमिन बी -१२ कमी केल्याने गंभीर रोग होऊ शकतात, त्यापैकी एक अशक्तपणा.

गर्भधारणेदरम्यान हिमोग्लोबीन कमी होणे स्वाभाविक आहे. काही स्त्रियांमध्ये प्रसूती दरम्यान अधिक रक्त बाहेर येते. त्यामुळे अशक्तपणा येऊ शकतो. मासिक पाळी दरम्यान काही स्त्रियांना रक्तस्त्राव होतो, अशा स्त्रियांना रक्त कमी होण्याचा धोका असतो. ज्या महिलांना या दिवसात जास्त रक्तस्त्राव झाला आहे, त्यांना डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागतो.

## रक्तगट सांगतो स्वभाव!

आरोग्यवेध

लग्न जुळवताना आपण पत्रिकेचा आधार घेतो. ग्रह, तारे,नक्षत्र अनुकूल असतील तर लग्न ठरवतो. पण जपानमधले लोक असं करत नाहीत. स्वभाव जुळवण्यासाठी किंवा जाणून घेण्यासाठी ते रक्तगटाचा अभ्यास करतात. रक्तगटावरून माणसाचा स्वभावही कळू शकतो. रक्तगटाद्वारे स्वभाव जाणून घेण्याच्या या प्रक्रियेला जपानी भाषेत 'केटसुईकी गाटा' असं म्हणतात. जपानी प्राध्यापक तोकेजी फुरूकावा यांच्यामुळे १९३० पासून हा शब्द प्रचलित झाला. रक्तगटावरून स्वभाव जाणून घेता येतो असा दावा त्यांनी केला होता.

ए,बी,ओ आणि एबी हे प्रमुख रक्तगट आहेत. अँटीजेन्सच्या आधारे त्यांचं वेगळेपण ठरतं. लाल रक्तपेशींच्या पृष्ठभागावर हे अँटीजेन्स असतात. त्यावरून आपल्या रोगप्रतिकारक शक्तीची क्षमता कळते. जपानी लोक इतरांना त्यांची रास नाही तर रक्तगट विचारतात. कारण रक्तगटावरून माणसाचा स्वभाव कळतो यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. अर्थात अशाप्रकारच्या विचाराला कोणताही शास्त्रीय आधार नाही. मात्र रक्तगटावरून केलेलं स्वभावाचं वर्णन तंतोतंत जुळत असल्याचं काहींचं म्हणणं आहे.



त्यामुळे प्रत्येक रक्तगटाशी संबंधित स्वभाव वर्णन जाणून घेणं रंजक ठरेल. ए रक्तगट असणाऱ्यांचा स्वभाव संवेदनशील असतो. ही मंडळी मदतीला तत्पर असतात. ती बरीच भावनिक आणि हुशारही असतात. हे लोक शांतताप्रिय असल्याने त्यांना इतरांशी भांडायला आवडत नाही. अतिसंवेदनशीलता हा त्यांचा अवगुण आहे असं म्हटलं जातं. समाजाने घालून दिलेले नियम मोडायला त्यांना सहसा आवडत नाही. या रक्तगटाचे लोक पटकन ताण घेतात. यामुळे त्यांच्या शरीरात कॉर्टिसोल या हार्मोनचं प्रमाणही बरंच जास्त असतं.

बी रक्तगटाची माणसं कुशल आणि निर्णयक्षम असतात. ती अगदी पटकन निर्णय घेऊन मोकळी होतात. त्यांची इच्छाशक्ती खूप तीव्र स्वरूपाची असते. पण एकाच वेळी अनेक गोष्टी करण्याची वेळ आली तर ती पुरती गडबडतात. काही वेळा ही माणसं स्वार्थीपणा करतात. सहकार्य करत नाहीत.

एबी रक्तगटाच्या माणसांमध्ये ए आणि बी अशा दोन्ही रक्तगटांचे गुण असतात. त्यांचा स्वभाव थोडा गुंतागुंतीचा असतो. कधी ते आक्रमक असतात तर कधी लाजरेबुजरे वाटतात. पण ते लोकांसोबत पटकन मिसळतात. कोणाशीही पटकन मैत्री करू शकतात. त्यांना ताण हाताळता येत नाही. अनेकदा त्यांची वर्तणूक बेजबादार असते.

ओ रक्तगटाची माणसं धाडसी असतात. उच्च दर्जाचं काम करायला त्यांना खूप आवडतं. ही माणसं हुशार, प्रेमळ असतात. जपानमध्ये ओ रक्तगटाच्या माणसांना लढवय्ये समजलं जातं. पण त्यांच्या मनात थोडी असूया असते. या लोकांना सच्चेपणा आवडतो. त्यामुळे खोटं वागणाऱ्या लोकांचा त्यांना खूप राग येतो. ही माणसं काहीशी उद्धट आणि स्वमग्न असतात. हे लोक थोडे कठोरही असतात.

## ई सिगारेट्स ठरतील धोकादायक

नवसंशोधन


अनेक जण इलेक्ट्रॉनिक सिगारेट्स म्हणजे ई सिगारेट्सचा वापर करतात. मात्र या सिगारेट्समधून 'मायक्रोबायल टॉक्सिन्स' बाहेर पडतात, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. अशा सिगारेट्सच्या वापरामुळे श्वसनाशी संबंधित रोग उद्भवू शकतात. अस्थमा, फुफ्फुसाची क्षमता कमी होणं, फुफ्फुसाचा दाह अशा समस्या यामुळे निर्माण होण्याची शक्यता असते. या संशोधनासाठी इंग्लंडमधल्या हॉवर्ड विद्यापीठाने ई सिगारेट्सच्या ७५ उत्पादनांचा अभ्यास केला. यातल्या २७ टक्के उत्पादनांमध्ये एंडोटॉक्सिनचे अंश आढळून आले. एंडोटॉक्सिन म्हणजे एकप्रकारचं मायक्रोबायल आहे. तसंच यात ग्लुकॅनचे अंशही सापडले. हे ग्लुकॅन बऱ्याच फंगसच्या शरीरात असतं. यावरूनच ई सिगारेट्सची दाहकता आपल्या लक्षात येऊ शकते.



## दिवसभर घ्यायला हवी काळजी

दंतारोग्य

दिवसातून दोन वेळा दात घासण्याचा सल्ला दिला जातो. मात्र या दरम्यानच्या काळात आपलं दातांच्या स्वच्छतेकडे पूर्ण दुर्लक्ष झालेलं असतं.



मधले १२ ते १५ तास आपण दातांकडे बघतही नाही. तोंडाची स्वच्छता राखण्यासाठी फक्त दोनवेळा दात घासणं पुरेसं नाही. दिवसभरातही तोंडाची विशेष काळजी घ्यायला हवी. दिवसभराच्या खाण्यानंतर दातांच्या फटीत अडकलेले अन्नकण त्रासदायक ठरू शकतात. तोंडाच्या दुर्गंधीमुळे इतरांना त्रास होऊ शकतो. हे टाळण्यासाठी काहीही खाल्ल्यानंतर चूळ भरा. जेवणानंतर माउथ फ्रेशनर चघळा. बडिशेप, सुपारीचा पर्यायही आहे. गोड पदार्थ जेवणासोबत खा. जेवणानंतर थोडं चीज खा. यामुळे तोंडातल्या लाळेचं प्रमाण वाढतं.

## रिकाम्या पोटी कॉफी पिताय?

आपण कुठे चुकतो?

सकाळी उठल्यावर कॉफीचा घोट घेतल्याशिवाय अनेकांना चैन पडत नाही. पण रिकाम्या पोटी कॉफी प्यायल्याने बऱ्याच समस्या निर्माण होऊ शकतात. कॉफी आरोग्यदायी असल्याचे दावे केले जात असले तरी ती रिकाम्या पोटी प्यायल्याने पचनसंस्थेवर विपरित परिणाम होऊ शकतात. कॉफीमध्ये कॅफेन भरपूर प्रमाणात असतं. त्यामुळे सकाळी उठल्यावर कॉफी प्यायल्यामुळे आम्लांची निर्मिती होऊन पोटातल्या आतल्या भागातल्या आवरणाला धोका निर्माण होतो. अपचन, छातीत जळजळ अशा समस्याही यामुळे निर्माण होऊ शकतात.

सकाळी उठल्यानंतर ब्लॅक कॉफी पिणाऱ्यांची ॲसिडिटी वाढू शकते. थोड्या प्रमाणात दूध आणि साखर घातलेली कॉफी सकाळी चालू शकते. पण त्याचं प्रमाण मर्यादित असावं असं तज्ज्ञ सांगतात.



ॲसिडिटी आणि गॅसच्या समस्या असलेल्यांनी रिकाम्या पोटी कॉफी पिणं टाळावं. कॉफी पिण्याआधी दोन मल्टीग्रेन बिस्किटं किंवा थोडे भिजवलेले बदाम खावेत. गरोदर महिला तसंच विशिष्ट औषधांचं सेवन करणाऱ्यांनीही सकाळची कॉफी टाळावी.

सकाळी कॉफी घेतल्याने शरीरातल्या 'कॉर्टिसोल' या हार्मोनचं प्रमाण कमी होत असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. कॉर्टिसोलचं प्रमाण कमी झाल्याने झोप येते. व्यायामाआधी कॉफी पिणंही चुकीचं आहे.

## उपयुक्त आयुर्वेदिक तेलं

आयुर्वेद आणि विकार

आयुर्वेदात विविध तेलांचं महत्त्व सांगण्यात आलं आहे. आरोग्य राखण्यासोबतच सौंदर्यवृद्धीसाठीही ही तेलं उपयोगी पडतात. या औषधी तेलांचा वापर ॲरोमा थेरपी तसंच निसर्गउपचारांमध्येही केला जातो. अशाच काही औषधी तेलांविषयी जाणून घेऊ या.



लवेंडर तेल बहुगुणी आहे. त्वचेचं आरोग्य राखण्यात लवेंडर तेलाची महत्त्वाची भूमिका असते. या तेलामुळे फक्त सौंदर्यवृद्धी होते असं नाही तर जखम भरून काढण्यासाठीही याचा वापर केला जातो. भाजलेल्या भागावर लवेंडर तेल लावल्याने आराम मिळतो. याच्या वासामुळे मानसिक शांतता लाभते. ताण कमी होतो. शांत झोपही लागते. त्यामुळे ॲरोमा थेरपीत लवेंडर तेलाचा वापर केला जातो.


त्वचा, केस आणि नखांच्या आरोग्यासाठी टी ट्री ऑईलचा वापर केला जातो. पिंपल्समुळे चेहऱ्यावर पडलेले डाग यामुळे दूर होतात. हे तेल केसांनाही लावता येतं. त्वचा विकारांवरही हे तेल प्रभावी ठरतं.

चंदनाच्या तेलाचा वापर प्राचीन काळापासून केला जात आहे. या तेलाच्या नियमित वापरामुळे त्वचेचं सौंदर्य खुलतं. अँटीसेप्टिक तसंच दाह कमी करण्यासाठीही त्याचा वापर होतो. ताणतणाव कमी करण्याठी लेमन ग्रास तेल वापरायला हवं. निद्रानाश, डोकेदुखी, उच्च रक्तदाब अशा विकारांमध्येही हे तेल प्रभावी ठरतं. गुलाबाच्या तेलामुळे हार्मोन्सचं संतुलन राखलं जातं. गुलाब तेलाने मसाज केल्यानंतर शरीराला आराम मिळतो.

## डोळ्यांशी संबंधित गैरसमज

डोळ्यांचं आरोग्य

डोळ्यांच्या आरोग्याशी संबंधित अनेक समज गैरसमज आहेत. अंधारात वाचन केल्याने डोळ्यांना त्रास होतो असं म्हटलं जातं. प्रकाशात वाचन करणं अधिक सुलभ असलं तरी कमी प्रकाशात वाचल्याने डोळ्यांवर दुष्परिणाम होत नाहीत. वाढत्या वयामुळे निर्माण होणाऱ्या डोळ्यांशी संबंधित समस्यांना प्रतिबंध करता येत नाही असाही एक समज आहे. मात्र मोतीबिंदूची समस्या दूर करता येते. सर्वसाधारण आरोग्य सूचनांचं पालन करून आपण डोळ्यांच्या विकारांना आळा घालू शकतो.



## वंध्यत्व दूर करण्यासाठी...

व्याधी विचार

वंध्यत्वाची समस्या अनेकींना भेडसावते. आईवडिल होण्याची स्वप्नं रंगवणाऱ्या जोडप्यांना यामुळे खूप धक्का बसतो. वारंवार प्रयत्न करूनही गर्भधारणा न होणं म्हणजे वंध्यत्व. चुकीची जीवनशैली हे सध्याच्या काळात वंध्यत्वा प्रमुख कारण म्हणून समोर आलं आहे. ताणतणावांमुळे गर्भधारणेत अडचणी येऊ शकतात. खूप ताण येणं आणि प्रत्येक गोष्टीची काळजी करत रहाणं यामुळे ताणाची पातळी प्रचंड वाढते. मद्यपान, धूम्रपान अशी कारणंही यामागे असू शकतात.

नोकरी करणाऱ्या बऱ्याच महिलांची खूप दगदग होते. काम आणि घर सांभाळताना होणारी धावपळ, येणारा प्रचंड ताण, जबाबदाऱ्यांचं ओझं पेलताना होणारी चिडचिड हे सुद्धा वंध्यत्वाला कारणीभूत ठरू शकतं. माहिती-तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना रात्रपाळीही असते. रात्री जागरण करून पुन्हा सकाळी लवकर मिटिंगलाही जायचं असतं. अशा परिस्थितीत



अपुऱ्या झोपेचेही आरोग्यावर विपरित परिणाम होतात. धावपळीच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांचं जेवणही वेळेवर होत नाही. जंक फूड, चहा, कॉफीचा अतिरेक होतो. या अशा जीवनशैलीमुळे स्थूलपणा वाढतो आणि याची परिणती वंध्यत्वात होते.

ताण वाढला की शरीरात विशिष्ट प्रकारचे हार्मोन्स स्त्रवायला सुरूवात होते. त्यामुळे सतत खावंसं वाटतं. अतिखाणं आणि जंक फूडच्या माऱ्यामुळेही खूप त्रास होतो. सततचा ताण स्थूलपणाला कारणीभूत ठरतो. यामुळे गर्भाशयात बीजांडांची निर्मिती होण्यात अडथळे येतात. मासिक पाळी अनियमित होते. चुकीच्या जीवनशैलीचा फक्त महिलांच्या शरीरावर परिणाम होतो असं नाही. पण पुरूषांनाही याचा त्रास होऊ शकतो. सतत जंक फूड खाणाऱ्या पुरूषांमधल्या शुक्राणूंच्या संख्येत घट झाल्याचं आढळून आलं आहे.

ही समस्या सोडवण्यासाठी सहा ते आठ तासांची शांत झोप घेणं गरजेचं आहे. झोपण्याआधी व्यावसायिक ई मेल्स तपासू नयेत. तसंच कामाशी संबंधित फोनही घेऊ नयेत. धूम्रपान,मद्यपानासारखी व्यसनं सोडायला हवी. ताण कमी करण्यासाठी चांगले छंद जोपासा. आवडीच्या गोष्टींमध्ये वेळ घालवा. घर आणि काम यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करा. वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याची सरमिसळ करू नका.

## ठसका हिरव्या मिरचीचा

आजीबाईंचा बटवा

उन्हाळ्यात आपण आईसक्रीमसारखे थंड पदार्थ खातो. प्रत्यक्षात आईसक्रीम गरम असतं. या दिवसात मसालेदार, तिखट फार खाल्लं जात नाही. मात्र उन्हाळ्यात हिरवी मिरची खाल्ल्याने लाभ होऊ शकतात. हिरव्या मिरचीत अँटी ऑक्सिडंट्स आणि पचनाला उपयुक्त ठरणारे फायबर भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे अन्नपचन सुलभ पद्धतीने होतं. गॅस, अपचन, बद्धकोष्ठता अशा विकारांमध्ये हिरवी मिरची गुणकारी ठरते. यातल्या बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मामुळे शरीरातले बॅक्टेरिया नष्ट होतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. जंतूसंसर्गाची समस्या कमी व्हायला मदत होते. मधुमेहींनी हिरवी मिरची खायला हवी.






# नागपुरात संविधान सन्मान संमेलन तर मुंबईत जाहीरसभा

# आघाडीच्या प्रचाराचा आजपासून झंझावात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**

विधानसभा निवडणुकीला एकसंघपणे सामोरे जाणाऱ्या महाविकास आघाडीच्या निवडणूक प्रचाराचा झंझावात आज, बुधवारपासून सुरु होत आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आज, मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मैदानात आयोजित महाराष्ट्र स्वाभिमान सभेत आघाडीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले जाणार आहे. या सभेत काँग्रेसकडून कर्नाटक, तेलंगणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातील जनतेसाठी गॅरंटी जाहीर केल्या जाणार आहेत. यानिमित्ताने महाविकास आघाडीकडून जोरदार शक्तिप्रदर्शन केले जाणार आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आज एकाच दिवशी उपराजधानी नागपूर आणि राजधानी मुंबईत प्रचारसभा होत आहेत. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला विदर्भाने हात दिला होता. विधानसभा निवडणुकीत या यशाची पुनरावृत्ती करण्यासाठी काँग्रेसने नागपूर येथे आज दुपारी १ वाजता संविधान सन्मान संमेलनाचे आयोजन केले आहे. राष्ट्रीय सवयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या रेशीम बाग परिसरातील कविवर्य सुरेश भट सभागृहात हे संमेलन पार पडणार आहे. या संमेलनाला मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी मार्गदर्शन करणार आहेत.

नागपूरचा कार्यक्रम आटोपून मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी हे मुंबईत येतील. आघाडीच्या वतीने वांद्रे-कुर्ला संकुलातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेत खरगे, गांधी यांच्यासह शरद पवार, उद्धव ठाकरे सहभागी होणार आहेत.

या सभेत महाविकास आघाडीच्या निवडणूक प्रचाराच्या शुभारंभाचा नारळ फुटणार आहे. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह आघाडीचे प्रमुख नेते या सभेला उपस्थित राहणार आहेत.

## राहुल गांधींच्या कार्यक्रमाला मीडिया बंदी नाही



बुधवारी नागपुरात होणाऱ्या संविधान सन्मान परिषदेत प्रसारमाध्यमांवर बंदी घालण्याचे दावे खोटे असून भारतीय जनता पक्षाकडून पसरवल्या जात असलेल्या अफवांचा भाग असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यंनी केला.

ते म्हणाले की, संघाची शिकवण आणि वारंवार खोटे बोलण्याची सवय यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उघड खोटे बोलले आहे. लोंढे म्हणाले की, संविधान सन्मान परिषदेचे लाईव्ह फीड ते काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडल आणि यूट्यूबच्या माध्यमातून प्रसारमाध्यमांना उपलब्ध होणार आहे, भाजपने पसरवलेल्या या अफवांवर मीडियाने विश्वास ठेवू नये. या संदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, रेशमबाग येथील कवी सुरेश भट्ट सभागृहात हे संमेलन होत आहे, त्यामुळे भाजपने असुरक्षिततेमुळे चुकीची माहिती पसरवली आहे. ते म्हणाले की, राहुल गांधी हे नेहमीच माध्यमांपर्यंत पोहोचतात, पत्रकार परिषद घेतात, मुलाखती देतात आणि मीडिया स्वातंत्र्यासाठी बोलतात. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 वर्षात एकही पत्रकार परिषद घेतली नाही. नरेंद्र मोदी मीडियाला घाबरतात म्हणून हे का? भाजपच्या राजवटीत मीडिया स्वातंत्र्याच्या बाबतीत भारताचा क्रमांक खूपच खालचा आहे. माध्यमांना डॉक मीडिया का म्हटले जाते?

मुंबईतील सभेत काँग्रेस पक्षाच्या गॅरंटी जाहीर केल्या जाणार असून त्या घराघरात पोहोचविल्या जातील. एकनाथ शिंदे-भाजप-अजित पवार युती सरकारने महाराष्ट्राचा स्वाभिमान गुजरातकडे गहाण ठेवला असून तो महाविकास आघाडी परत आणेल. भाजपच्या फेक नेरेटिव्हलाही चोख उत्तर दिले जाईल. तेलंगणात कोणत्या गॅरंटी जाहीर केल्या आणि त्याची अंमलबजावणी कशी सुरु आहे हे स्पष्ट केले आहे, अशी माहिती अतुल लोंढे यांनी आज दिली.

## बसपाच्या स्टार प्रचारकात ४० नावांचा समावेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**

मायावतींनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तयारी पूर्ण केली आहे. मायावतींच्या बहुजन समाज पक्षाने स्टार प्रचारक ठरवले आहेत. यासाठी एक यादीही जारी करण्यात आली असून, त्यात मायावती, त्यांचा पुतण्या आकाश आनंद यांच्यासह अनेक नेत्यांची नावे आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी बसपच्या स्टार प्रचारकांच्या यादीत मायावती, आनंद कुमार, आकाश आनंद, रामजी गौतम, नरबदा प्रसाद अहिरवार, सुनील डोंगरे, संतोष शिंदे, हुलगेश चलवाडी, मोहन राईकवार, मुकुंदराव सोनवणे, काळूराम चौधरी यांचा समावेश आहे. निशिकांत आल्टे, पृथ्वी शेंडे आणि मंगेश ठाकरे अशी नावेही या यादीमध्ये आहेत.

याशिवाय नागोराव जयकर, शांताराम तायडे, राजपाल गावंडे, आप्पासाहेब लोकरे, संजीव सदाफुले, सुदीप गायकवाड, दादाराव उईके, अब्दुल राहुफ भाई, योगीराज आनंद, किरण आल्हाट, रामचंद्र जाधव, विजय काळे, साहेबराव आदींचा यात समावेश आहे. विद्याताई रायकवार, रमेश नागदिवे, सुनील भरणे, अशोक उमरे, प्रवीण धोत्रे, अनिरुद्ध रणवीर, मोहसीन खान, संजय सूर्यवंशी, एलबी इंगळे, गोपाळ खांभाडकर, आनंद भालेराव यांचाही बसपच्या स्टार प्रचारकांच्या यादीत समावेश आहे.

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी बसपने जाहीर केलेल्या यादीत पक्षाध्यक्ष मायावती, उपाध्यक्ष आनंद कुमार, केंद्रीय समन्वयक आकाश आनंद, राज्य प्रभारी रामजी गौतम, राज्य प्रभारी गया चरण दिनकर, राज्य प्रभारी श्रीकांत, राज्य प्रभारी श्रीकांत यांची नावे आहेत.

## तिकीट कापण्याचे षडयंत्र महाराष्ट्रातून

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**



भाजप नेत्या पूनम महाजन यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपने कापलेल्या तिकिटावर प्रथमच भाष्य केले आहे. लोकसभा निवडणुकीत माझे तिकीट कापण्यात आले. ते एक षडयंत्र होते. पण मी ते षडयंत्र काय होते? ते कुणी रचले होते? ते शोधण्याच्या फंद्यात पडले नाही, असे पूनम महाजन म्हणाल्या.

मी प्रमोद महाजन यांची कन्या आहे. मी काम करण्याला जास्त महत्त्व देते, असे त्या म्हणाल्यात. प्रमोद महाजन यांची हत्या हा कौटुंबिक विषय नव्हता, तर ते एक खूप मोठे षडयंत्र होते. माझ्या वडिलांना रोखण्यासाठी त्यांची हत्या करण्यात आली, असा दावाही पूनम यांनी यावेळी केला.

पूनम महाजन म्हणाल्या, संघर्ष वाट्याला येतो तेव्हा संघर्ष करण्याला महत्त्व आहे. माझी विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा नव्हती. मी प्रमोद महाजन यांची कन्या आहे. त्यांची शिकवण माझ्यापुढे आहे. माझे तिकीट का कापले? हे मी केव्हाच विचारले नाही.

## महाराष्ट्राच्या निवडणुकीत योगींची एन्ट्री

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ :**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची तयारी जोरात सुरू आहे. आता प्रचारासाठी अवघे १५ दिवस उरले आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ भाजपचे स्टार प्रचारक म्हणून महाराष्ट्रात येत आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची पहिली जाहीर सभा बुधवारी ६ नोव्हेंबर रोजी वाशिम विधानसभेत होत आहे. ज्यामध्ये ते भाजपचे उमेदवार श्याम खोडे यांचा प्रचार करणार आहेत.

योगी आदित्यनाथ यांच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी पोस्टर देखील लावण्यात आले असून त्यात त्यांचा उल्लेख 'हिंदूयोद्धा' असा करण्यात आला आहे. तसेच योगी आदित्यनाथ यांच्या स्वागत सभेत जेसीबी, बुलडोझर तैनात करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

**'बटेंगे तो कटेंगे' चर्चेत**

हरियाणा विधानसभा निवडणुकीदरम्यान योगी यांचा नारा 'बटेंगे तो कटेंगे' हा चांगलाच गाजला होता. त्यांच्या या घोषणेने हरियाणा निवडणुकीचे चित्र बदलल्याचे मानले जात आहे. आरएसएसनेही या विधानाचे समर्थन केले आहे.

त्याचवेळी सीएम योगींच्या या वक्तव्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही गुजरातमध्ये 'आपण एकत्र आहोत तर सुरक्षित आहोत' असे वक्तव्य केले होते. अशा परिस्थितीत योगी आदित्यनाथ वाशीमच्या जाहीर सभेत काय बोलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वाशीम विधानसभा मतदारसंघातून भाजपने श्याम खोडे यांना रिंगणात उतरवण्यात आले आहे. तर त्यांच्यासमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार सिद्धार्थ देवळे उभे आहेत.

## उद्धव ठाकरेंची बंडखोरांवर कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ :**


महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने बंडखोरांवर मोठी कारवाई केली आहे. पक्षविरोधी कारवायांमुळे पाच नेत्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. त्यात भिवंडीचे माजी आमदार रुपेश म्हात्रे, विश्वास नांदेकर, चंद्रकांत घुगुल, संजय आवारी, प्रसाद ठाकरे यांचा समावेश आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे भिवंडी लोकसभा मतदारसंघ संपर्कप्रमुख रुपेश म्हात्रे यांची पक्षविरोधी कारवायांमुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. रूपेश म्हात्रे यांनी भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. तसेच पक्षविरोधी वक्तव्ये आणि कारवायांमुळे त्यांची हकालपट्टी करण्यात आली. मात्र, दुसरीकडे त्यांनी अर्ज मागे घेतला होता.

याशिवाय वणी विधानसभा जिल्हाप्रमुख विश्वास नांदेक, झरी तालुकाप्रमुख चंद्रकांत घुगुल, मारेगाव तालुकाप्रमुख संजय आवारी, यवतमाळ जिल्हा वणी तालुकाप्रमुख प्रसाद ठाकरे यांचीही पक्षविरोधी कारवायांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयाने दिली आहे.

## लोकारोग्य

### डोळ्यांचे आरोग्य आणि उपचार



मानवी शरीराचा सर्वात नाजूक अवयव म्हणजे आपले डोळे. याच डोळ्यांनी आपण साऱ्या सृष्टीचं दर्शन घेतो. किंबहुना मनुष्य डोळस असेल तरच त्याच जगणं सहजसाध्य असत. म्हणूनच आपले डोळे हे आपला अनमोल असा ठेवा आहेत.

परंतु, अनेकदा काही कारणांमुळे डोळ्यांचे आजार उद्भवतात. अनेकांना दूरच किंवा जवळच न दिसू लागल्याने डोळ्यावर चष्मा देखील लागतो. काहींचे डोळे अकाली अंधुक होतात किंवा डोळ्यांमध्ये तिरळेपणा येतो. मुळातच डोळ्यांचे हे आजार नेमके कोणते असतात?आणि आपल्या डोळ्यांची काळजी नेमकी कशी घ्यायला हवी? डोळ्यांच्या आजारावर उपचार कोणते आहेत? यासंदर्भात नेत्रशल्य विशारद डॉ. मंगेश प्रभू यांच्याशी केलेली बातचीत.

○ डोळ्यांचे आरोग्य म्हणजे नेमकं काय? डोळ्यांची काळजी कशी घ्यावी?

■ डोळ्यांच्या आरोग्याच्या बाबतीत अनेक लोकांचा गैरसमज हा असतो की, डोळ्यांमध्ये गुलाबपाणी टाकले किंवा एखादे औषध टाकले कि आपण डोळ्यांची योग्य काळजी घेतो. परंतु हे चुकीचे आहे. आपल्या सभोवताली जे वातावरण आहे ते प्रदूषित आहे. याच वातावरणातील घाण डोळ्यात जाऊ नये म्हणून रोज सकाळ संध्याकाळ आपले डोळे हे थंड पाण्याने धुवायला हवेत. आपले डोळे डोळ्यांच्या डॉक्टारांकडे जाऊन वेळच्यावेळी तपासायला हवेत. तसेच आपल्या डोळ्यांच्या आरोग्यासाठी आपल्या आहारात अ जीवनसत्वाची अत्यंत आवश्यकता असते. हे अ जीवनसत्व आपल्याला गाजर,पपई आणि हिरव्या पालेभाज्यांमधून मिळत. म्हणूनच, आपल्या आहारात या पालेभाजा आणि गाजर व पपई चा समावेश असायला हवा. यामुळेच डोळ्यांचं आरोग्य हे सुधृढ राहत.

○ लहान मुलांच्या बाबतीत डोळ्यांची काळजी नेमकी कशी घ्यायला हवी?

■ लहान मुलं जेंव्हा जन्माला येत त्यानंतर साधारणपणे ३ दिवसानंतर त्याला दिसायला लागत. हळूहळू रंगांची ओळख देखील होऊ लागते. पहिल्या ३ महिन्यात जर मुलाला अंधत्व असेल असं कळलं तर वेळीच उपचार सुरु करायला हवेत. त्याच्या डोळ्यांची तपासणी करणे गरजेचें असते. शिवाय मुलाच्या डोळ्यांना दुखापत होऊ नये म्हणून देखील पालकांनी जपायला हवं. लहान मुलांना चष्मा फार लवकर लागतो त्यांच्या डोळ्यांमध्ये तिरळेपणा येतो अनेकदा जन्मतः मुलाला काही आजार असतात त्याचा देखील डोळ्यांवर परिणाम होतो. लहान मुलांना ६ वर्षापर्यंत मोबाईल हातात देऊ नये कारण, मोबाईलचा प्रकाश डोळ्यात गेल्याने डोळ्याची बाहुली आकुंचन पावते हे फार घातक असत. याशिवाय डोळ्यात काजळ घालणे. सुरमा घालणे असे अघोरी प्रकार करू नयेत त्यामुळे डोळ्यांना इजा पोहचू शकते.

○ कम्युटर, मोबाईल युगात डोळ्यांची काळजी कशी घ्यावी?

■ हल्ली कम्युटरवर काम करणे अपरिहार्य आहे. परंतु आपण कम्युटर समोर बसताना कम्युटर आपल्या डोळ्यांपेक्षा २ ते ३ इंच खाली असेल असं बसावं, जेणेकरून आपल्या डोळ्यांच्या भोवती जे पापण्यांचे आवरण असते त्यावर ताण पडत नाही. कम्युटर समोर सलग बसून काम न करता मध्ये ५ मिनिट ब्रेक घेऊन फिरून यावं आणि नंतर काम करावं. सतत कम्युटर समोर बसून काम केल्याने आपल्या डोळ्यांची बाहुली आकुंचन पावते त्यासाठी आपल्या डोळ्यावर दोन्ही हात ठेऊन १ मिनिट दाबून धरावेत त्यामुळे डोळ्याची बाहुली प्रसरण पावते.शिवाय डोळ्यांमध्ये आर्टिफिशील टियर्स टाकावेत. मोबाईल वापरताना तो लाईट मध्ये वापरावा ज्यामुळे डोळ्यांना ताण पडणार नाही. लाईट बंद करून अंधारात मोबाईल वापरल्याने मोबाईलचे लाईट थेट डोळ्यात जाऊन डोळ्यांना इजा पोहचते.यासाठी कम्युटर समोर बसताना कम्युटरच्या पाठच्या बाजूला लाईट लावूंन काम करावं. त्यामुळे लाईट थेट आपल्या डोळ्यांमध्ये जात नाही.

○ डोळ्यावर लागलेला चष्मा कालांतराने जातो का? त्यासाठी उपचार काय आहेत?

■ डोळ्यावर चष्मा लागल्यानंतर अनेकजण नंबर कमी व्हावा आणि चष्मा कायमचा जावा याकरिता आयुर्वेदिक औषध घेत असतात, परंतु हे चुकीचे आहे आपल्या डोळ्यांची लांबी वाढल्याने किंवा बुबुळ वाकडीतिकडी झाल्याने चष्म्याचा नंबर लागतो जो कोणत्याही आयुर्वेदिक औषधाने जात नाही. मात्र लेसर किरणने शस्त्रक्रिया करून चष्मा काढून टाकता येतो.मात्र त्यासाठी योग्य त्या नेत्र विशारद डॉक्टर यांचा सल्ला घ्यावा नंतरच उपचार करावेत. ■ ■ ■

### स्ट्रोकच्या रुग्णांसाठी आधुनिक उपचारांचे वरदान

मेंदूच्या काही भागाला होणाऱ्या रक्त पुरवठ्यात अडथळा निर्माण झाल्याने व त्यामुळे मेंदूच्या कार्यात बिघाड झाल्याने होणारा हा आजार म्हणजे स्ट्रोक ( पक्षाघात). स्ट्रोकचा उपचार घरच्या घरी किंवा सीटी स्कॅन, एमआरआयसारख्या स्ट्रोकचे निदान करण्याची सुविधा नसलेल्या ठिकाणी किंवा तज्ज्ञ उपलब्ध नसलेल्या ठिकाणी करू नये.

स्ट्रोक सामान्यतः जेव्हा मेंदूला रक्तपुरवठा मर्यादित असतो तेव्हा होतो. हे मुख्यतः इस्केमिक स्ट्रोक किंवा हेमोरेजिक स्ट्रोकमुळे होते. स्ट्रोकमुळे विविध शारीरिक कार्यात बिघाड होतो तुमच्या मेंदूचे नुकसान होऊ शकते.बरीच लोक स्ट्रोकशी संबंधित प्राथमिक चिन्हे ओळखण्यात अयशस्वी ठरतात ज्यामुळे उपचारांना उशीर होतो. जर रुग्णाला ताबडतोब रुग्णालयात दाखल केले तर तेथे अनेक उपचार पर्याय आहेत जे मेंदूला होणारे नुकसान कमी करण्यास मदत करू शकतात.



**मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी :** ही एक प्रकारची मिनिमली इन्व्हेसिव प्रक्रिया आहे जी बहुतेक इस्केमिक स्ट्रोकने ग्रस्त रुग्णांसाठी वापरली जाते.

**क्रॅनियोटॉमी :** स्ट्रोकमध्ये रक्तस्त्राव झाल्यास डॉक्टर तुम्हाला क्रॅनियोटॉमी सुचवू शकतात. ही एक शस्त्रक्रिया आहे जिथे मेंदूमध्ये प्रवेश करण्यासाठी कवटीचा काही भाग काढून टाकला जातो.यात रक्तस्त्राव झाल्यामुळे होणारा दबाव कमी होण्यास मदत होते. रक्तस्त्रावाचा स्त्रोत ओळखल्यास मेंदूला होणारे भविष्यातील नुकसान टाळता येऊ शकते.

**एंडोव्हस्कुलर थेरपी :** हे एक नवीन तंत्र आहे जे विशिष्ट उपकरणांचा वापर करून थेट गुठळ्या काढून टाकण्यासाठी वापरले जाते.

**डॉ. नितीन डांगे** विभाग प्रमुख, डायरेक्टर इंटरव्हेंशनल न्यूरोलॉजी, स्ट्रोक केअर आणि न्यूरोसर्जरी, ग्लेनईगल्स हॉस्पिटल परेल, मुंबई.

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## ...त्यांना बाळासाहेब कधीच माफ करणार नाहीत

### संजय राऊत यांचा पलटवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**



राज ठाकरे यांनी गॅलरीत बघून बोलू नये, त्यांनी सभागृहात, मुख्य मैदानात काय चालले आहे, यावरून बोलावे. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरेंची होती. तर हीच शिवसेना एकनाथ शिंदेंच्या घशात घालणारे मोदी - शहा कोण? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित करायला हवा होता. असे म्हणत उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. राज ठाकरे मोदी शहांची तळी उचलत असल्याचा आरोप त्यांनी केला. राज ठाकरेंनी यावर बोलायला हवे, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

शिवसेना कोणाची हे सांगण्यासाठी राज ठाकरे यांच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. आज राज ठाकरे फडणवीस, अमित शहा आणि मोदी यांना आपले नेते मानतात.

त्यांनीच ही बाळासाहेब ठाकरेंची प्रॉपर्टी बेकायदेशीरपणे एकनाथ शिंदे यांना दिली आहे. त्याच भारतीय जनता पक्षाचा मुख्यमंत्री आपण महाराष्ट्रात करायला निघाला आहात? अशी टीका राऊत यांनी राज ठाकरे यांच्यावर केली. राज ठाकरे यांना बाळासाहेब ठाकरे कधीही माफ करणार नाही, अशा शब्दात राऊत यांनी राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

## सर्वतोपरी प्रयत्न करू खा. सुनिल तटकरे

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ :**

काही अपवादात्मक मतदारसंघात अर्ज दाखल झाले असले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अजित पवार यांच्याशी एकत्रित चर्चा झाली आहे. त्यामुळे जे-जे मतदारसंघ सोडण्याचे निर्धारित झाले होते त्याठिकाणी एकत्रित काम कसे करता येईल यासाठी युध्दपातळीवर आम्ही प्रयत्न करत आहोत. त्या - त्या मतदारसंघातील वातावरण योग्य पध्दतीने पूरक होईल असा प्रयत्न नक्कीच केला जाईल, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांनी दिले.

आमच्यामध्ये फारशी जागांची संख्या नसून ९० ते ९५ टक्के जागांवर महायुतीचे उमेदवार म्हणून उत्तम पध्दतीने काम सुरू झाले आहे. २८८ जागांवर महायुती पूर्ण ताकदीने,आणि संपूर्ण शक्तीने एकत्रित निवडणूक लढत आहोत. अन्य ठिकाणी अपक्ष उमेदवार हे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीचे असतील तर त्यांना समजून सांगू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## क्रेटा कारमधून ९५ लाख जप्त

■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. ५ :**

पुणे - बंगळुरू महामार्गावर वाहनांच्या तपासणीत सुमारे ९५ लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. सातारा तालुक्यातील शेंद्रे या ठिकाणी क्रेटा कारमध्ये ही रोकड सापडली आहे. महामार्ग पोलिसांनी ही रोकड ताब्यात घेतली असून ही रोकड नेमकी कुणाची? याचा तपास सातारा ग्रामिण पोलिस करत आहेत.

सातारा तालुका पोलिसांनी क्रेटा कारमधून (क्र. एम. एच. ४८ सी. टी. ५२३९) ९५ लाख रुपयांची रोकड केली. तसेच राजस्थानच्या मनोज गोयल व दिपू चव्हाण या २ तरूणांना ताब्यात घेतले. या दोन्ही तरूणांची चौकशी केली असता त्यांनी ही रक्कम मुंबईहून कोल्हापूरला नेत असल्याचे सांगितले.

कार मालकाचे नाव मुकेश कस्तुरचंद्र देवरा, (रा. गोकुळ प्लाझा, विरार वेस्ट , पालघर) आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे पुणे-बंगळुरू महामार्गावरील तासवडे (ता. कराड) टोलनाक्यावर २७ ऑक्टोबर रोजी रात्री पोलिसांनी कारमधून ७ कोटी ५३ लाख रुपए किंमतीचे ९ किलो सोने व ६० किलो चांदी जप्त केली होती. तत्पूर्वी, गुजरात पासिंगच्या बोलेरो गाडीतूनही १५ लाखांची रोकड जप्त करण्यात आली होती. त्यानंतर दिवाळीच्या दोन दिवस आधी साताऱ्याजवळच्या आनेवाडी टोलनाक्यावर तहसीलदारांच्या पथकाने एका वाहनातून ३४ लाखांचे सोने जप्त केले होते.

## बहुजन विकास आघाडीला विधानसभेसाठी शिट्टी चिन्ह

■ **महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. ५ :**

बहुजन विकास आघाडीला विधानसभेसाठी शिट्टी हे चिन्ह देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी सकाळी दिला. यामुळे पालघर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

पालघर जिल्ह्यात बहुजन विकास आघाडीचे ३ आमदार असून पक्षाचे शिट्टी हे पारंपरिक चिन्ह आहे. निवडणूक आयोगाने ३० जानेवारी २०२४ रोजी शिट्टी हे चिन्ह जनता दल (युनायटेड) या पक्षासाठी राखीव ठेवले होते. मात्र त्यानंतर २३ मार्च २०२४ रोजी आयोगाने नवीन अधिसूचनेत शिट्टी हे चिन्ह मुक्त चिन्हांच्या यादीत समाविष्ट केले. त्यानंतर अनेक अपक्षांनी या चिन्हाची मागणी केली होती.

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा भाऊ कदम स्टार प्रचारक

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ :**



चला हवा येऊ द्या फेम भाऊ कदम राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा अधिकृत स्टार प्रचारक असणार आहे. त्याने अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेला नाही. अजित पवारांची भेट घेतल्यानंतर त्याने याबाबत माहिती दिली.

भाऊ कदम म्हणाला, अजित पवारांबरोबर माझी सदिच्छा भेट झाली. अजित पवार कलाकारांना मान देणारे आणि त्यांचे प्रश्न सोडवणारे नेते आहेत. त्यांनी आताच अनुदानाचा प्रश्न सोडवला. कलाकारांच्या समस्या पूर्णत्वास न्यायचे असतील तर ते चांगले मार्गदर्शक आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचाराला जायला काहीच हरकत नाही. त्यांनी आमच्यासाठी केलं आहे तर आम्हीही त्यांच्यासाठी प्रचार करणार.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात अद्याप पक्षप्रवेश झाला नसल्याचं भाऊ कदमने स्पष्ट केलं. पण तो पुढे असंही म्हणाला की पक्षात जाण्यास हरकत नाही. परंतु, इंडस्ट्रीमध्ये अजून खूप कामं करायची आहेत. दादा आमच्या पाठीशी आहेत. मी जरा लोकांचं मनोरंजन करतो, दादा आमचं मनोरंजन करतील.

सुनील तटकरे आणि सिद्धार्थ कांबळे आता प्रचाराचं शेड्युल ठरवतील. मी कोणत्या भागात जायला हवं याबाबत सांगितलं जाईल. तिथे जाऊन मी प्रचार करणार आहे, असं भाऊ कदम म्हणाला.

**दोघांनी एकत्र यावे..**

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, अजित पवार आणि शरद पवारांनी एकत्र यावे, अशी इच्छा भाऊ कदम यांनी बोलून दाखवली. भाऊ कदम म्हणाले, पवार कुटुंबात काय झाले मला माहिती नाही, मात्र मला वाटते शरद पवार आणि अजित पवारांनी एकत्र यायला हवे आणि अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, एकच वादा अजित दादा, गद्दारीबद्दल मी बोलणार नाही, त्यातील नेमकी माहिती माझ्याकडे नाही, असेही स्पष्टीकरण भाऊ कदम यांनी दिले. शरद पवार आणि माझी बारामतीमध्ये एका नाटकाच्या प्रयोगावेळी भेट झाली होती. त्यावेळी शरद पवारांनी एका नाटकात काम केले होते, त्याचा फोटो त्यांनी मला दाखवला होता, अशी आठवण भाऊ कदम यांनी सांगितली.

नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ बुधवार, दि. ६ नोव्हेंबर २०२४ ■

## भाजपासाठी संघ थेट मैदानात उतरणार?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
संघाने समन्वय बैठकीतून प्रथमच थेट भाजपचे नाव घेत निवडून आणण्याचे आवाहन केल्याची माहिती आहे. तीन महिन्यांपासून रा. स्व. संघाच्या समन्वय बैठका सर्वत्र सुरू आहे. यापूर्वीच्या निवडणुकांतून संघाने समन्वय बैठकांतून कधीही भाजपचे नाव घेतले नव्हते. आता संघाकडून थेट भाजपला निवडून आणण्याचा संदेश स्पष्टपणे देण्यात येत असल्याचे समजते.

याशिवाय वेगवेगळ्या ठिकाणी प्रभात शाखांकडून कोजागरी उत्सवातूनही जनजागरण करण्यात येत आहे. कोजागरी अमृतवचन, सांघिक गीत, संघाच्या पंचधारेविषयी उपस्थितांचे विचार, भाग संघचालकांचे उद्बोधन व शतप्रतिशत मतदान व राष्ट्रहिताय मतदानाचे आवाहन, गणेशवंदना, राष्ट्रभक्तिपर गीत, गरबा नृत्याचे सादरीकरण, सहभोजन व दुग्धपान असे कार्यक्रम केले जात आहे.

संघ विचारांनी प्रेरित व्हॉट्सॲप ग्रुपवरूनही हिंदुत्वाचा जोरकस प्रचार करण्यात येत आहे. यामध्ये राज्यासह देशभरात जेहादींच्या कृष्णकृत्याचे व्हिडिओ पोस्ट करणे, हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्यांना निवडून आणण्याचे आवाहन करणारे व्हिडिओ व्हायरल केले जाणार आहेत. यासाठी राज्यातील सुमारे ५०० संतांची यादी झाली आहे. समरसतेचा संदेशही यात दिला जाणार आहे. ५ नोव्हेंबरपासून व्हिडिओ पोस्ट करण्याला गती येईल असे सूत्रांनी सांगितले.

## दक्षिण, मध्य, पूर्व नागपूरमध्ये निवडणूक कार्यालयांचे उद्घाटन

# काँग्रेसला साठ वर्षांचा हिशेब विचारा - गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
जे स्वतःच्या ताकदीवर निवडून येऊ शकत नाहीत, ते जातीपातीचे राजकारण करतात. भाजपने दहा वर्षांत जात-पात बाजूला ठेवून शहरातील लोकांच्या समस्या सोडवल्या. जनसेवेचे, विकासाचे राजकारण केले. रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी काम केले. जे काँग्रेसला साठ वर्षांत जमले नाही, ते आम्ही अवघ्या एका दशकात करून दाखवले. मत मागायला येणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांना साठ वर्षांचा हिशेब मागा, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.






गडकरी यांच्या हस्ते दक्षिण, पूर्व व मध्य नागपूर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन झाले. दक्षिण नागपूर येथे अयोध्या नगर चौकात भाजप आमदार मोहन मते, पूर्व नागपुरातील छापरू नगरमध्ये आमदार कृष्णा खोपडे व मध्य नागपुरातील अयाचित मंदिर चौकात आमदार प्रवीण दटके यांच्या प्रचारार्थ गडकरी यांच्या सभा झाल्या. यावेळी गडकरी यांनी शहरातील विकास कामांचा आवर्जून उल्लेख केला.

ते म्हणाले, नागपूर शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या सुटली. आज ७५ टक्के नागपूरकरांना बारा ते चोवीस तास पाणी मिळत आहे. पूर्व व दक्षिण नागपुरातील अनधिकृत वस्त्यांमध्ये चांगले रस्ते झाले. नवीन ९३ पैकी ८३ जलकुंभ तयार झाले आहेत. मेट्रो रेल्वे आली, काँक्रिटचे रस्ते झाले, देशातील प्रतिष्ठित शिक्षण संस्था आल्या, आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे, रेल्वे स्थानकांचा कायापालट होत आहे.

गेल्यावर्षी अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाला. लोकांच्या घरात पाणी शिरले. तेव्हा काँग्रेसच्या नेत्यांनी आरोप केला की काँक्रिट रोडमुळे लोकांच्या घरात पाणी शिरले. यावषीर्ही जोरदार पाऊस आला. पण पाणी शिरले नाही. काँक्रिट रोड तर आज पण आहेत. आता कुठे गेले काँग्रेसवाले?, असा सवाल करत जे आयुष्यात काम करू शकले नाहीत, ते लोकांकडे बोट दाखवतात, अशी टीका गडकरी यांनी केली.

एनडीएच्या ४०० जागा आल्या तर हे लोक संविधान बदलतील, असा अपप्रचार काँग्रेसने केला. लोकांची दिशाभूल केली. काँग्रेसनेच वारंवार संविधान बदलले. आम्ही कधीही बदलले नाही. त्यामुळे काँग्रेसने खोटे पसरवले तर त्यांच्यावर विश्वास ठेवू नका, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी भाजपा उमेदवारांनी मागच्या कार्यकाळात केलेल्या कामांचा उल्लेख केला . तिन्ही ठिकाणच्या कार्यक्रमाला माजी खासदार डॉ. विकास महात्मे, अजय संचेती, भाजप नेते संजय भेंडे, राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) शहराध्यक्ष प्रशांत पवार, माजी आमदार प्रा. अनिल सोले, माजी नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, प्रमोद पेंडके आमदार विकास कुंभारे, दीपक देवघरे यांच्यासह भाजपाचे आजी माजी आमदार, तिन्ही मतदारसंघातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## १० लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
रात्री घराचा दरवाजा उघडा राहणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. चोरांनी हिच संधी साधून घरात प्रवेश करीत रोकड आणि सोन्याच्या दागिन्यांसह एकूण ९ लाख ८१ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी सीमा सुरेश मेश्राम (४८) रा. संत गुलाबबाबा मठ वस्ती, ग्रेट नागरोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

सीमा यांचा चहापत्तीचा व्यवसाय आहे. व्यवसायातील ३.५० लाख रुपये त्यांनी घरच्या कपाटात ठेवले होते. गत १ नोव्हेंबर रोजी सीमा यांचा मोठा मुलगा रात्री उशिरा घरी परतला. आत आल्यावर तो घराचा दरवाजा बंद न करताच झोपायला गेला. ही संधी साधून चोरांनी सीमा यांच्या घरात प्रवेश केला.

कपाटातील ३.५० लाखांची रोकड आणि सोन्याचे दागिने असा एकूण ९.८१ लाख रुपयांचा माल चोरी करून पसार झाले. चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

नागपूर शहरात गेल्या काही महिन्यात घरफोडी आणि चोरीच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बंद असलेल्या घरांची रेकी करून चोरटे त्या घरांना लक्ष्य करीत आहेत. पोलीस प्रशासन निवडणूक कामात असल्याचे चोरट्यांचे आयतेच फावते आहे.

# लोकसभेला शिवसेनेत विधानसभेला भाजपमध्ये!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
विधानसभा निवडणुकीत उमरेड मतदार संघातून माघार घेतल्यानंतर माजी आमदार राजू पारवे यांनी मंगळवारी दुपारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.



सुरुवातील काँग्रेसमध्ये, त्यानंतर लोकसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेत आणि आता विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

राजू पारवे मुळचे काँग्रेसचे. या पक्षाकडून ते २०१९ मध्ये उमरेडचे आमदार म्हणून निवडून आले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी काँग्रेसचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षाकडून ते रामटेक लोकसभा निवडणूक लढले. त्यात त्यांचा पराभव झाला.

सेनेकडून उमरेड विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळेल, या अपेक्षेने त्यांनी पक्षाकडे अर्ज केला होता. मात्र या मतदार संघातून भाजपने माजी आमदार सुधीर पारवे यांची शेवटच्या क्षणी यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे राजू पारवे यांनी सुधीर पारवे यांचा पाठिंबा जाहीर करुन निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे त्यांची अवस्था तेलही गेले अन् तुपही अशी झाली होती.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी प्रचार मिरवणुकीच्या निमित्ताने नागपूरला आले होते. प्रचार मिरवणूक संपल्यानंतर मुंबईला निघत असताना राजू पारवे धरमपेठेतील फडणवीस यांच्या निवास्थानी १० ते १२ समर्थकांसह पोहचले. फडणवीस यांना मुंबईला जायचे असल्यामुळे त्यांनी पारवे यांच्या गळ्यात भाजपचा दुपट्टा घालत पक्षात प्रवेश करुन घेतला आणि त्यांचे स्वागत केले. भाजपच्या ग्रामीण पदाधिकाऱ्यांना या पक्ष प्रवेशाची माहिती नसल्यामुळे आश्चर्याचा धक्का बसला.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उमरेड राखीव मतदारसंघातून राजू पारवे काँग्रेसचे उमेदवार होते व त्यांनी ही जागा दहा वर्षांनंतर काँग्रेसकडे खेचून आणली होती. आता ते भाजपामध्येच राहतील की पुन्हा उडी मारतील, याविषयी चर्चा सुरू आहेत.

## जुगार अड्डयांवर धाड, २२ जुगाऱ्यांना पोलिसांकडून अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
प्रवेशनगर भागात काही लोक मोकळ्या भूखंडावर जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी परिसरात घेराबंदी करून तेथे धाड टाकली.

यावेळी अरबाज अजीज अख्तर (19), अराफत कय्यूम खान (21), शरीफ बशीर शेख (24) तिन्ही रा. प्रवेशनगर, शारिक सादिक खान (20), अफसर अब्दुल रफीक शेख (25), मोहम्मद अजवद कय्यूम खान (22) तिन्ही रा. सैफीनगर, सरफराज शेख असीम शेख (25), अमजद रजा गुलाम अंसारी (23), सरफराज कलाम शेख (24), सय्यद इमरान सय्यद सादिक (22), सोहेल फिरोज खान (20) पाचही रा. मोठा ताजबाग, फजल कादीर कुरेशी (21) रा. नवी वस्ती टेका, मोहम्मद फैजान रियाजुद्दिन शेख (30) रा. गरीब नवाजनगर, शादाब अब्दुल सत्तार (22) रा. संघर्षनगर, रिजवान रफीक शेख (31) रा. हमीदनगर आणि दोन अल्पवयीन ताश पत्त्यांवर जुगार खेळताना रंगेहात सापडले.

पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन डावावर लावण्यात आलेले 8,080 रुपये रोख आणि मोबाईलसह 3.37 लाखांचा माल जप्त केला.

दुसरी कारवाई सक्करदरा पोलिसांनी शहंशाह चौकात केली. शहबाज शेख खालिद शेख (21) रा. निराला सोसायटी, मोठा ताजबाग, मोहम्मद आवेश मोहम्मद फिरोज (21) रा. यासीन प्लॉट, सय्यद वसीम सय्यद अख्तर (23) रा. यासीन प्लॉट, जिशान नवाज अब्दुल जाहिद (21) रा. शहंशाह चौक आणि उजैफ शाहिद खान (21) रा. ठाकूर प्लॉट, या 5 आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली.

त्यांच्याकडून डावावर लावलेले 3,550 रुपये रोख जप्त करण्यात आले. दोन्ही कारवाईमध्ये पोलिसांनी आरोपींवर जुगार बंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.



■ **नागपूर :** येथील वाठोडा परिसरातील बीएपीएस स्वामीनारायण मंदिरात १५०० हून अधिक वैविध्यपूर्ण पदार्थांचा समावेश असलेला अन्नकुट उत्सव साजरा करण्यात आला. हा सण दीपोत्सव सोहळ्यांचा एक भाग आहे. ५५०० वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णाने सुरू केलेली परंपरा पुढे चालू ठेवत, बीएपीएस स्वामीनारायण संस्थेने उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. संत आणि भक्तांनी मोठ्या भक्तिभावाने तयार केलेल्या १५०० हून अधिक पदार्थ सादर करण्यात आले.

## रेल्वे पुलाखाली करायचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
मागील वर्षभरापासून रेल्वेचे विकास कामे सुरू आहे. कंत्राटदाराकडून काही कामगार गेल्या आठ महिन्यांपासून अजनी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफार्म नंबर सात जवळ झोपडीत राहत आहेत. यातील पीडित तरुणी ही आई वडिलांसह राहते. तर आरोपी धीरज कुमार हा सुध्दा कामगार असून जवळपास राहत होता.

ते प्लॅटफार्मच्या बांधकामावर काम करीत होते. कामानिमित्त दररोज भेट व्हायची. यातूनच दोघांचीही मैत्री झाली आणि ते एकमेकांच्या प्रेमात पडले. आरोपी धीरज कुमारने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यांनी लग्नाच्या आणाभाका घेतल्या. धीरज कुमार संधी मिळताच अजनीच्या रेल्वे पुलाखाली तिच्यावर लैंगिक अत्याचार करायचा.

नंतर ईतवारी रेल्वे स्थानकावर विकास काम सुरू झाल्याने कामगारांना तेथे पाठविण्यात आले. त्याठिकाणी सुध्दा धीरज कुमार तरुणीवर लैंगिक अत्याचार करायचा.

दरम्यान मुलीच्या शरीरातील बदल बघून आई वडिल तिला रूग्णालयात घेऊन गेले. ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिच्या आई वडिलांनी विचारपूस केली असता धीरज कुमारचे नाव पुढे आले. त्यांनी आरोपीला बोलाविले. लग्न करण्यासाठी विनवणी केली. मात्र, लग्नाचे नाव ऐकताच तो पळाला.

तरुणीच्या तक्रारीवरून लोहमार्ग पोलिसांनी आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविला. पोलीस पथकाने त्याचे लोकेशन काढले असता तो वरूडला असल्याचे समजले.

पोलिसांनी वरूडहून त्याच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी त्याला न्यायालयात उपस्थित केले. ही कारवाई पोलीस निरीक्षक गावंडे यांच्या नेतृत्वात मजहर अली, पप्पू मिश्रा यांनी केली.

आरोपी धीरज कुमार याच्यावर प्रेयसी बलात्काराचा गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे तो छट पूजेच्या नावाखाली नागपुरातून बिहारला पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, त्यापूर्वीच त्याला पोलिसांनी अटक केली.

त्याने छटपूजा झाल्यानंतर लग्न करणार असल्याचे पोलिसांना सांगितले. मात्र, तरुणीने गुन्हा दाखल करुन अटक करण्याची मागणी करीत त्याला धडा शिकवला. तरुणीच्या पोटात असलेल्या बाळाबाबत अद्याप निर्णय घेण्यात आला नाही. तथापि, प्रियकराच्या अटकेनंतर संभ्रम निर्माण झाला आहे.

# आंभोऱ्यात बेधडक अवैध प्रवासी बोटींग



पर्यटकांच्या जीवाशी खेळ



■ गजानन लांजेवार
कुही, दि. ५ :
प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आंभोरा देवस्थानच्या मुख्य द्वाराशेजारीच अवैध बोटिंग वाल्यांनी दुकानदारी थाटलेली आहे. बिना टेंडर सुरू असलेली ही अवैध बोटिंग पर्यटकांच्या जीवाशी खेळ करत आहे. काही अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

विदर्भात प्रसिद्ध आंभोरा देवस्थान हे पाच नद्यांच्या संगमावर वसलेले असून, चैतनेश्वराचे शिवपिंड, नैसर्गिक सृष्टी सौंदर्याने नटलेली, मराठीचे आद्य कवी मुकुंदराज यांची समाधी येथे आहे. त्यांनी मराठीचा प्रथम ग्रंथ विवेकसिंधू येथेच लिहिला. गोसेखुर्द धरणामुळे पसरलेले वैनगंगा नदीचे अथांग पात्र. याच पात्रात अवैध प्रवासी बोटींग सुरू आहे. जिथे पाण्याचा अंत नाही, अशा ठिकाणी अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण होतो.

कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या केबल ब्रिजमुळे सध्या आंभोरा पर्यटकांचे पसंतीचे स्थळ झाले आहे. दुरवरून पर्यटक केबल ब्रिज वरची लाइटिंग व पाच नद्यांचा संगम पाहण्यासाठी येतात. आंभोरा येथे अजूनही बोटींगची निवीदा काढण्यात आली नाही किंवा कुणालाच कंत्राट देण्यात आले नाही. काही लोकांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कुठलीही परवानगी न घेता. बोटींगचा व्यवसाय सुरू केला आहे.

यासंदर्भात विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ

जे लोक पर्यटकांच्या जीवाशी खेळत आहेत बोटिंगच्या नावावर पर्यटकांची लूट करत आहेत अशा व्यक्तींच्या बोटी तात्काळ जप्त करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. कारवाई न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरू

**आकाश भोयर (स्थानिक प्रकल्पग्रस्त)**

---------------

प्रशासन व ग्रामपंचायत कडून कुठलीही परवानगी न घेता सुरू असलेली अवैध बोटींग पर्यटकांच्या जीवावर बेतू शकतो. या बोटी जप्त करून यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

**सुनिल किंदर्ले (उपसरपंच वेलतूर)**

# जि. प. माध्य. विद्यालय, अंबाझरीच्या तृप्ती व माहीचा गौरव




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, ५ :
दत्ता मेघे फाउंडेशन नागपूरतर्फे निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय अंबाझरीची सातवीची विद्यार्थीनी तृप्ती काळे व माही गोटेकर हिने आई माझे दैवत या विषयावर लिहिलेला निबंध उत्कृष्ट ठरला. याबद्दल आयोजन समितीचे अध्यक्ष रवी मेघे यांच्या हस्ते तिला ट्रॉफी सर्टिफिकेट व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत ३००० विद्यार्थ्यांनी सहभाग झाले होते. त्यापैकी ३२० विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. तृप्ती व माहीने यशाचे श्रेय आईवडिलांसह मुख्याध्यापिका वर्षा यावले, वर्गशिक्षक बंडू लोहारे आदींना दिले. तृप्ती व माहीचे माधुरी करपे, शरयू सांबारे, प्रफुल्ल काळे, सुजाता गेडाम, संगीता ढबाले, प्राजक्ता खांडेकर, योगेंद्र निमजे, प्रियंका बांते इतरांनी त्यांचे कौतुक केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६८ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, ५ : नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५१ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाईची सुरुवात केली आहे. मंगळवार (५) रोजी शोध पथकाने ६८ प्रकरणांची नोंद करून ४७,९००/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १७ प्रकरणांची नोंद करून ६,८००/ रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/- दंड) या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १००/-रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १२ प्रकरणांची नोंद करून ४,८००/ रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत २० प्रकरणांची नोंद करून २७,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्याचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,००० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ११ प्रकरणांची नोंद करून २,२००/ दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ६ प्रकरणांची नोंद करून ६,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.
तसेच उपद्रव शोध पथकाने हनुमान नगर झोन अंतर्गत मे. मनोरथ प्लाझा यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. नेहरू नगर झोन अंतर्गत रूबी कार बाजार यांनी कार पार्किंग जवळच्या फुटथपाथवर ठेवल्याप्रकरणी रू. ५,०००/-हजार यांचा दंड वसूल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. महेश किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. लकडगंज झोन अंतर्गत श्री. सचिन साहू यांनी रिकाम्या तेलाचे टिन टाकून फूटपाथ जवळचा परिसर घाण केल्याप्रकरणी रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला.




# विमाशी संघ जिल्हा व महानगरची सयुंक्त सभा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, ५ :
विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ नागपूर जिल्हा व महानगर कार्यकारिणीची संयुक्त सभा धनवटे नॅशनल कॉलेज मध्ये विमाशी संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार नोव्हेंबर रोजी पार पडली. विमाशि संघ नागपूर जिल्हा व महानगरचे अधिवेशन, नागपूर जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठींबा देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच उपस्थित समस्याग्रस्त शिक्षकांच्या समस्या जाणून घेत त्यांना आमदार सुधाकर अडबाले यांनी मार्गदर्शन करून चर्चा केली. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, महानगर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, महानगर कार्यवाह अविनाश बडे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर, कार्याध्यक्ष अरुण कराळे, विजय गोमकर, विश्वास गोतमारे, शैलेश येडके, धनराज राऊत, दिनकर ढवळे, दिलीप बांबल, लक्ष्मीकांत व्होरा, मंगेश घवघवे, सचिन इंगोले, छत्रपाल राऊत, दत्तराज उमाळे, संजय वांगे, अभिनय ढोबळे, भूषण कडुकर, गंगाधर पराते, पुरुषोत्तम ढगे, यशवंत कातरे, सरिता मिर्झापुरे, जयश्री नागपुरे, राकेश दुम्मपलवार, निलेश खोरगडे, धनराज सूर्यवंशी, वैभव चिमणकर, रमेश वानखडे, सागिर अहमद, विनोद भगत, विनायक परतेकी, मारोती घोरुडे, अलका भेंडे, किरण भुजाडे उपस्थित होते.

# सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचाऱ्यांना घ्यावे लागणारे हेलपाटे केव्हा संपणार






■ महासागर प्रतिनिधी
वाडी, ५ :
शासकीय कार्यालयात व शाळेत ते वर्ष नोकरी केल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासकीय दफ्तर दिरंगाईमुळे हक्काचे आर्थिक लाभ मुदतीत मिळत नसल्यामुळे सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी कार्यालयात हेलपाटे घ्यावे लागत आहे. जिल्हा परिषद प्रशासकीय व्यवस्था चुस्त दुरुस्त करण्याची गरज असून भावी आमदारांनी याबाबत दखल घेण्याची गरज आहे. सेवानिवृत्त झालेल्या जिल्हा परिषद शिक्षक व केंद्रप्रमुखांचे पीपीओ, जीपीएफ रक्कम, उपदान रक्कम, गट विमा रक्कम तसेच विक्री केलेल्या पेन्शनची रक्कम विहित मुदतीत मिळत नाही. सेवानिवृत्त झाल्यावर स्वतःचेच पैसे शिक्षकांना मिळत नाही. पेंशनधारकांनी दरमहा एक तारखेला पेन्शन बँक खात्यात नियमित जमा करण्याची अपेक्षा भावी आमदारांकडून व्यक्त केलेली आहे.
प्रतिक्रिया सेवा निवृत्त शिक्षकांना व केंद्रप्रमुखांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना किंवा कॅशलेस वैद्यकीय समूह विमा योजना लागू करण्यासाठी नेहमीच कार्यालयात जावे लागते.
शरद भांडारकर, राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेतर सेना, नागपूर केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने उपदानाची मर्यादा २५ लाख रुपये करण्यासाठी भावी आमदारांनी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा आहे.
वामन सोमकुवर, सेवानिवृत्त शिक्षक
एक वर्षापूर्वीच पेन्शन केस तयार करून सेवा निवृत्तीच्या दिवशी सर्व आर्थिक लाभ मंजुरीचे आदेश मिळण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने ऑनलाईन पेन्शन प तयार करण्यासाठी भावी आमदारांनी निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावे.
हरिश्चंद्र दहाघाने
-सेवा निवृत्त केंद्रप्रमुख
खाजगी शिक्षकांना सेवानिवृत्त झाल्यावर एक ते दोन महीन्यात सेवानिवृत्ताची रक्कम मिळते.परंतु जिल्हा परिषदच्या कर्मचाऱ्यांना आपले हक्काचे पैसे मिळण्यासाठी कार्यालयात जावे लागते.



# फेटरीत सार्वजनिक शारदा उत्सव

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, ५ :
नागपूर तालुक्यातील आदर्श ग्राम फेटरी येथे सार्वजनिक शारदा उत्सव मंडळातर्फे १० दिवसीय माँ शारदा उत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. शारदा मातेची आकर्षक मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. शारदा मातेच्या मूर्तीसमोर बुधवार १३ नोव्हेंबरपर्यंत विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे महिला व विद्यार्थ्यांसाठी सकाळ-संध्याकाळ्पूजा व आरतीसह विविध बौद्धिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. उत्सवाच्या शेवटच्या समारोपाच्या दिवशी बुधवार १३ नोव्हेंबर रोजी महापूजा व महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. आयोजनासाठी उत्सव समीतीचे अध्यक्ष अमित अखंड, उपाध्यक्ष देवानंद ताजणे, सचिव प्रणय शास्त्री, कोषाध्यक्ष कमलेश वाघमारे, सहसचिव आशिष गणोरकर, सहकोषाध्यक्ष डॉ.सौरभ देवकर, सरपंच रवींद्र खांबलकर, ग्रा.पं. सदस्य मुकेश ढोमणे,विजय शास्त्री, प्रशांत पवार, दिनेश शास्त्री , दिगंबर देवकर, राहुल शास्त्री, सुनील दोडेवार, सुनील नेरकर, वकील डोंगरे, विजय वाघमारे, प्रभाकर उईके, मोहन जाधव, जितेंद्र पवार, सुरेंद्र बेलेकर, किशोर उईके, उमेश चवके, विकास ताजणे, शंकर खांबलकर, धर्मराज डोंगरे, देवेंद्र निमजे प्रयत्नरत आहे.

# बहुजन समाज पक्षाचे मनोज सांगोळे उत्तर नागपूर, विधानसभेचे अधिकृत उम्मेदवार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, ५ :
बहुजन समाज पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून मनोज दशरथ सांगोळे, प्रभाग. उत्तर नागपूर, उम्मेदवार म्हणून निवडणूकीत उभा आहेत. बुध्दम राऊत, बहुजन समाज पार्टीचे वरिष्ठ नेते असून त्यांना दि. २२/१०/२०२४ ला पक्षातर्फे 'ए' 'बी' फार्म दिला होता. हे सत्य असून त्यांनी दि. २९/१०/२०२४ रोजी उम्मेदवारी अर्ज सादर केला होता, काही तांत्रिक श्रृटया निर्माण झाल्यामुळे त्यांचा उम्मेदवारी अर्ज बाद करण्यात आला, हे ही सत्य आहे. परंतु बहुजन समाज पार्टीचे प्रदेश अध्यक्ष यांना व ईतर नेत्यांना सोबत घेवून मी मनोज दशरथ सांगोळे, उमेदवारी अर्ज 'ए' बी' फॉर्म सादर करण्याकरिता दि. २८/१०/२०२४ ला देण्यात आला. तेंव्हा तो अर्ज दि. २८/१०/२०२४ ला सादर केला असून सोबतच अपक्ष उम्मेदवार म्हणून अर्ज सादर केला होता. बुध्दम राऊत यांचा अर्ज उपरोक्त नमूद केल्यानुसार बाद झाल्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. म्हणून पक्षाचा दूसरा कुठलाही उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे बहुजन समाज पार्टी पक्षाने मनोज दशरथ सांगोळे, यांना अर्ज स्वीकारण्यास मंजूरी प्रदान केली हे ही सत्य आहे.
अफवांच्या बाजारात बुध्दम राऊत व राज्यस्तरीय पक्ष प्रमुखांविषयी विषयी अपप्रचार होत असून पक्षाची बदनामी होत आहे. आता सत्य व असत्य हे तुम्हाला चांगल्याने माहिती आहे. तरी सूध्दा काही पत्रकार बंधु मला सातत्याने 'ए बी' फॉर्म राऊत चा सांगोळेचा विचारीत आहेत, त्यामुळे मतदारांमध्ये व जनतेमध्ये भ्रम निर्माण झाला आहे. जसे दि.४/११/२४ ला जे सोशल मिडीयावर प्रदेश अध्यक्ष सुनिल डोंगरे यांच्या सहीनिशी एक पत्रक प्रसारीत होत असून त्यामध्ये मंगेश ठाकरे, प्रदेश महासचिव, पृथ्वी शेंडे, जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार, यांना पक्षातून निलंबीत केल्याचे खोटे पत्र अफवा पसरविण्याकरिता प्रसारीत होत आहे, यांचा खुलासा माध्यामांना प्रदेश अध्यक्षांनी केलेला आहे,

# मतदार जनजागृतीसाठी व्होटेथॉन दौड



वोट नागपूर वोट लोगोचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते अनावरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, ५ : येत्या नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत नागपूर शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करावे, याकरिता सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात स्वीप कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे मतदार जनजागृतीसाठी व्होटेथॉन दौडचे आयोजन करण्यात येत आहे. या दौडच्या वोट नागपूर वोट लोगोचे नागपूरचे निवडणूक निरीक्षक श्री. संतोषकुमार मिश्रा आणि जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या हस्ते अनावरण मंगळवारी(ता: ५ ) करण्यात आले. सिव्हिल लाईन्स स्थित जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित छोटेखानी समारंभात अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री तुषार ठोंबरे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. प्रवीण महिरे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, साप्रवि चे अधीक्षक श्री. राजकुमार मेश्राम, जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर व श्री. अनंत नागमोते प्रामुख्याने उपस्थित होते. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार स्वीप अंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारा मतदार जनजागृती करिता शनिवार, ९ नोव्हेंबर २०२४ सकाळी वाजता, धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे व्होटेथॉन मतदार जनजागृती दौडचे आयोजन करण्यात येत आहे. याठिकाणी झुम्बा, डान्स, रनींग, फन वॉक, फॅन्सी ड्रेस आदी विविध माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. व्होटेथॉन मध्ये भाग घेण्यासाठी सर्वप्रथम विशेष म्हणजे, व्होटेथॉन साठी नोंदणी करणाऱ्या प्रथम ५००० नागरिकांना टी-शर्ट मोफत दिली जाणार आहे.

## सचिन येलुरे सोशल मिडिया प्रदेश सचिवपदी



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा , ५ महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीच्या वतीने नुकतेच सोशल मीडियाच्या महाराष्ट्र प्रदेश पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यात निलडोह येथील काँग्रेस कार्यकर्ते सचिन येलुरे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सोशल मीडियाच्या सचिवपदी निवड करण्यात आली. त्यांनी या निवडीबद्दल अखिल भारतीय कांग्रेस सोशल मिडिया अध्यक्ष सुप्रिया श्रीनेत , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, प्रदेश सोशल मिडिया प्रमुख विशाल मुत्तेमवार, प्रदेश प्रभारी नितीन अग्रवाल, सरचिटणीस प्रमोद मोरे ,माजी मंत्री सुनिलजी केदार, आमदार, अभिजित वंजारी, प्रसन्ना तिडके, बाबा आष्टनकर,कुंदा राऊत यांचे आभार व्यक्त करून काँग्रेसची विचारधारा सोशल मीडियाच्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या या निवडीबद्दल आकाश तायवाडे, श्रेया ठाकरे, सत्येंद्र सिंग उमेश मोर्या, भुषण बावणे, सतिश सराटकर,सोनू शेंडे,निलेश चौधरी ,अमोल पौनीकर,आदित्य कोढे,सचिन राऊतकर,प्रशांत तोडकर, धिरज खंगार जितेंद्र मांदाडे,सचिन वानखेडे, चेतन रेवाडे,प्रशांत नेवारे,गौरव चौधरी,पंकज शेंडे,रोशन ठाकरे,शंकर निंबर्ते, यांनी अभिनंदन केले.

# पाठीत खंजीर खुपसने म्हणजे विकास नव्हे खा. अमोल कोल्हे



## वाडीत महाविकास आघाडीची जाहीर सभा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, ५नोव्हेंबर
पायात घालायच्या चप्पल पासून तर माणूस गेल्यानंतर तिरडीवर अंतसंस्काराला लागणारा कापड यावरसुध्दा जीएसटी लागली आहे. दिवाळीत खोबरं वरून वर गेले म्हणजेच करंज्या करताना तुम्ही सरकारला लय आठवणीने आशीर्वाद दिले असतील. अगदी गरीब माणसाचं जे महिन्याचा जेवणाचा खर्च होता तो हा आता साडेचार हजार रुपये झाला आहे. आज ही सगळीच्या सगळी गुंतवणूक ही गुजरातकडे पाठवण्यात आले. महाराष्ट्राची भाकरी खाऊन गुजरातची चाकरी करत असतील तर आपल्या कष्टाचा उपयोग काय ? अठरापगड जाती बलुतेदाराच्या कल्याणाची जी मुहूर्त भेट छत्रपती शिवाजी महाराजांनी रोवली होती त्याची नांदी आणि त्याची साक्ष देणारी तुतारी याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तुतारी आहे आणि म्हणूनच तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह घरोघरी पोहोचवून रमेशचंद्र बंग यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा. असे प्रतिपादन खासदार अमोल कोल्हे यांनी केले. दत्तवाडी येथील गजानन सोसायटीमधील क्रिडा मैदानावर हिंगणा विधानसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार गट ) उमेदवार रमेशचंद्र बंग यांची प्रचार सभा मंगळवार नोव्हेंबर रोजी पार पडली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रमेशचंद्र बंग, काँग्रेसचे भिमराव कडू, जि.प. सदस्य ममता धोपटे, प्रकाश कोकाटे, अश्विन बैस, रॉबीन शेलारे, शैलेश थोराने, महेश चोखांद्रे,राजेश थोराने , प्रमीला पवार,राष्ट्रवादी काँगेसचे प्रकाश गजभिये, प्रेमनाथ झाडे, संतोष नरवाडे, मोहन ठाकरे, वसंतराव ईखनकर,श्याम मंडपे, अमीत हुसनापूरे, दिनेश उईके, योगेश चरडे, अब्दुल आमीर खान शिवसेनेचे हर्षल काकडे, संतोष केचे, संजय अनासाने, रुपेश झाडे, विजय मिश्रा, कपिल भलमे, अखिल पोहणकर, संदीप उमरेडकर, मोहीत कोठे, क्रांतीसिंग उपस्थित होते. प्रास्ताविक दुर्योधन ढोणे यांनी केले.संचालन सुरेंद्र मोरे यांनी तर आभार मधु माणके पाटील यांनी मानले.

# घराचा ताबा अन १९ लाखांचा हार चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ०५ :
प्रतापनगर ठाण्यांतर्गत घर खाली करण्यावरून घरमालक आणि भाडेकरूत वाद सुरू होता. भाडेकरू बाहेर जाताच घरमालकाने घराचा ताबा घेतला. भाडेकरूने घरमालकावर घरावर ताबा करण्यासोबतच १९.२० लाख रुपये किंमतीचा सोन्याचा हार चोरी केल्याचाही आरोप लावला. या प्रकरणी पोलिसांनी राज आनंद (५९) रा. एनआयटी कॉलनी, स्वावलंबीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये एका महिलेसह ५ जणांचा समावेश आहे. आनंद मुळचे मोरगाव अर्जुनी येथील रहिवासी असून ॲग्रीकल्चर इंजीनिअर आहेत. नवेगाव येथे त्यांचे शेत आहे आणि ते शेतकऱ्यांना मार्गदर्शनही करतात. आनंद गत अडीच वर्षांपासून स्वावलंबीनगरात चुन्नू भूषण राऊत यांच्या घरी भाड्याने राहतात. गत १ नोव्हेंबरला ते साळा भोजेंद्र बेलेकर यांची प्रकृती बरी नसल्याने सकाळीच घराला कुलूप लावून कुटुंबासह ब्रम्हपुरी येथे गेले होते. २ नोव्हेंबरला सायंकाळी शेजारी राहणाऱ्या महिलेने पाच जण त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत घुसल्याची माहिती दिली.

# मताधिकाराची जाणीव करून देणारे मनपाचे मतदान जनजागृती रथ रवाना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, ५ :
विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांच्या मनात आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची आणि अधिकाराची जाणीव करून देणाऱ्या मनपाच्या मतदान जनजागृती रथाला नागपूरचे निवडणूक निरीक्षक श्री. संतोषकुमार मिश्रा आणि जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.
सिव्हिल लाईन्स स्थित जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित छोटेखानी समारंभात

**जनजागृती रथ तयार करण्यात आले आहेत.**
विधानसभा निवडणुकीमध्ये नागपूर शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करावे, याकरिता जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे विविध अभियान राबविण्यात येत आहेत.मतदान जनजागृती रथ देखील याचाच एक भाग असून, मतदान जनजागृती रथ शहरातील सहाही विधानसभा मतदान क्षेत्रात फिरून मतदारांना आपल्या मताधिकारा बद्दल जागरूक करणार आहे. तसेच शहरातील प्रत्येक पात्र व्यक्तीने मतदान करावे, यासाठी संपूर्ण शहरभर रथ जनजागृती करणार आहे.

अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री तुषार ठोंबरे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. अनुप खांडे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. प्रवीण महिरे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, साप्रवि चे



अधीक्षक श्री. राजकुमार मेश्राम, जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, श्री. अनंत नागमोते प्रामुख्याने उपस्थित होते. सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात स्वीप कार्यक्रमांतर्गत नागपूर शहर आणि जिल्ह्यामध्ये मतदार जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे मतदान

## दादाराव मुडे मानवाधिकार सुरक्षा संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री



वानाडोंगरी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते दादाराव मुडे यांची नुकतीच मानवाधिकार सुरक्षा संस्थेच्या राष्ट्रीय महामंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीबद्दल माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्या गोतमारे,माजी नगराध्यक्ष वर्षा शहाकार, माजी सभापती नितिन साखरे, नितिन काळे शुभम गोहाड , ,माजी सभापती वंदना मुडे गुणवंत मते , सचिन मेंडजोगे यांनी त्यांचे अभिनंदन केले

# खर्चाच्या मर्यादेचे काटेकोर पालन आवश्यक



## वेळेत खर्च सादर करण्याचे सर्व उमेदवारांना निवडणूक निरीक्षकांचे आवाहन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
विधानसभा सार्वत्रिक निवडणुका 2024 साठी निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांना प्रचारासाठी खर्चाची मर्यादा निवडणूक विभागाने निश्चित करुन दिली आहे. नागपूर जिल्ह्यासाठी ही खर्च मर्यादा 40 लाख रुपये असून रोखीने खर्च करण्याची मर्यादा ही 10 हजार रुपये एवढी आहे.

या रकमेपेक्षा अधिकचा खर्च हा बँकेमार्फत अनुज्ञेय राहील. प्रत्येक उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीकडे रोख रक्कम केवळ 50 हजार रुपयांपर्यंत बाळगता येईल, असे निवडणूक खर्च निरीक्षक संतोष कुमार मिश्रा यांनी सांगितले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार नागपूर दक्षिण-पश्चिम, नागपूर दक्षिण, नागपूर पुर्व, नागपूर मध्य, नागपूर पश्चिम, नागपूर उत्तर (अ.जा.) तसेच काटोल, सावनेर, हिंगणा, उमरेड, कामठी व रामटेक मतदार संघातील उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण सत्रात ते बोलत होते.

यावेळी निवडणूक निरीक्षक भोर सिग यादव, निवडणूक खर्च दिपक आनंद, देवरंजन मिश्रा, निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाच्या प्रमुख सीमा नन्होरे, प्रशिक्षक शैलेश कोठे उपस्थित होते.

प्रत्येक उमेदवाराने निवडणूकीसंदर्भात झालेला सर्व खर्च नित्यनियमाने सादर केला पाहिजे. दिनांक 7, 11 व 18 नोव्हेंबर हे तीन दिवस निवडणूक खर्च कक्षातर्फे निश्चित करण्यात आले आहेत. निवडणूक विभागातर्फे सर्व उमेदवारांना निश्चित केलेले दरपत्रक देण्यात आले असून त्यानुसार प्रत्येक बाबींचा खर्च तपासून घेतला जाईल. परवानगी विना कोणताही प्रचार, वाहन वा इतर सुविधा निवडणुकीसाठी आढळून आल्यास फिरत्या पथकातर्फे याची तत्काळ दखल घेऊन नियमानुसार कार्यवाही केली जाईल, असे मिश्रा यांनी स्पष्ट केले.

निवडणूक प्रक्रिया ही आदर्श आचार संहितेच्या कार्यपध्दतीप्रमाणे उत्तमरित्या पार पाडावी यासाठी सर्वांनी दक्षता घेतली पाहिजे. मतदारांना प्रलोभन दिले जात असेल अथवा निवडणुकीसंदर्भात काही गैरप्रकार आढळून आले तर पुराव्यानिशी त्यांची तक्रार कोणत्याही ठिकाणाहून सी व्हीजील ॲपवर तत्काळ करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

निवडणुकीमध्ये कोणतेही अनुचित प्रकार होऊ नयेत यासाठी निवडणूक विभागातर्फे दक्षता घेतली जात आहे. यासाठी संपूर्ण जिल्ह्यात व्हिजीलंस स्कॉड अर्थात फिरते पथक नेमण्यात आले आहेत. प्रत्येक उमेदवाराच्या सोशल मिडियावरील पोस्टवर लक्ष ठेवले जात आहे. निवडणूक आयोगातर्फे निष्पक्षपणे प्रत्येक बाबीची दखल घेतली जात असल्याचे निवडणूक खर्च निरीक्षक दिपक आनंद यांनी सांगितले. शैलेश कोठे यांनी निवडणूक खर्चासंदर्भात सविस्तरपणे सादरीकरणाद्वारे यावेळी माहिती दिली.

खर्च लिहिण्याबाबत कुणाच्या अडचणी अथवा शंका असल्यास उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणूक विभागाशी सरळ संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

## भावाविरुद्ध भाऊ रिंगणात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने अनेक राजकीय घराण्यात फूट पडली, वडिलांच्या विरुद्ध मुलीने बंड केले, भावाच्या विरुद्ध भाऊ रिंगणात उतरला. प्रत्येक निवडणुकीत हे चित्र दिसून येते, ही विधानसभा निवडणूक त्याला अपवाद नाही. नागपूर जिल्ह्यात सावनेर मतदारसंघात दोन सख्खेभाऊ परस्परांच्या विरोधात रिंगणात उतरले आहेत. एक भाजपकडून तर दुसरा अपक्ष.

नागपुरात काँग्रेसमध्ये रणजित देशमुख हे मोठे प्रस्थ होते. जि. प. अध्यक्ष, मंत्री, प्रदेशाध्यक्ष असे अनेक पदे त्यांनी भूषविली. सध्या वय झाल्याने ते सक्रिय राजकारणापासून दूर आहेत. मात्र त्यांचे पुत्र आशीष देशमुख आणि अमोल देशमुख राजकारणात आहेत.

२०१४ मध्ये आशीष देशमुख काटोलमधून भाजपचे उमेदवार होते तर अमोल देशमुख रामटेकमधून राष्ट्रवादीचे उमेदवार होते. दहा वर्षानंतर हे दोन्ही बंधू सावनेर मतदारसंघात परस्परांच्या विरोधातच उभे ठाकले आहेत. अमोल देशमुख यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे तर आशीष देशमुख भाजपचे अधिकृत उमेदवार आहेत. या दोघांची लढत काँग्रेस नेते सुनील केदार यांच्या पत्नी अनुजा केदार यांच्यासोबत आहे.

सावनेर मतदारसंघात केंदार विरुद्ध देशमुख यांचे राजकीय वैर जुने आहेत. केदार यांनी येथून सातत्याने विजय मिळवला आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे ते ही निवडणूक लढवू शकत नसल्याने त्यांनी पत्नीला रिंगणात उतरवले आहे.

आशीष देशमुख यांचा राजकीय प्रवास काँग्रेस, भाजप, काँग्रेस आणि पुन्हा भाजप असा आहे. २०१९ मध्ये ते खुद्द तेव्हांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात ते दक्षिण-पश्चिम नागपूरमध्ये निवडणूक लढले. या लढतीत ते पराभूत झाले तरी त्यांनी घेतलेली मते लक्षणीय होती. त्यानंतर ते पुन्हा भाजपमध्ये परतले. त्यांनी काटोलसाठी प्रयत्न केले होते. पक्षाने त्याना सावनेरमध्ये पाठवले. त्या तुलनेत अमोल देशमुख राजकारणात विशेष सक्रिय नाही. निवडणुका जाहीर झाल्यावर अर्ज भरण्याच्या शेवटच्याच दिवशी ते अवतरले. त्यांची सावनेरची उमेदवारी ही काँग्रेससाठी बंड ठरते. पण ती दखलपात्र नसल्याने काँग्रेस सध्या तरी निश्चिंत आहे.

विदर्भात अहेरीमध्ये वडिलांविरुद्ध मुलगी अशी लढत आहे. त्यानंतर सावनेरमध्ये दोन भावांमध्ये लढत आहे. काटोल विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवारगटाचे नेते अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख रिंगणात आहेत पण त्यांच्या विरोधात डमी अनिल देशमुख मैदानात उतरले आहे.



■ **नागपूर :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, बहुतेक सर्व पक्षांनी त्यांच्या उमेदवारांचा प्रचार सुरू केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही राज्यभरात अनेक उमेदवार उभे केले असून, पक्षाचे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडून प्रचार सभांचा धडाकाही सुरू झाला आहे. विदर्भातील मनसे उमेदवारांच्या प्रचारार्थ राज ठाकरे मंगळवारी नागपूर येथे आले. पक्षाचे विदर्भ प्रमुख हेमंत गडकरी यांनी त्यांचे विमानतळावर स्वागत केले.

## अभ्यासासाठी फटकारल्याने घरून पळाला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
अभ्यास करीत नसल्यावरून कुटुंबीयांनी फटकारल्याचा राग मनात धरून एका विद्यार्थ्याने घर सोडले. गत १५ दिवसांपासून तो बेपत्ता होता. अखेर गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने (एएचटीयू) त्याला शोधून काढत कुटुंबीयांच्या स्वाधिन केले.
सोनेगाव ठाण्यांतर्गत राहणारा १५ वर्षीय मुलगा दहावीचा विद्यार्थी आहे. अभ्यासाकडे त्याचे दुर्लक्ष होत होते. २१ ऑक्टोबर रोजी यावरून कुटुंबीयांनी त्याला चांगलेच फटकारले. सायंकाळी तो घर सोडून निघून गेला. कुटुंबीयांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला, मात्र तो कुठेही मिळाला नाही. अखेर पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी तपास सुरू केला. तांत्रिक तपासाच्या मदतीने पोलिसांनी त्याला जयप्रकाशनगर परिसरातून ताब्यात घेतले. समुपदेशनानंतर त्याला कुटुंबीयांच्या स्वाधिन करण्यात आले.

## ४.१७ लाखांची घरफोडी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
चोरांनी घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांवर हातसाफ केला. ही घटना मानकापूर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी सुरेश भीमराव कुयटे (४३) रा. लोकविहार सोसायटी, गोधनीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

रात्री सुरेशचे यांनी कुटुंबासोबत जेवण केले. रात्री 10.30 वाजता संपूर्ण कुटुंब आपआपल्या खोलीत झोपायला गेले. मध्यरात्रीनंतर अज्ञात आरोपीने मागच्या दाराचा कडीकोंडा उघडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील 8 हजारांची रोकड आणि सोन्याचांदीचे दागिने असा 4 लाख 17 हजार रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. पहाटे 4 वाजताच्या सुमारास सुरेशयांची झोप उघडली असता घरात चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पुढील तपास सुरू आहे.

## घरासमोरच तरुणीशी गैरवर्तन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
एका टवाळखोराने घरासमोर उभ्या तरुणीशी गैरवर्तन करून विनयभंग केला. ही घटना सदर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. गत अनेक दिवसांपासून आरोपी तरुणीला त्रास देत होता. या प्रकरणी पोलिसांनी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून राजेश राजू वरखडे (40) विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

राजेश गत काही दिवसांपासून पीडितेचा पाठलाग करून त्रास देत होता. सोमवारी पीडिता घरासमोर उभी होती. दरम्यान राजेश तिच्या जवळ आला. तिच्याशी अश्लील चाळे करू लागला. पीडितेने विरोध करीत आरडा-ओरड केली असता राजेश पळून गेला. पीडितेने घटनेची तक्रार पोलिसात केली.

## पश्चिम नागपुरच्या विकासाचा विकास ठाकरेंचा वचननामा जाहीर



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
पश्चिम नागपुरातील सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न मी गेल्या 5 वर्षांत केला आहे. सर्व भूखंडावरील बांधकामे गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमित करणे, मोफत आरोग्य सेवा आणि अन्य संकल्प घेवून पश्चिम नागपुरच्या सर्वांगीण विकासाचा आणि जनतेच्या अपेक्षापूर्तीचा वचननामा स्वप्नपूर्ती करणारा ठरेल, असा विश्वास विकास ठाकरे यांनी दिला. विकास ठाकरे यांनी मंगळवारी आपला निवडणुकीचा वचननामा जाहीर केला. आज जन आशिर्वाद यात्रेत या वचननामाचे वाटप नागरिकांना करण्यात आले.

काही भूखंड हे आरक्षणाच्या जोखाड्यात बंदीस्त असल्याने त्यांचे नियमितकरण झाले नाही. यामुळे अनेकांना आपले हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागले. या सर्व प्रश्नांचे निराकारण करण्याच्या हेतूने विकास ठाकरे यांनी विशेष आरखडा तयार केला आहे. त्यात सर्व भूखंडाना एमआरटीपी कायद्याअंतर्गत आरक्षणाला रद्द करून भूखंडांचे नियमितीकरण करण्यात येणार. तसेच झोपडपट्टीवासीयांना मालकी हक्काचे पट्टे मिळावे. याशिवाय प्रत्येक प्रभागात आधुनिक वैद्यकीय सुविधा प्रत्येक नागरिकांना मिळावी याकरिता आपण विशेष आराखडा तयार केला आहे.

यात योजनेंतर्गत शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तयार केली जातील. जिथे ओपीडी, रक्त चाचण्या आणि इतर आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध असतील. मानकापूर येथे बांधले जात असलेले जिल्हा सामान्य रुग्णालय सुरू केले जाईल. तसेच हे रुग्णालय शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांशी जोडले जाईल. जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया, रेडियोलॉजी, अंतर्गत रुग्ण विभाग, शवविच्छेदन केंद्र, रक्तपेढी आणि इतर सुविधांची उपलब्धता सुनिश्चित केली जाईल, असेही विकास ठाकरे म्हणाले. नियोजनबद्ध आराखड्यातून सर्वांगिन विकास साधणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

# नागपूर जिल्ह्याच्या १२ मतदारसंघात

# २१७ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात!

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५ :**
महाराष्ट्राच्या राजकारणात कधी नव्हे ते अधिक महत्त्व २०१४ मध्ये फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर आले. नागपूर हे राज्याचे केंद्रबिंदूच ठरले.

अशा जिल्ह्यातील सर्वच निवडणुकीकडे प्रत्येक घटकांचे लक्ष असणे स्वाभाविकच. त्यात विधानसभा निवडणुका म्हंटल्यावर रिंगणातील उमेदवारांची चर्चा अधिक होते. नागपूर शहरात व जिल्ह्यात प्रत्येक सहा या प्रमाणे १२ मतदारसंघ आहेत. त्यात तब्बल २१७ उमेदवार रिंगणात आहेत.

निवडणूक लढवणाऱ्यांमध्ये भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री नितीन राऊत, विद्यमान आमदार विकास ठाकरे यांचा समावेश आहे.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील काटोल मधून व माजी मंत्री सुनील केदार यांच्या पत्नी अनुजा या सावनेरमधून निवडणूक लढवत असल्याने देशमुख व केदार यांची प्रतिष्ठापणाला लागली आहे.

नागपूर जिल्ह्यात अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी नागपूर जिल्ह्यातील एकूण १२ विधानसभा मतदारसंघातील ७२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता सर्व मतदारसंघ मिळून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या २१७ इतकी असल्याचे निवडणूक विभागाने कळवले आहे.

| मतदारसंघ | दाखल अर्ज | माघार | रिंगणात |
|---|---|---|---|
| काटोल | २२ | ४ | १७ |
| सावनेर | २१ | ३ | १८ |
| हिंगणा | २६ | ८ | ०८ |
| उमरेड | २२ | ११ | ११ |
| दक्षिण-पश्चिम | १३ | ०१ | १२ |
| दक्षिण नागपूर | २४ | ०२ | २२ |
| पूर्व नागपूर | २३ | ०७ | १७ |
| मध्य नागपूर | ३२ | १२ | २० |
| पश्चिम नागपूर | २३ | ०३ | २० |
| उत्तर नागपूर | ३० | ०४ | २६ |
| कामठी | २९ | १० | १९ |
| रामटेक | २४ | ०७ | १७ |

काटोल मतदारसंघात २२ अर्ज आले होते. पाच जणांनी अर्ज मागे घेतले असून १७ उमेदवार मैदानात आहेत. सावनेरमध्ये २१ अर्ज आले होते. ३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून आता १८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

हिंगण्यात २६ अर्ज दाखल झाले होते. ८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून आता १८ उमेदवार रिंगणात आहेत. उमरेडमध्ये २२ अर्ज दाखल झाले.११ उमेदवारांनी माघार घेतली. ११ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघात १३ उमेदवारांनी अर्ज भरले होते. त्यापैकी फक्त एकाने अर्ज मागे घेतला. १२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

दक्षिण नागपूरमध्ये २४ अर्ज होते. दोन उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून आता २२ उमेदवार रिंगणात आहेत. पूर्व नागपूरमध्ये २३ जणांनी अर्ज दाखल केले होते. सहा जणांनी माघार घेतली. आता १७ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. मध्य नागपूरमध्ये ३२ अर्ज आले होते. १२ उमेदवारांनी माघार घेतली. २० उमेदवार रिंगणात आहेत.

पश्चिम-नागपूरमध्ये २३ अर्ज दाखल झाले होते. तीन उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. आता २० उमेदवार आहेत. उत्तरमध्ये ३० अर्ज होते. चौघांनी माघार घेतली तर २६ उमेदवार रिंगणात आहेत. कामठीत २९ अर्ज आले होते. १० जणांनी अर्ज मागे घेतले, १९ रिंगणात आहेत.

## निधन

**वैशू सचिन पाटील**



**नागपूर :-** महाबोधी चॅनलचे संस्थापक सचिन पाटील यांच्या पत्नी वैशू सचिन पाटील (वय ४८) रा. नरेंद्र नगर, नागपूर यांचे आकस्मिक निधन झाले. मंगळवारी मोक्षधाम घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

**लेखनदास गणोरकर**



शिवशक्ती नगर, प्लॉट नं. ५९, मानेवाडा रिंग रोड येथील रहिवासी लेखनदास रामाजी गणोरकर (वय ७७) यांचे मंगळवार ५ नोव्हेंबर रोजी, सकाळी १० वाजता. दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, प्रदीप आणि अविनाश ही दोन मुले, एक मुलगी, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे. मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मतदान पूर्व तयारीचा आढावा तीन विभागांची आज बैठक

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५ :**
विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्यावतीने वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त तसेच मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभागातील मतदान पूर्व तयारीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी बुधवार ६ रोजी आढावा बैठक होणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती विभागांची ही आढावा बैठक बुधवार दि. ६ रोजी सकाळी साडे नऊ ते दुपारी २ यावेळेत स्मार्ट सिटी कार्यालय सभागृह, आमखास मैदानाजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या बैठकीस भारत निवडणूक आयोगाचे उपनिवडणूक आयुक्त हिर्देशकुमार, संजय कुमार, प्रधान सचिव अविनाशकुमार तसेच मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम, अति.मुख्य निवडणूक अधिकारी बी. प्रदीपकुमार, उपसचिव सुमनकुमार, अनिलकुमार आदी मान्यवर तसेच छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हा निवडणूक अधिकारी, परीक्षेत्र महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, आयुक्त आदी सहभागी होणार आहेत.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, नागपूर येथून विविध दिशांना जाणाऱ्या मार्गावर स्थायी तपासणी पथक लावण्यात आले आहेत. या पथकांकडून वाहनांची कसून तपासणी सुरू आहे

## महात्मा फुले योजनेतून राज्यातील पहिली

# कर्णरोपण शस्त्रक्रिया नागपुरात

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५ :**
जन्मजात कर्णबधिर मुलांवरील कर्णरोपण (कॉक्लिअर इम्प्लांट) शस्त्रक्रियेला मागील वर्षभरापासून थांबा लागला होता. परंतु, आता या शस्त्रक्रियेचा समावेश महात्मा फुले जनआरोग्य योजनेत करण्यात आल्याने राज्यातील पहिली शस्त्रक्रिया नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) झाली.

मेडिकल आणि मेयो या दोन्ही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासह देशातील निवडक रुग्णालयात २०१८ पासून केंद्राच्या एडीआयपी योजनेतून कर्णरोपण शस्त्रक्रिया व्हायची. परंतु, मागील वर्षभरापासून शस्त्रक्रियेसाठी आवश्यक महागडे यंत्र मिळत नव्हते. त्यामुळे शस्त्रक्रिय थांबल्या होत्या. परंतु, राज्य शासनाने नुकतेच या शस्त्रक्रियेचा महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समावेश केला. नागपुरातील मेडिकल प्रशासनाने आचारसंहितेपूर्वी या योजनेतील रुग्णांसाठी आवश्यक कर्णयंत्र खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण केली व अखेर या योजनेतून दोन वर्षीय बालकावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

मेडिकलमधील कान- नाक- घसा रोगतज्ज्ञ डॉ. कांचन तडके यांनी ही शस्त्रक्रिया केली. यासाठी मेडिकलचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, कान- कान- घसा रोग विभागप्रमुख डॉ. देवेंद्र माहोरे, डॉ. विजय महोबिया, डॉ. संजीव मेडा यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

**स्पिच थेरपी देणार**

जन्मजात कर्णबधिर बालकांना ऐकता व बोलता यावे म्हणून कर्णरोपण शस्त्रक्रिया केली जाते. त्यासाठीचे महागडे यंत्र बालकांमध्ये आवाजाची भावना निर्माण करतात. हे यंत्र प्रत्यारोपित झाल्यावर बालकाला बोलण्याचा सरावासाठी दोन वर्षे स्पिच थेरपी दिली जाते. या थेरपीनंतर बालक सामान्यांप्रमाणे ऐकू व बोलू शकतो.

राज्यातील एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कर्णरोपण शस्त्रक्रिया होत नव्हती. परंतु इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (मेयो) कान- नाक- घसा रोग विभागाचे प्रमुख डॉ. जिवन वेदी यांनी पुढाकार घेत या रोपणाबाबत विशेष प्रशिक्षण घेतले.

त्यानंतर वैद्यकीय शिक्षण खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय करून मेयोत पहिली या पद्धतीची शस्त्रक्रिया सुरू झाली. केंद्र सरकारच्या योजनेतून ही शस्त्रक्रिया होत होती. कालांतराने ही शस्त्रक्रिया नागपुरातील मेडिकलसह राज्यातील इतरही काही निवडक वैद्यकीय शिक्षण खात्याच्या रुग्णालयात होत आहे.

मेडिकल रुग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून राज्यातील पहिली कर्णरोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाली. आता या योजनेतून शस्त्रक्रियांचा मार्ग मोकळा झाला आहे. याचा लाभ गरीब रुग्णांना होईल.
**डॉ. अविनाश गावंडे**
**वैद्यकीय अधीक्षक, मेडिकल.**

